म. श्री. सं. ठाणे
विषय
सं. नं. 
REFBK-0006457
REFBK-0006457



# 30 Months in Russia

" डी. जी. तेंडूलकरांच्या ' थर्टी मंथ्स इन रशिया ' या पुस्तकांत त्यांना तेथें जे अनुभव आले त्यांची माहिती आहे. संवेदनाक्षम जिज्ञासू चित्तावर सोव्हियट प्रयोगाच्या कार्याचे जे परिणाम घडले ते त्यांनीं आपल्या पुस्तकांत ग्रथित केले आहेत. या पुस्तकाचा मोठा गुण म्हणजे लेखकानें स्वतःला मागें ठेवलें आहे हा होय. त्यानें आपल्या अनुभवाचें निमित्त करून सोव्हियट जीवनाचें मोठें उज्ज्वल चित्र रेखाटलें आहे.

"सुंदर भाषेंत सांगितलेलें हें एक उत्तम कथानक आहे. लेखकानें स्वतः काढलेले उत्कृष्ट फोटो घालून त्याची शोभा वाढविली आहे. किंमत वसूल झाल्याचें समाधान देणाऱ्या गुणांनीं तें संपन्न आहे." —**टाईम्स ऑफ इंडिया**, मुंबई.

"डी. जी. तेंडूलकर यांनीं सोव्हियट राज्यसंघाचें रहस्य उकलून दाखविण्याची जी कामगिरी केली आहे, तशी कामगिरी दुसऱ्या कोणत्याहि हिंदी लेखकानें केलेली नाहीं. त्यांचें पुस्तक सोव्हियट राज्यसंघाची माहिती करून घेतांना अमूल्य मार्गदर्शक होणारें आहे. त्यांचें रशियावरील प्रेम केवळ राजकीय स्वरूपाचें नाहीं. तशा प्रेमानें कांहीं ग्रह उत्पन्न होऊन मन स्वच्छ रहात नाहीं व मग ज्या गोष्टीचा अभ्यास करावयाचा त्या गोष्टीबद्दल निर्विकारतेनें निर्णय देतां येत नाहीं. त्यांनीं रशियन जीवनाचा सौंदर्यग्रहणाच्या व शुद्ध मानवतेच्या दृष्टीनें अभ्यास केला. यामुळें पूर्वग्रहांचा चष्मा त्यांच्या डोळ्यांवर नव्हता. अगदीं उघड्या डोळ्यांना जें दिसलें तेंच त्यांनीं जसेंच्या तसें प्रतिपादिलें आहे."

—**बॉम्बे क्रॉनिकल**, मुंबई.

" या पुस्तकाचा कर्ता ' तेथें ' होता व शास्त्रज्ञ संशोधकाप्रमाणें त्यानें तेथील घटनांचा सर्वांगपूर्ण अभ्यास केला आहे. झुळझुळत्या प्रसन्न इंग्रजी भाषेमध्यें त्यानें हें पुस्तक लिहिलें असून अत्यंत कुत्सित बुद्धीच्या टीकाकारालाहि तृप्त करणारे तेजस्वी विचार त्यानें पुरविले आहेत. अर्वाचीन इतिहासाच्या भोक्त्यांना हें पुस्तक पूर्णपणें आनंद देईल."

—**अमृत बझार पत्रिका**, कलकत्ता.

" रशियांत इतर नागरिकांप्रमाणें उद्योग करून रहाणारीं जीं हाताच्या बोटांवर मोजतां येण्याइतकीं हिंदी माणसें सांपडतील, त्यांपैकीं मि. तेंडूलकर हे एक आहेत. यामुळें त्या देशाची व तेथील जनतेची त्यांना प्रत्यक्षपणें माहिती मिळवितां आली. सोव्हियट कारभाराच्या योजकांना ज्या अडचणी आल्या, त्यांचें वर्णन देऊन त्यांनीं रशियांतील जीवनाची नवी घडी कशी बसविली याचाहि वृत्तांत तेंडूलकरांनीं सांगितला आहे. त्यांची लेखनशैली मनोरंजक आहे." —**हिंदु**, मद्रास.

" रशियावरील तुमच्या मजेदार पुस्तकाबद्दल तुमचे जेवढे आभार मानावे तेवढे थोडेच होतील. मला वाटतें, हें पुस्तक पहिल्याप्रतीचें असून फोटो तर उत्कृष्टच आहेत. मी तुमचें मनःपूर्वक अभिनंदन करतों." —**व्हेरिअर एल्विन**, प्रख्यात लेखक.

# रशियांत
# ३० महिने

वीस वर्षं झालीं–लेनिनचें नांव एकाएकीं दुनियेसमोर आलें. ही काय घटना रशियांत उपस्थित झाली, याचा पुष्कळांना अचंबा वाटला. जिनें क्रांतीचा चमत्कार सुरू केला ती कोण व्यक्ति असावी, असा अनेकांपुढें प्रश्न उद्भवला. बहुतेकांची समजूत अशीच होती कीं, हें प्रकरण कांहीं काळानें दबून जाईल व त्याच्या कार्याचा मागमूस देखील उरणार नाहीं. पण ही व्यक्ति दबली तर नाहींच–उलट तिचें कार्य वाढतच गेलें! या वीस वर्षांत जगांत कितीतरी परिवर्तन झालें व आमच्या डोळ्यांदेखत तें चालूच आहे. तथापि आज असा कोण असेल कीं, ज्याला लेनिनचें नांव माहीत नाहीं व जो हें नांव ऐकल्यावर आदरानें आपली मान वाकवीत नाहीं? जे त्याचे हाडवैरी होते त्यांनाहि त्याचें कार्य मान्य करण्याची पाळी आली! जगांतल्या क्रोडों गरीबांना तो एक ध्रुव तारा वाटतो; व हा तारा त्यांना स्वातंत्र्याचा मार्ग दाखवीत आहे. कोट्यवधि हृदयांत त्याला स्थान मिळालें असून त्या मृतवत् बनलेल्या हृदयांना त्यानें पुनः जीवंत केलें आहे. लेनिनचा जन्म रशियांत झाला असेल, पण तो आतां साऱ्या जगाचा झालेला आहे. आम्ही देखील त्याच्या कर्तृत्वाच्या प्रकाशांत आमचा रस्ता हुडकीत आहों. त्या महापुरुषाला आम्ही आदर्श मानावें व त्याच्या स्फूर्तीनें आपली हिम्मत वाढवावी, हेंच आम्हांला उचित आहे.

लेनिन-दिनाचा संदेश,
२ जानेवारी १९३८

जवाहरलाल नेहरू

# रशियांत

# ३० महिने

REFBK-0006457

REFBK-0006457

कर्नाटक पब्लिशिंग हाउस

मुंबई

# आभार

माझ्या ' 30 Months in Russia ' ह्या नांवाच्या इंग्रजी पुस्तकाचें मराठीकरण प्रो. न. र. फाटक ह्यांच्या प्रोत्साहनाचें व मदतीचें फळ आहे. प्रो. न. र. फाटक, हे माझे जुने मित्र असून त्यांचे आभार जितके मी मानावे तितके थोडेच आहेत.

' कर्नाटक पब्लिशिंग हाउस ' चे मालक श्री. मंगेशराव कुळकर्णी यांनीं मूळ इंग्रजी पुस्तकाचा मराठी तर्जुमा करण्याबद्दल प्रोत्साहन दिलें व तो प्रसिद्ध केला.

' ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस'चे व्यवस्थापक मि. हॉकिन्स यांनीं माझ्या " सोव्हियट संस्कृति " या ' आजचें राजकारण ' मालेंतील पुस्तकामधून कांहीं मजकूर प्रस्तुत पुस्तकांत घालण्याला मेहरबानीनें परवानगी दिली.

या त्यांच्या उपकाराबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

— लेखक

**पहिली आवृत्ति, ऑक्टोबर १९४२**

[ सर्व हक्क स्वाधीन ]

Printed by M. N. Kulkarni, at the Karnatak Printing Press, Karnatak House, Chira Bazar, Bombay 2, and published by him at the Karnatak Publishing House, Chira Bazar, Bombay 2.

पितृचरणीं समर्पण

# चित्रें

( फोटो लेखकानें काढलेले आहेत )


| | पृष्ठ |
|---|---|
| १. खेळाडू कुमारी | १ |
| २. रशियन माता व तिचें मूल | १६ |
| ३. लेनिनच्या समाधीसमोर लाल चौकांतील प्रचंड समूह — पिछाडीस क्रेम्लिनचा किल्ला | १७ |
| ४. 'प्रावदा' वर्तमानपत्राचें सामुदायिक वाचन | ४८ |
| ५. मे-दिनानिमित्त सोव्हियट युवकांचा कूच | ४९ |
| ६. मध्य-आशियांतील नृत्याचें दृश्य | ६४ |
| ७. सामुदायिक शेतावरचा लोखंडी घोडा | ६५ |

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| पुरस्कार – न. र. फाटक | |
| १. माझा लहानपणचा रशिया | १ |
| २. मॉस्कोच्या मार्गावर – | ४ |
| ३. भाई, तिकीट !. | ७ |
| ४. लाल राजधानींत | ९ |
| ५. पुढें काय ? | १६ |
| ६. नवी पिढी, नवें शिक्षण | १९ |
| ७. स्त्रीस्वातंत्र्याचा एकच मार्ग ! | २६ |
| ८. १९० जाती व १५० भाषा | ३२ |
| ९. क्रेम्लिनमध्यें कामगार | ३६ |
| १०. वीज + सोव्हियट = समाजसत्तावाद | ४२ |
| ११. योजनेचे कर्ते लाखों लोक | ४८ |
| १२. समाजसत्तावादाचा लोखंडी घोडा | ५३ |
| १३. हिंदुस्थानच्या उंबरठ्यावर | ६५ |
| १४. लाल फौज | ७५ |
| १५. कुल्तूर | ८५ |
| १६. दस्विदानिया ! | ९३ |

हिंसेच्या पायावर उभारलेली कोणतीहि गोष्ट चिरकाल टिकूं शकत नाहीं, अशी माझी पक्की खात्री आहे. पण कसेंहि असलें तरी आपल्या सर्वस्वाचा होम करणाऱ्या असंख्य स्त्रीपुरुषांच्या स्वार्थ-त्यागाचें सामर्थ्य बोल्शेव्हिक ध्येयाच्या मागें उभें आहे हें निर्विवाद असून त्याला लेनिनसारख्या लोकोत्तर पुरुषांच्या आत्मयज्ञानें एक प्रकारचें पावित्र्य लाभलेलें आहे; अर्थात् हें ध्येय कधींहि निष्फळ व्हावयाचें नाहीं. त्याच्या त्यागवृत्तीचें उदाहरण सदैव उज्ज्वल रहाणारें आहे व त्या योगानें जसजसा काळ अधिकाधिक लोटेल तसतसें हें ध्येय अधिकाधिक स्फूर्तिदायक व निर्मळ होत जाईल.

यंग इंडिया,
१५ नोव्हेंबर १९२८

मो. क. गांधी

## — पुरस्कार —

माझे मित्र श्री. तेंडूलकर यांनी कांहीं महिन्यांमागें रशियाच्या माहितीचें एक लहानसें पुस्तक इंग्रजींत लिहून जनतेला सादर केलें. त्या पुस्तकाचें चांगलें स्वागत झाल्यामुळें त्याचें भाषान्तर मराठींत केल्यास उपयोग होईल अशी श्री. तेंडूलकरांना उमेद वाटूं लागली; या उमेदीला कर्नाटक पब्लिशिंग हाउसचे श्री. मंगेशराव कुळकर्णी यांनींहि दुजोरा दिला व या परिस्थितीचें फळ म्हणून 'रशियांत ३० महिने' हें पुस्तक प्रसिद्ध होत आहे. रशियाबद्दल मराठींत पुष्कळ पुस्तकें आहेत; परंतु त्या पुस्तकांच्या कर्त्यांपैकीं फारच थोड्या जणांना रशिया हा देश प्रत्यक्ष पहाण्याची संधी लाभल्याचें दिसून येतें. आणखी बारकाईनें विचार केल्यास असेंहि लक्षांत येईल कीं, ज्यांना बराच काळ रशियांत काढावा लागला असे लेखक बहुधा नाहींतच. श्री. तेंडूलकरांना रशियांत ३० महिने राहायला सांपडलें; रहायला सांपडलें एवढेंच नव्हे तर सोव्हियट नागरिकाप्रमाणें आपल्या जीवनाला गति देतां आली, हा त्यांच्या लेखनाधिकाराचा असाधारण विशेष आहे. रशियांत जावें, रशियांतील सोव्हियट राजवटीची जातीनें ओळख करून घ्यावी, त्या राजवटीमध्यें वाढणाऱ्या प्रजेचीं सुखदुःखें त्या प्रजेंत मिसळून पारखावीं, ही त्यांची इच्छा १९३४ मध्यें केवळ योगायोगानें सफळ झाली. श्री. तेंडूलकर येथील एल्फिन्स्टन कॉलेजांतील एक विद्यार्थी. गणित विषयांतील नैपुण्यामुळें ते विद्यार्थीदशेंतच थोडेसे नांवाजले जाऊं लागले होते. येथील शिक्षण संपल्यावर ते इंग्लंडांत गणितविद्येचा जास्त अभ्यास करण्यासाठीं गेले. तेथून ते म. गांधींची १९३० ची चळवळ सुरू झाल्यावर तिच्याकडे लक्ष वेधल्यामुळें अभ्यासाला सोडचिठ्ठी देऊन परतले. त्या चळवळीचा भर ओसरल्यावर पुनः एकवार आपला अभ्यास पुरा करावा अशी इच्छा त्यांच्या ठिकाणीं जोरावली आणि पैशाची तरतूद करून ते जर्मनींत गेले.

श्री. तेंडूलकर यांनीं युरोपला दोनदां येजा केली यावरून ते घरचे थोडे गबर असावे, अशी कल्पना होण्याचा संभव आहे. वस्तुस्थिति मात्र तशी मुळींच नव्हती. त्यांचे वडील कै. गोपाळ कृष्ण हे एक म्युनिसिपल शाळेंतील सामान्य शिक्षक. इंग्रजी भाषेचें पद्धतशीर शिक्षण घेण्यासारखी त्यांची स्थिति नसतांहि केवळ दुर्दम्य

ज्ञानलालसेमुळें त्यांनीं म्युनिसिपल दिव्याखालीं उभें राहून व येणारा-जाणाराला शब्दांचे अर्थ विचारून इंग्रजी भाषेचा परिचय करून घेतला. श्री. दीनानाथ—प्रस्तुत पुस्तकाचे लेखक—हे त्यांचे धाकटे लाडके चिरंजीव. श्री. दीनानाथांची मातुःश्री त्यांच्या लहानपणींच वारली व या मुलाचा सगळा भार गोपाळरावांनीं आपल्या अंगावर घेतला. या मुलाबद्दल पित्याला अतिरिक्त प्रेम वाटण्याचें हें एक कारण होतें. मुलाच्या मनानें दुसऱ्यांदा अभ्यासार्थ परदेशी जाण्यासाठीं उचल घेतली, तेव्हां गोपाळरावांची साठी उलटून गेलेली होती. त्यांची प्रकृतीहि चांगली नव्हती. आयुष्यांतील सर्व सौख्याचा आधार हा मुलगा, व तो तर परदेशीं जाण्यासाठीं उत्सुक झालेला. ह्यानें पुनः देश सोडूं नये, आपल्याजवळच रहावें, अशी भावना तीव्र असतांहि आपल्या मनाचा दुबळेपणा मुलाच्या आकांक्षेआड येऊं नये म्हणून गोपाळरावांनीं केवढा मनोनिग्रह आचरला असेल याची कल्पनाच करणें उत्तम ! त्यांनीं चित्ताची अस्वस्थता आवरून मुलाला पैशाची मदत मिळण्यासाठीं प्रयत्न केला. मुलगा परदेशीं गेला, परंतु तेथें पैशाची पुनः अडचण उपस्थित झाली; तेव्हां या वत्सल पित्यानें "माझ्या जीवाचें काय वाटेल तें होवो, मुलाचा हेतु तडीस् गेलाच पाहिजे. त्याला मी कांहीं कमी पडूं देणार नाहीं" असे निकराचे शब्द उच्चारले व हे शब्द खरे करण्याच्या मार्गास गोपाळराव लागले.

मुलगा परदेशांत—जर्मनीस—गेला. अभ्यास करूं लागला. पण थोड्याच काळांत तेथें नात्सी पंथाचा उदय होऊन त्याला 'कम्यूनिस्ट' या आरोपावरून नात्सी दडपशाहीचा तडाखा बसला. तेव्हां गोपाळरावांची काय अवस्था झाली, ती शब्दांनीं व्यक्त होण्यासारखी नाहीं. नात्सींच्या अटकेंतून दीनानाथ सुटला व रशियांत निर्विघ्न सुखरूप गेला, तेव्हां गोपाळरावांच्या जीवांत जीव आला. ते एक प्रकारें निश्चिंत झाले खरे, पण दिवसेंदिवस शरीर जास्त थकत असल्यानें त्यांचा जीव मुलाकडे लागलेला होता. शेवटीं १९३७ मध्यें दीनानाथ स्वदेशीं धडपणें आला व भेटला, तेव्हां गोपाळरावांना आपलें जीवितकर्तव्य संपल्यासारखी मनाची शांति लाभली. तथापि मधून मधून मुलानें परदेशांत काय कमाई केली, त्याचें पुढें काय होणार, असा प्रश्न त्यांच्या मनाला डंवचत असे. "तुमचा मुलगा वाया गेला नाहीं, लोकोपयोगी कार्यांत पडून नांव काढील" असें विश्वासाच्या व्यक्तींकडून गोपाळरावांना ऐकायला सांपडलें म्हणजे साहजिकच त्यांना कृतार्थता वाटे. आपला मुलगा लेखक असून शिवाय उत्तम

फोटोग्राफर आहे, कॉंग्रेस चालकांतील पं. जवाहरलाल नेहरूसारख्या थोरांना त्याच्याबद्दल ममता वाटते, या गोष्टी गोपाळरावांना पहायला सांपडल्या व त्याबद्दल त्यांना धन्यताहि वाटत असे. परंतु दीनानाथाचें हें 'मराठी' पुस्तक त्यांच्या अवलोकनांत आलें असतें तर त्यांना जो आनंद झाला असता, तो भोगायला व त्याच्या भरांत मुलाला आशीर्वाद देण्याला, दुर्दैवानें आज ते हयात नाहींत. गुदस्तां वयाच्या सुमारें ७२ व्या वर्षीं त्यांनीं इहलोक सोडला. गोपाळरावांचें चरित्र सांगण्याचें कारण एवढेंच कीं, परिस्थितीच्या दडपणास दाद न देतां व नैसर्गिक भावनांस बळी न पडतां मुलाचा विद्यार्जनाच्या बाबतींत कोणत्याहि प्रकारें निरुत्साह न होऊं देणारे बाप विरळाच सांपडतील. श्री. तेंडूलकरांना याची तीव्र जाणीव आहे. आपल्या अंगीं जर कांहीं गुण असतील तर त्याचें श्रेय आपल्या वडिलांनाच दिलें पाहिजे असें श्री. दीनानाथ मुक्तकंठानें कबूल करतात. कै. गोपाळरावांच्या मानसिक औदार्यामुळेंच श्री. दीनानाथ यांस रशियास जाण्याची संधी मिळाली.

जर्मनींत काय झालें हें वर आलेंच आहे. जर्मनींत रहाणें धोक्याचें ठरल्यावर श्री. तेंडूलकरांनीं सरळ हिंदुस्थानांत येण्याऐवजीं फ्रान्सला जाऊन तेथून रशियाचा रस्ता पकडला! लहानपणापासून मनांत घट्ट ठाणें करून बसलेली रशिया पहाण्याची आकांक्षा आतां सिद्धीस गेली व ३० महिने तेथें राहून ते स्वदेशीं हिंदुस्थानांत आल्यावर सुद्धां त्यांना स्वस्थता मिळाली नाहीं. रशियांत राहून आलेला व येथील राजकीय चळवळीच्या जहाल पक्षांत वावरणारा एक तरुण या नात्यानें त्यांना येथील सरकारच्या दडपशाहीला बळी पडावें लागलें. राजबंदी या नात्यानें त्यांना वीस महिने अटकेंत काढावे लागले. दडपशाहीच्या या ग्रहणांतून सुटल्यावर येथील राजकारणाचा रंग पालटल्यामुळें रशियासंबंधाचें पुस्तक लिहिण्याला काळाची अनुकूलता लाभली. १९४१ सालीं जर्मनीनें रशियावर चढाई करतांच इंग्लंड व रशिया यांच्यांतील विरोध एकदम मावळला. श्री. तेंडूलकर तुरुंगांतून सुटतांच ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसमार्फत 'सोव्हियट संस्कृति' या नांवाचें एक लहानसें मराठी पुस्तक त्यांच्याकडून लिहवून प्रसिद्ध करण्यांत आलें. त्यामागून त्यांचें रशियाविषयींचें दुसरें पुस्तक कर्नाटक पब्लिशिंग हाउसनें प्रसिद्ध केलें. 'स्पिरिट ऑफ रशिया' या नांवाचें आणखी एक मोठें पुस्तक श्री. तेंडूलकर लिहीत आहेत.

श्री. तेंडूलकर हे या पुस्तकांच्याद्वारें प्रथमच लेखन-क्षेत्रांत प्रवेश करीत

आहेत, असा ग्रह कोणीहि जाणता मनुष्य करून घेणार नाहीं. त्यांनीं रशियाच्या विद्यमान स्थितीवर पुष्कळसे लेख 'इलस्ट्रेटेड विक्ली' या साप्ताहिकांत लिहिलेले असून 'बॉंबे क्रॉनिकल,' मद्रासचें 'हिंदू,' कलकत्त्याचें 'हिंदुस्थान स्टँडर्ड' व हिंदी चित्रपटांचें मासिक 'फिल्म इंडिया' या नियतकालिकांमध्येंहि त्यांचे लेख वारंवार प्रसिद्ध होत असतात. आजवर त्यांनीं सगळें लिखाण इंग्रजी भाषेंतच केलें; ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसच्या निमित्तानें ते प्रथमच मराठीकडे वळले. प्रस्तुत पुस्तक हा त्यांचा मराठी लिहिण्याचा दुसरा प्रयत्न आहे. यामुळें वाचकांना त्यांचा नवशिकेपणा अनुभवाला आल्यास नवल नाहीं. तथापि भाषेंतील दोषाकडे कानाडोळा करून रशियाबद्दल जिज्ञासा बाळगणारा कोणीहि वाचक त्यांच्या या प्रयत्नाचें अभिनंदनच करील. मागील महायुद्धाच्या शेवटीं रशियन राज्यक्रान्तीनें साऱ्या जगाचें लक्ष आपल्याकडे वेधून घेतलें. आजतागायत सर्वत्र रूढ असलेल्या समाजव्यवस्थेची उलटापालट करणाऱ्या क्रान्तीबद्दल सकृद्दर्शनीं गैरसमज उत्पन्न व्हावे, हें स्वाभाविक आहे. रशियानजीकच्या पाश्चात्य देशांतून जर रशियाबद्दल नानाविध दुष्ट ग्रह माजले तर युरोपांतील अनेक देशांच्या सर्वच बाबतींत कितीतरी मागें असलेल्या हिंदुस्थान देशांत रशियांतील क्रान्ति म्हणजे एक भयंकर अनर्थ होय, अशा तऱ्हेच्या समजुती मोठ्या प्रमाणांत पिकल्यास त्याचें नवल वाटायला नको. त्यांतून रशियांतील स्थितीची खरी कल्पना करून देणाऱ्या वाङ्मयाला येथें कडक मज्जाव नसता तर या विचित्र समजुती कदाचित् नाहींशा करतां आल्या असत्या; परंतु तशीहि सवड येथील राज्यकर्त्यांनीं पुष्कळ वर्षेंपर्यंत ठेवलेली नव्हती. तरीसुद्धां रशियाबद्दलचा अभ्यास हिंदुस्थानांत थोडाफार सुरू होता. मात्र जिज्ञासूंच्या उपयोगी पडणारें सारें वाङ्मय इंग्रजीच होतें हें विसरून चालणार नाहीं.

श्री. तेंडुलकर रशियांत तीस महिने म्हणजे अडीच वर्षें राहिले. हा काळ असा काय मोठा आहे कीं, ज्यासाठीं त्यांचें कौतुक करावें, असा प्रश्न कदाचित् मनांत येईल; परंतु रशियामध्यें अति त्वरेनें होणाऱ्या स्थित्यंतराचा हा काळ आहे. श्री. तेंडुलकरांचे ३० महिने चार वर्षांत विभागले गेले होते. १९३४ च्या उत्तरार्धामध्यें ते रशियांत गेले व १९३७ सालच्या मार्चमध्यें त्यांनीं रशिया सोडला. रशियांत अमूक मुदतींत अमूक कार्य फलद्रूप झालेंच पाहिजे, अशा योजनांच्या तडफदार अंमलबजावणीचा हा काळ होता. १९३४ मध्यें ते पुढील वर्षांच्या कार्यक्रमाची

चर्चा ऐकत होते; त्या वर्षांत संकल्पानुसार उरकलें जाणारें काम पहात होते व पूर्वीच्या योजनांच्या आराखड्याप्रमाणें रशियानें जी मजल मारली, तिच्या योगानें सोव्हियट प्रजेच्या जीवनांत झालेले फेरफार अनुभवीत होते. निवळ गणित पाहिल्यास ३० महिन्यांचें रहस्य लक्षांत येणार नाहीं. परंतु ते ३० महिने योजनांच्या धूमधडाक्याच्या चार वर्षांतले आहेत हें विचारांत घेतल्यास श्री. तेंडुलकरांवर घडत असलेल्या संस्काराचें महत्त्व कळेल. याशिवाय आणखीं एक मुद्दाम ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट म्हणजे विख्यात लेखक, चित्रपटकार, व तशाच थोरवीचे इतर कलावंत यांच्याशीं लेखकानें जोडलेला स्नेह ही होय. सोव्हियट जीवनाच्या नव्या सृष्टीचे आपण विधाते आहों, अशा प्रखर व प्रचंड विश्वामित्री भावनेनें रशियांतील श्रेष्ठ प्रतीचे जबाबदार कलावंत आपलीं कामें करीत असतात. त्याचीं कामें पहाणें व त्यांचे विचार ऐकणें हेंसुद्धां एक प्रकारें बहुमोल शिक्षणच म्हटलें पाहिजे. सोव्हियट जीवनाचें चित्र रंगवीत असतां श्री. तेंडुलकरांच्या या पुस्तकांत सदर शिक्षणाची छाया ठिकठिकाणीं अवतरली आहे व तिनें पुस्तकाच्या बोधकारकतेला गंभीर उत्कटता आणलेली आहे.

रशियासंबंधी पूर्वीं लिहिलेल्या मराठी पुस्तकांमध्यें रशियांतील सहवासाच्या अनुभवाचा जीवंतपणा दिसूं नये हें सरळच आहे. क्वचित् एखादें पुस्तक रशिया स्वतःच्या नजरेनें पाहून आलेल्या लेखकाचें दाखवितां येईल, परंतु थोड्या मुदतीच्या धावत्या प्रवासांतील माहितीचें पुस्तक व रशियांत नागरिकाच्या दर्जानें राहून मिळालेल्या माहितीचें पुस्तक यांतील फरक वाचकांना सहज कळणारा आहे. श्री. तेंडुलकरांच्या या पुस्तकांत तसा जीवंतपणा व माहितीचा भरदारपणा वाचकांच्या प्रत्ययास येईल असा भरंवसा आहे. इतकें खरें कीं या पुस्तकामध्यें रशियाबद्दल जिज्ञासूंच्या अंतरंगांत वसणाऱ्या साऱ्याच प्रश्नांचें समाधानकारक उत्तर सांपडेल असें म्हणतां येत नाहीं. वाचतां वाचतां एखाद्या ठिकाणीं चटकन् कांहीं प्रश्न उपस्थित होतो व त्याचें उत्तर पुस्तकांत सांपडत नाहीं, असें वाचकांना वाटेल; परंतु रशियाबद्दल सर्वांगीण सोपपत्तिक ज्ञान करून देणें हा या पुस्तकाचा उद्देश नाहीं. सोव्हियट राज्यकर्तृत्व, त्यानें समाजसत्तावादाच्या दिशेनें चालविलेला अचाट प्रयत्न व त्या प्रयत्नाचें ओझें संतोषानें वहाणारी रशियन प्रजा, ह्या प्रजेच्या मनोरचनेंत व बाह्य जीवनांत झालेले परिणाम यांच्याविषयीं ठळकपणें ज्या गोष्टी डोळ्यांत भरण्याजोग्या आहेत,

तेवढ्याच निवडून त्यांचा खुलासा श्री. तेंडूलकरांनीं विस्तारानें केलेला आहे. या खुलाशांतील पुष्कळसा मजकूर त्यांनाहि दुसऱ्या पुस्तकांच्या आधारानें घ्यावा लागला, हें सहज ध्यानांत येणारें आहे. परंतु तेवढ्यानें पुस्तकाच्या महत्त्वाची हानि होऊं शकत नाहीं. निवळ मराठीच्या वाचकांना यांतील पुष्कळ माहिती अगदीं नवीन वाटेल व तिच्या योगानें रशियाबद्दलच्या भल्याबुऱ्या अडाणी समजुतीबावत ज्याची त्याला आपल्या मनाशीं झडती घेतां येईल. रशिया म्हणजे आसुरी संपत्तीचें माहेरघर; बलाढ्यांच्या जुलुमजबरदस्तीचें राज्य; त्या देशांत इतरत्र दिसणाऱ्या माणुसकी-च्या गुणांना थारा नाहीं; इत्यादि कल्पना आजकालचा रशिया किंवा सोव्हियट हा शब्द उच्चारतांच पुष्कळांच्या मनांत उभ्या रहातात. त्या कल्पनांचा खरेखोटेपणा पडताळून घेण्याला या पुस्तकाची मदत होईल. रशियांत सोव्हियट राज्यक्रान्तीनें सुरू केलेला प्रयोग अवघ्या पंचवीस वर्षांचा आहे. राष्ट्राच्या आयुष्यांत पंचवीस वर्षांचा अवधि फार मोठा समजला जात नाहीं. मानवी स्वभावाचा अनुभव घेऊन त्या प्रयोगांत अधूनमधून फेरफार करण्यांत आले असून अजूनहि ते चालू आहेत. या प्रयोगा-बद्दल सरसकट प्रतिकूलतेची वृत्ति स्वीकारण्याऐवजीं त्यांतहि ग्राह्यांश आहे व तो फेरफारानें वाढत जाईल, अशा अपेक्षेनें त्याचा अभ्यास केला पाहिजे; त्यांचें नांव घेतांच नाक मुरडण्याचें, कपाळाला आंठ्या घालण्याचें किंवा त्याला अवाच्य ठरवून मौन पत्करण्याचें कारण नाहीं, अशी निःपक्षपाताची दृष्टि हें पुस्तक वाचल्यावर उत्पन्न होण्याला हरकत नाहीं. स्वतः लेखक – श्री. तेंडूलकर हे रशियांत घडणाऱ्या सगळ्याच गोष्टींचे पुरस्कर्ते नाहींत. त्यांनीं तसें स्पष्ट सांगितलें आहे. परंतु सोव्हियट संस्कृतीबद्दल त्यांना जें विशेष प्रेम वाटतें तेंहि त्यांनीं झांकलेलें नाहीं. रशिया हिंदुस्थानाला जवळचा असतांना त्याविषयीं ज्या विपरीत कल्पना हिंदी समाजांत पसरल्या आहेत, त्यांना आळा पडावा आणि रशियांतील वस्तुस्थितीकडे येथील जनतेचें लक्ष वेधावें, अशा हेतूनें त्यांनीं वादग्रस्त विषयांना बुद्धिपुरस्सर बगल दिलेली आहे. हिंदी राजकीय विचारांना उपयोगी पडण्याजोगा भाग मात्र त्यांनीं टाळलेला नाहीं. भावी हिंदी स्वराज्याचें चिंतन करणारांना या पुस्तकांत बरीच बोधप्रद माहिती सांपडेल.

**न. र. फाटक**

मराठी ग्रंथ
७५३
विरकोळ
२८।१९


१

# माझा लहानपणचा रशिया

१९१४ सालचें युद्ध सुरू झालें तेव्हां मी जरी सहा वर्षांचा होतों तरी त्या खळबळीच्या वातावरणाचे अनेक प्रसंग अजून माझ्या ध्यानांत आहेत. दररोज रात्रीं माझे वृद्ध चुलते समईपुढें बसून चाळींतील लोकांस मराठी वर्तमानपत्रांतील युद्धाचा मजकूर चटकदार करून सांगत असत. परंतु स्वतःसाठीं माझ्याकडून ते नियमानें 'केसरी' वाचून घेत. तेव्हां मी केसरीच्या रकान्यांतील रशियाची बातमी कधींहि चुकवीत नसें. केसरी म्हणजेच लोकमान्य टिळक अशी समजूत असल्यामुळें लोकमान्यांना जर रशियन क्रांतीबद्दलच्या जिज्ञासेचे माझे गुरु असें म्हटलें तर ती अतिशयोक्ति होणार नाहीं. केसरीच्या २१ ऑगष्ट १९१७ च्या अंकांत पुढील टीका प्रसिद्ध झाली होती :—

"प्रतिराज्यक्रांतीच्या प्रयत्नांचें हें घातक विषारी मूळच राजधानींतून उपटून काढून टाकावें असें विद्यमान प्रजासत्तावादी कारभाऱ्यांस वाटलें........... कसेंही असो, ज्या सायबेरियाच्या ओसाड मुलखांत पूर्वी झारसाहेबांच्या हुकुमानें हजारों रशियन देशभक्त हद्दपारीची शिक्षा भोगण्यास पाठविण्यांत आले त्याच सायबेरियांत आतां स्वतः त्याच झारसाहेबांना बंदिवान होऊन जावें लागत आहे...सायबेरियांतील बंदिवासांत करमणुकीकरितां झारसाहेबांना पुस्तकें वाचावयास देण्यांत येतीलच. तेव्हां सायबेरियाच्या तुरुंगांत पूर्वी रशियन बंदिवानांना जीं दुःखें भोगावीं लागलीं त्यांचीं हृदयद्रावक वर्णनें लोकांनीं जीं लिहून ठेवलेलीं आहेत तींच झारसाहेबांस वाचावयास दिलीं तर फार बरें होईल......मात्र चालू युद्धानंतर युरोपांत काय किंवा इतरत्र काय राजघराणीं किंवा राजसंस्था कितपत शिल्लक राहतील याची शंकाच आहे. असो; लुई बादशहाच्या वेळीं फ्रेंच क्रांतिकारकांनीं किंवा चार्लस राजाच्या इंग्रज बंडवाल्या प्रजेनें आपल्या राजास देहांत-शासन

दिलें, त्याप्रमाणें रशियन प्रजेनें आपणास मृत्यूची शिक्षा न देतां नुसतें काळेंपाणी दाखविलें याबद्दल झारसाहेबांनीं त्यांचे आभारच मानले पाहिजेत. ”

त्या वेळच्या केसरींतील हा मजकूर मला तेव्हां फारच मननीय वाटला व आजही वाटतो. कारण आज पंचवीस वर्षांनंतरसुद्धां सगळें जग हालविणाऱ्या त्या रशियन क्रांतीबद्दल स्वतःस राजकीय पुढारी म्हणविणाऱ्या लोकांतही अज्ञान आणि गैरसमज दिसून येतो.

लहानपणापासून माझीं राजकीय मतें राष्ट्रीय पक्षाकडे झुकतीं होतीं; मागील महायुद्धांत ब्रिटिश सरकारचा जय व्हावा म्हणून मला शाळेंत दुसऱ्या मुलांबरोबर प्रार्थनेसाठीं उभें केलें असतां मी माझा वर्ग तावडतोब सोडल्याचें आठवतें. माझे वडील त्याच शाळेंत मास्तर असल्यामुळें इतरांपेक्षां मला छडीचा प्रसाद अधिक मिळाला हें निराळें सांगणें नकोच. ह्या घटना व हिंदुस्थानांतील राष्ट्रीय आंदोलनें ह्यांमुळें पुढें माझे विचार विशेष जहाल बनले. ज्याप्रमाणें कोणतेही परकीय सरकार आपल्या जिंकलेल्या प्रजेस छळतें तशीच झारशाही आपल्या रशियन प्रजेला छळीत होती; म्हणून झारशाहीचा नायनाट करणाऱ्या रशियन क्रांतीकडे माझें मन विशेष ओढलें गेलें. लेनिनचा साधेपणा आणि त्याची चीन, इराण व हिंदुस्थान यांसारख्या पौर्वात्य देशांकडे सहानुभूतीनें पहाण्याची वृत्ति यामुळें मी लेनिनचा चहाता बनलों आणि रशिया हें माझें एक अत्यंत आवडीचें राष्ट्र होऊन राहिलें.

कॉंग्रेसच्या कलकत्ता येथील १९२८ सालच्या अधिवेशनास हजर रहाण्यासाठीं प्रवास करीत असतां माझ्या डब्यांत असलेल्या खादीवेशांतील बऱ्याच तरुण पुढाऱ्यांची व माझी ओळख झाली. ह्या पुढाऱ्यांत माझा मित्र युसुफ मेहेरअल्लीहि होता. मेहेरअल्लीच्या परोपकारी स्वभावानुरूप त्यानें मला प्रवासांत व कॉंग्रेस अधिवेशनाच्या वेळींहि रशियावरील अनेक पुस्तकें चाळण्यास दिलीं. जॉन रीड याचा “Ten Days That Shook The World” हा प्रसिद्ध ग्रंथ मी गाडींतच वाचून संपविला होता. ह्याच वर्षीं जवाहरलाल यांचें “सोव्हियट रशिया” नांवाचें पुस्तक प्रसिद्ध होऊन कॉंग्रेसकरितां जमलेल्या लोकांत त्याचा विशेष बोलबाला चालू होता. ह्या पुस्तकाचा परिणाम माझ्या मनावर तीव्रतेनें झाला हें निराळें सांगावयास नकोच.

१९२९ सालीं मी केंब्रिज विश्वविद्यालयांत गणिताच्या अभ्यासासाठीं गेलों. एकदां रात्रीं मी खगोलशास्त्राच्या अभ्यासांत गर्क असतां डेव्हिड गेस्ट नांवाच्या एका इंग्रज मित्रानें मला–'पोटेम्किन'–हा सोव्हियट चित्रपट पहाण्यास ओढून नेलें. (डेव्हिड गेस्ट माझ्याबरोबर गटिंगन व मॉस्को येथें पुढील काळांत होता व तो स्पेनच्या यादवींत बळी पडला.) सोव्हियट रशियासंबंधीं अनेक ग्रंथ वाचूनही माझ्या मनावर कदाचित् जो परिणाम झाला नसता त्याहून कितीतरी अधिक अनुकूल परिणाम ह्या एका चित्रपटानें केला. त्या क्षणापासून ही नवी सोव्हियट सृष्टि स्वतः पहाण्याचा व अनुभवण्याचा माझा निश्चय अधिकच दृढ झाला.

सप्टेंबर १९३४ सालीं, माझ्या वयाच्या २६ व्या वर्षीं अनेक दिवस मनांत घोळत असलेला हा रशियाचा प्रवास एकदांचा घडला. व तेथें मार्च १९३७ पर्यंत म्हणजे एकंदर अडीच वर्षें मी राहिलों. लेखन व फोटोग्राफी यांच्या सहाय्यानें मी रशियांत स्वतःची उपजीविका चालवीत होतों.

रशियांत माझ्या ओळखीचा प्रथम एकहि माणूस नव्हता; परंतु थोड्याच काळांत तेथें माझ्या बऱ्याच ओळखी झाल्या. कामगार, सैनिक, लेखक व अनेक कलानिपुण अशांपैकीं पुष्कळ लोक माझे चांगलेच स्नेही बनले. इतकेंच नव्हे तर मॉस्को व लेनिनग्राड हीं शहरें मला मुंबई इतकींच आपलींशी वाटूं लागलीं. रशिया व रशियन लोक ह्यांच्याबद्दल मला प्रेम व आदर असल्यामुळें रशियन भाषा शिकण्याचाहि मी झटून प्रयत्न केला. रशियन भाषा शिकल्यामुळें सोव्हियट समाजाशीं मला एकजीव होणें शक्य झालें; व रशियन भाषेंतील अप्रतिम वाङ्मयाचा आस्वाद घेणें मला सुलभ होऊन आजच्या रशियाच्या जीवनाचें गूढ बरेंचसें स्पष्ट झालें.

जें कांहीं मला सोव्हियट रशियांत दिसलें व जी कांहीं माहिती आज बरीच वर्षें मी गोळा करीत आहें तिचा आढावा थोडक्यांत व सुलभ रीतीनें या छोटे-खानी पुस्तकांत मी दिला आहे. मार्क्स आणि लेनिन ह्यांच्या तत्त्वज्ञानाचें प्रति-पादन करणें हा माझा हेतु नाहीं.

आतां क्षणभर असें समजा कीं तुम्ही माझ्याबरोबर सोव्हियट रशियाच्या प्रवासास निघालां आहांत.

# २

## मॉस्कोच्या मार्गावर—

सरळ मार्ग म्हणजेच धोपट मार्ग अशी तुमची कल्पना असेल तर हिंदुस्थानांतून सरळ मॉस्कोला जाण्याचा प्रयत्न करा. रशियाची सीमा हिंदुस्थानास भिडत असूनही ह्या दोन अफाट देशांत मुळींच दळणवळण कां नाहीं ह्याचा थोडा विचार करा, म्हणजे ब्रिटिश राजकर्त्यांना सोव्हियट विचारांची वाटत असलेली भीति हें कारण कदाचित् तुमच्या सहज ध्यानांत येईल.

मॉस्को हें दुसऱ्या भू–गोलावर नाहीं. तें आपल्या याच छोट्या पृथ्वीवर असून लंडनपेक्षांही आपल्याला जवळ आहे. असें असूनसुद्धां आपल्या लोकांस रशियाबद्दलची माहिती फारच थोडी आहे. भांडवलशाहीवर चालणारीं सगळींच राष्ट्रें रशियाकडे बहुधा संशयी वृत्तीनें पहातात. सोव्हियट जीवनाचा अभ्यास करणारा माझ्यासारखा विद्यार्थी यामुळें केव्हांतरी सरकारी रोषास पात्र ठरतो. अशा वातावरणांत मॉस्कोला जाण्याचा परवाना मिळविणें फारच कठीण होतें. केवळ हा परवाना मिळविण्यासाठीं मला पांच वर्षें तपश्चर्या करावी लागली !

मॉस्कोला पोहोंचण्यापूर्वीं मी जर्मनींत गणिताचा अभ्यास करीत होतों. जर्मनींतहि सोव्हियट जीवन आणि सोव्हियट चित्रपट या विषयांचा माझा अभ्यास चालूच होता. फावल्या वेळांत जर्मन विद्यार्थ्यांबरोबर मी मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचाही अभ्यास करीत असें, तसेंच रशियन भाषेचा ओनामा मी मारबुर्ग ( जर्मनी ) विश्वविद्यालयांत शिकलों. हा सर्व खटाटोप सोव्हियट रशियाच्या प्रवासासाठीं होता.

जर्मनींतील माझ्या शिक्षणाचा काळ फार अशांततेचा होता. कारण हिटलरशाहीच्या उदयाचा हा काळ होय. हिटलर अधिकारारूढ झाल्याबरोबर केवळ सोव्हियट जीवनाचा अभ्यास हाच गुन्हा ठरून मला एक महिना नाझी तुरुंगाचा

अनुभव घ्यावा लागला. नाझी अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून इंग्लंडचे त्यावेळचे परराष्ट्रमंत्री सर जॉन सायमन यांनीं 'तेंडुलकर हा कम्युनिस्ट आहे म्हणून त्याला तुरुंगांत ठेवण्यांत आलें' असें पार्लमेंटमध्यें जाहीर केलें. अशा संशयाच्या परिस्थितींत मला जर्मनीमध्यें शिक्षण घेणें अशक्य झालें. १९३४ सालीं मॉस्कोकडे दृष्टि लावून उलट दिशेनें मी पॅरिसला निघालों.

मी कम्युनिस्ट पार्टीचा सभासद कधींही नव्हतों. माझा व्यासंग फक्त नवें सोव्हियट जीवन जाणण्याचा होता. मॉस्कोला जाणें शक्य व्हावें म्हणून मी प्रसिद्ध फ्रेंच लेखक रोमे रोलां ह्यांची मदत मागितली. त्यांना माझा परिचय करून द्यावा म्हणून पत्रासोवत मी माझे हिंदुस्थानांतील बहुजनसमाजाच्या जीवनाचे फोटो पाठविले. रोलां यांस माझी मॉस्कोला जाण्याची इच्छा पसंत पडून पॅरिसमधील तेव्हांचे सोव्हियट वकील लुनाचार्स्कि ह्यांच्यामार्फत त्यांनीं मला खटपट करण्यास सांगितलें. ह्या सल्ल्यास अनुसरून केलेल्या पत्रव्यवहारांत माझा सोव्हियट जीवनाचा प्रत्यक्षपणें अभ्यास करण्याचा हेतु मी स्पष्ट केला होता. त्यांनीं माझ्याबद्दल खटपट केली पण मॉस्कोहून मला बराच काळपर्यंत निश्चित असें उत्तर न मिळाल्यामुळें मी इंटुरिस्ट ( Intourist ) नांवाच्या सोव्हियट मुशाफरसंस्थेच्या मार्फत कच्चा परवाना मिळविला.

ह्या कच्च्या परवान्याच्या जोरावर कोणासही रशियांत सहा आठवडे रहाण्याची मुभा मिळत असे. रशियाच्या या प्रवासांत माझ्याबरोबर इंग्रज टीकाकार मारी सीटन ही बाई होती. सीटनची ओळख बऱ्याच प्रमुख सोव्हियट नागरिकांशीं असल्यामुळें थोड्याच अवधींत रशियांत रहाण्याचा पक्का परवाना मिळवितां येईल अशी मला आशा वाटूं लागली.

मॉस्कोच्या प्रवासांत माझ्या मास्कोबद्दलच्या कल्पनातरंगापलीकडे नमूद करण्याजोगें कांहीं घडलें नाहीं. रशिया व पोलंडच्या सरहद्दीवरील नेगाराल्ये स्टेशनवर सर्व प्रवाश्यांची कसून तपासणी करण्यांत आली. तपासणी करण्यांत दोन पुरुष व एक स्त्री होती. ह्या स्त्रीचें काम प्रवाश्यांजवळील पुस्तकें व कागदपत्र काळजीपूर्वक चाळून पहाणें हें होतें. तिला पांच सहा युरोपियन भाषा अवगत होत्या. ह्या तपासणी-अम्मलदारांची वागणूक सर्वांशीं सभ्यपणाची होती. तथापि सभ्यपणापायीं आपल्या कामांत ते मुळींच कुचराई होऊं देत नव्हते. प्रवाश्याला बरोबरच्या

सामानावर जकात भरावी लागत नाहीं. पण आपल्याबरोबर आणलेल्या पैशांची व किमती सामानाची पासपोर्टवर नोंद करून घ्यावी लागते. कारण रशियांत प्रवेश करतांना आणलेल्या द्रव्यापेक्षां अधिक द्रव्य रशियांतून बाहेर पडतांना नेण्याची सक्त मनाई आहे.

इतर देशांतील स्टेशनांप्रमाणें सोव्हियट स्टेशनावर व्यापारी जाहिराती नाहींत; मात्र त्यांच्याऐवजीं एकदम डोळ्यांत भरण्यासारखीं मोठमोठाल्या आकाराचीं सचित्र सुभाषितें तेथें लावलेलीं दृष्टीस पडतात. तसेंच कोयता व हातोडा या चिन्हांच्या विशाल पताका सूर्याप्रमाणें स्टेशन सोडीपर्यंत डोळ्यांपुढें फडकत असतात. ह्या लाल पताकांवर निरनिराळ्या भाषांत "सर्व देशांतील कामगारांनो एक व्हा" अशीं सूत्रें सोनेरी अक्षरांत लिहिलेलीं आढळतात. सोव्हियट सीमेचें रक्षण करण्यासाठीं संगिनीचा पहारा करीत लाल शिपाई डौलानें उभा राहिलेला दिसून येतो. ह्या सैनिकाच्या चेहेऱ्यावर आपल्या कर्तबगारीचा व निष्ठेचा छाप स्पष्टपणें दिसतो. हा सीमेवरच्या शेतकरी वर्गांतील शिपाई म्हणजे असल्या लाखों लाल शिपायांची आठवण देणारा एक पुतळाच होय.

# ३

## भाई, तिकीट !

नेगारेल्यापासून मॉस्कोपर्यंतचा प्रवास मी सोव्हियट नागरिकांबरोबर दुसऱ्या वर्गानें केला. रशियन आगगाडीवर केवळ दोनच वर्ग असतात. एक गादीचा व दुसरा साध्या फळ्यांचा. दोन्ही वर्गांत प्रत्येक प्रवाशाला झोपण्यासाठीं जागा मिळते; कारण रशियांत कधीं कधीं दहादहा दिवस देखील सतत प्रवास करण्याची पाळी येते. प्रवासांत दोन रुबल ( एक रुपया ) दिल्यानें गादी, उशी व चादर मिळते. यामुळें फळ्यांच्या वर्गाचें सहज ' मऊ ' ( गादीच्या ) वर्गांत रूपांतर करतां येतें.

सोव्हियट प्रवासी चटकन् ओळखतां येतो. कारण इतर युरोपियन प्रवाशांसारखा त्याचा पोषाख ऐटदार नसतो. तसेंच त्याच्या चेहऱ्याची ठेवण स्लावजातीच्या लोकांप्रमाणें रुंद असते. त्याचा स्वभाव मनमिळाऊ व मोकळेपणाचा असा आढळतो. आगगाडीच्या अम्मलदारांत बायका व पुरुष असतात. अधिकारी स्त्रियांच्या डोक्यावर टोपी असून त्यावरील लाल तारा तिच्या सोनेरी केसांना विशेष शोभा देतो.

एक टिकिटकलेक्टर स्त्री आमच्याकडे येऊन मंजुळ आवाजानें " भाई, तिकिट दाखवा ! " असें म्हणाली. मधून मधून ती प्रवाशांच्या मुलांबाळांबरोबर खेळतहि असे व इतर लोकांशीं प्रेमळपणें बोलत असे. या प्रवासांत सोव्हियट माता आपल्या बालकांस उघडपणें दूध पाजीत असल्याचें मला दिसून आलें. हें दृश्य युरोपमध्यें इतरत्र पहाण्यास सांपडत नाहीं. ' गाईचें दूध वासराला व मातेचें बालकाला ' अशी रशियन म्हण आहे. सोव्हियट माता आपल्या बालकांस कधींही टाकून बोलत नाहींत किंवा मारीत नाहींत. नव्या सोव्हियट शिक्षणाचें हें एक दृश्य फल आहे.

प्रवासामध्यें रशियन नागरिक कोणालाही परकेपणानें वागवीत नाहींत. इतकेंच नव्हे तर तुमची ओळख करून घेण्यासाठीं तोच आधीं तुमच्याशीं बोलावयास सुरवात करतो. तुमच्यावद्दल तो बरीच माहिती विचारील परंतु स्वतःची मात्र टिमकी वाजविणार नाहीं. सोव्हियट लोकांस वर्णभेदाचा संसर्गही नसतो. तसेंच

आपण एक श्रेष्ठ राष्ट्राचे नागरिक आहोंत असेंहि तो दाखवीत नाहीं. तुमच्या कप-ड्यांकडे तो कौतुकानें पाहील; कारण स्वतःच्या कपड्याकडे लक्ष देण्यास त्याला सवडच नसते. परंतु याचा असा अर्थ नव्हे कीं तुमची किंमत तो तुमच्या पोषाखा-वरून करील. प्रत्येक डब्यांत परकीय भाषेचा अभ्यास केलेला नागरिक हटकून आढळतोच आणि तो तुमची ओळख दुसऱ्या प्रवाशांस करून देतो.

तुमच्याकडे रशियन मुलगी उत्सुकतेनें न्याहाळत असली तरी असें समजूं नका कीं तुमच्यावर ती फिदा झाली आहे. थोड्याच वेळानें तुम्ही कुठून आलां व तुमचा उद्योग काय म्हणून ती न लाजतां सरळ प्रश्न विचारील. एखादा रशियन प्रवासी मजेंत तुम्हांस विचारील कीं ' रशियन स्त्रीचें सौंदर्य तुम्हांस कितपत पसंत आहे ? ' ह्या प्रश्नावर मुली निष्कपटपणानें हंसतील आणि तुमच्या कृष्ण वर्णाची, काळ्या डोळ्यांची व नाजुक हातांची स्तुति करतील. तसेंच त्या हिमालयपर्वताच्या सौंदर्याची आठवण देतील किंवा कालिदास आणि टागोर ह्यांच्या ग्रंथाबद्दल पृच्छा करतील. परंतु इतर गोऱ्या लोकांप्रमाणें हिंदी गारुडी, संन्यासी किंवा महाराजे ह्यांच्याबद्दल त्रसुद्धां काढणार नाहींत. याप्रमाणें प्रवास चालू असतां मध्येंच एकदम डब्यांतील मुली व मुलें सुस्वर आवाजांत गाऊं लागलीं.

रशियाचें हें एक वैशिष्ट्य आहे. संगीत हें रशियनांचें जीवन म्हटलें तरी चालेल. ह्या मधुर गाण्यांचा परिणाम कोणाच्याही मनावर चटकन् व कायमचा होतो. आदरसत्कार हा रशियनांचा एक प्रमुख गुण आहे आणि प्रवासांत तो स्पष्टपणें अनु-भवास येतो. लिंबाचा चहा व काळी रोटी तुम्ही स्वीकारावी म्हणून रशियन लोक तुम्हांला आग्रह करतांना दिसतील. रशियनाला बोलण्याची फार आवड आहे. तो कधींही दुर्मुखलेला नसतो. रात्रीं तो उशिरां झोपीं जातो. व्होडका नांवाची दारू तो मोठ्या आवडीनें पितो. परंतु त्यावेळींसुद्धां त्याचें दांडगाईचें वर्तन नसतें.

याप्रमाणें प्रवासांत निरनिराळे अनुभव घेत व रशियन संगीताच्या सुरांत मी झोपीं गेलों व दुसऱ्या दिवशीं सकाळीं डोळे उघडतों तों मॉस्को स्टेशन आलेलें दिसलें.

हा दिवस म्हणजे १ सप्टेंबर १९३४.

# ४

## लाल राजधानींत

मॉस्कोच्या स्टेशनवर सामान उचलण्यास मला हमालच मिळेना. रशियांत कुठेंही हमालीची प्रथा नाहीं. राष्ट्राच्या प्रगतीकरितां सतत चालू असलेल्या नवनवीन योजनांमध्यें मनुष्यबलाची मोठ्या प्रमाणांत जरूर लागत असल्यामुळें केवळ हमालीकरितां मनुष्यबळ मिळणें कठिण झालें आहे. यामुळें तुमचें सामान तुम्हांला स्वतः हलवावें लागतें किंवा तें काम सोव्हियट मुशाफरसंस्थेकडे सोपवावें लागतें. माझ्या बाबतींत माझ्या रहाण्याची, जेवणाची, सामानाची, वाटाड्याची सोय इंटुरिस्ट-संस्थेनें केली होती. कच्चा परवाना मिळवितांना परत-प्रवासाच्या तिकिटाचा दर व होटेलचा पंधरवड्याचा खर्च आगाऊ द्यावा लागतो. पंधरवड्यानंतर तुमची जेवणाची व झोपण्याची सोय करण्यास तुम्हांला मुभा मिळते; पण मॉस्कोंत रहाण्याच्या जागेचा इतका तुटवडा आहे कीं ते जुळणें जवळजवळ अशक्य असतें.

माझी सोय मॉस्को–होटेलमध्यें झाली होती. हें होटेल मॉस्को नदीच्या एका तीरावर असून समोरच पलीकडच्या तीरावर क्रेम्लिनचा किल्ला आहे. माझ्या होटेलमधील परदेशी प्रवाश्यांत निरनिराळ्या वर्णाचे काळे, पिवळे आणि गोरे लोक होते. आमच्या जेवणाची सोय उत्तम होती. पण वाढपी मात्र फारच मंद होते. ह्या वाढप्यांपैकीं बरेचसे वाढपी झारशाहींतही हेंच काम करीत असत. परकीय भाषांचें ज्ञानहि त्यांना होतें, परंतु नव्या सोव्हियट अमदानींत दुसरें कोणतेंच काम त्यांना जमणें शक्य नव्हतें; होटेलचा मुख्य अधिकारी सरकारी असून अतिश्रमामुळें तो थोडासा चिडखोर भासत असला तरी आपल्या कामांत मात्र तो निपुण होता.

असल्या होटेलमध्यें रहाणारे प्रवाशी बहुधा केवळ आपल्या कल्पनेच्या जोरावर रशिया हा स्वर्ग आहे असें सुरवातीस समजतात. परंतु हेच लोक पुढें, त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांच्या गरजा पुऱ्या होईनाशा झाल्या कीं तितक्याच जोरानें रशिया हा नरक आहे असें म्हणण्यासही मागेंपुढें पहात नाहींत. ह्यांचीं

मतें एखाद्या ढेकणाच्या किंवा डांसाच्या उपद्रवानेंसुद्धां तात्काळ बदलूं शकतात.

इंटुरिस्ट ही संस्था रशियाची चांगली बाजू तेवढीच दाखविते असें म्हणणारेहि लोक आहेत. मी ह्या मताचा नाहीं. उलट मी माझ्या अनुभवावरून असें निश्चितपणें सांगूं शकतों कीं दुसऱ्या कुठल्याही मुशाफरसंस्था इंटुरिस्ट संस्थेइतका प्रवाश्यांसाठीं त्रास घेत नाहींत. लष्करी गुपित गोष्टींच्या बाबतींत मात्र सोव्हियट यूनियनमध्यें फार काळजी घेतली जाते व त्यामुळें साहजीकच फोटो व चित्रें काढणारांस पुष्कळ ठिकाणीं अडथळा केला जातो.

इंटुरिस्टमध्यें काम करणारांत बायकांचा भरणा जास्त आहे. प्रवाश्यांना एकंदर शहर दाखविण्याचें काम बायांवर पडतें; कारण रशियांत पुरुषांपेक्षां बायकाच परकीय भाषांचा अभ्यास जास्त करतात. त्या सर्वांशीं अदबीनें व सभ्यपणानें वागतात व बक्षिसाचाहि स्वीकार करीत नाहींत. प्रवाश्यानें मॉस्कोंत पाय टाकल्याबरोबर त्याला मोटारींतून तें शहर दाखविण्यांत येतें. इंटुरिस्टमार्फत आलेल्या प्रवाश्यांना वस्तुगृहें, ऐतिहासिक स्थळें, सिनेमा, नाटकगृहें, कामगार लोकांच्या वसाहती, तसेंच नवीं औद्योगिक आणि सामुदायिक शेताचीं ठिकाणें यथेच्छ पहावयास मिळतात.

मॉस्कोबद्दलची बरीवाईट ख्याति मी तेथें जाण्यापूर्वी ऐकिली व वाचली होती. मॉस्को हें रुक्ष व भिकार शहर आहे असें कांहीं लोक सांगतात. मॉस्कोची वस्ती फारच दाट आहे तसेंच लोकांचा पोषाख सामान्यपणें अव्यवस्थित व साधा असतो हेंहि खरें आहे; पण ह्यामुळें तें शहर उदासवाणें वाटतें असें मात्र नाहीं. उलट नुकत्याच सुरू झालेल्या जत्रेसारखें मॉस्को हें शहर अतिशय गजबजलेलें व उल्हासी असल्याचें तात्काळ अनुभवास येतें. इंग्लंडच्या सुविख्यात वेब ( सिडने व बिआट्रिस ) दंपत्यानें आपल्या ग्रंथांत म्हटल्याप्रमाणें सोव्हियट ही नवी संस्कृति असून मॉस्को हें त्या संस्कृतीच्या प्रयोगाचें केंद्रस्थान आहे; हें मॉस्कोस जाणारांनीं लक्षांत बाळगणें अवश्य आहे.

इतर शहरांप्रमाणें मॉस्कोची वाढ क्रमाक्रमानें झालेली नाहीं. रानें व दलदलीच्या प्रदेशामध्यें मॉस्को शहर झपाट्यानें उभारलें गेलेलें आहे. पूर्वी मॉस्को हें एक खेडेगांव होतें आणि त्यामुळें आज देखील तेथचे बरेचसे रस्ते अरुंद व वाकडेतिकडे

दिसून येतात. प्राचीनकाळीं किल्ल्याभोवतीं वर्तुळाकार शहरी वस्ती वाढावयाची असा प्रघात होता. मॉस्कोची वाढ अशाच रीतीनें झालेली आहे. जुन्या रशियन म्हणीप्रमाणें–'मॉस्को कालानुरूप वाढलें व सेन्ट पिटर्सबर्ग पैशांवर वाढलें.' आणि या म्हणीचें सार्थकत्व मॉस्को पहाणारांच्या अनुभवासहि येतें.

प्राचीनकाळापासून मॉस्को शहराला विशेष महत्त्व येण्याचें कारण म्हणजे मॉस्कोच्या आसपास बरेचसे नदीनाले आहेत हें होय. ह्यामुळें शहराचें रक्षण करणें जसें सुकर होतें तसेंच जलमार्गानें परकीय मुलुखांवर स्वाऱ्या करणेंहि सोपें जात असे.

वाकडेतिकडे अरुंद रस्ते व चौक, मधूनच मोठ्या उघड्या जागा व दुतर्फा झाडें लावलेले लांबच लांब रस्ते, भव्य स्मारकें, जुन्या व्यापाऱ्यांच्या व सरदारांच्या सुंदर हवेल्या, लाल, हिरव्या व सोनेरी रंगाच्या घुमटांचीं असंख्य देवालयें, जवळच दगडी घाणेरडे रस्ते, हें दृश्य मॉस्कोंत आजतागायत शिल्लक आहे पण हा जुन्या राजपद्धतीचा अवशेष होय.

आजच्या रशियाच्या उन्नतीची खरी कल्पना झारशाहींतील रशियाच्या स्थितीचा अभ्यास केल्याशिवाय होणार नाहीं. जुन्या मॉस्कोचें वर्णन करतांना स्टीफन ग्रॅहाम नांवाचा प्रसिद्ध इंग्रज लेखक लिहितो कीं, "अत्यंत गारठ्यांतही केवळ एक सुती कपडा पांघरून उघड्या रस्त्यावर झोपलेले अनेक पुरुष व बाया खित्री मार्केटजवळ आढळून येतात. असे लोक ५०,००० वर आहेत, व त्यामुळें शहरावर जणूं काय त्यांचाच कबजा आहे असें म्हणावें लागतें. गटारांचे जसे उंदीर मालक तसे हे भिकारी रस्त्यांचे मालक बनले आहेत. या भिकाऱ्यांना घालवून लावल्यास बरें होईल." सोव्हियट अमदानींत भिकेचें मूळच नष्ट झालें आहे. आज प्रत्येक सुदृढ पुरुषाला व स्त्रीला काम करावें लागतें व देशांतील सर्व संपत्ति बहुजनसमाजाच्या हितासाठीं सोव्हियट सरकार खर्च करीत असतें.

आजकाल मॉस्को दरघडीस बदलत आहे. मॉस्कोमध्यें मोटारी, ट्राम, व बसगाड्यांतून तसेंच लॉऱ्यांतून रात्रंदिवस माणसें कामावर जात असतांना दिसून येतात. रस्त्यावरील रहदारीची गर्दी कमी व्हावी म्हणून जमिनीच्या खालीं विजेनें चालणाऱ्या नव्या गाड्याहि सुरू केलेल्या आहेत. परंतु इतकें करूनहि वहातुकींचीं साधनें अपुरींच पडत आहेत. मॉस्को शहराच्या या बदलत्या स्थितीकडे पहातां

एखाद्या नागाप्रमाणें आपलें जुनें रूप फेंकून मॉस्को शहर नवें रूप धारण करीत आहे अशी कल्पना मनांत आल्याशिवाय रहात नाहीं. पूर्वीच्या गलिच्छ व रूक्ष जागा आज स्वच्छ व फुलझाडांनीं व्यापलेल्या आढळून येतात. तसेंच नवे नवे मोठमोठाले चौक व उंचउंच इमारतीहि आज बांधल्या जात आहेत. एक प्रकारें मॉस्कोचा सांगाडाच आमूलाग्र बदलत आहे. जगांतील मोठमोठ्या शहरांत मॉस्कोचा नंबर तिसरा असून, त्याची लोकसंख्या ४० लाख आहे. अफाट वस्तीच्या प्रचंड शहरांमध्यें इतक्या जलद रीतीनें अवश्य त्या सुधारणा झाल्याचें उदाहरण इतिहासांत तरी सांपडत नाहीं.

शहराच्या मध्यभागीं एका टेकडीवर क्रेम्लिनचा किल्ला ( ज्याला रशियांत 'क्रेमल' म्हणतात ) असून, त्याची बांधणी पौर्वात्य शिल्पशास्त्रास अनुसरून केलेली आहे. किल्ल्याच्या जमिनीचें क्षेत्रफळ १०० एकर आहे व त्याभोंवतीं उंच व भक्कम तट असून त्याला मोठाले पांच दरवाजे व एकोणीस बुरूज आहेत. तटाच्या आंत लहानमोठ्या अनेक हवेल्यांचा समावेश होतो. "मॉस्कोच्या डोक्यावर क्रेमल, आणि त्याच्यावर तारे" अशी जुनी रशियन म्हण आहे. आज ती शब्दशः खरी झालेली आहे. आज क्रेमलच्या हिरव्या बुरुजांवर झारच्या गरुडाऐवजीं सोव्हियटचे लाल रुबींचे पंच-कोनी तारे झळकत आहेत. तसाच कामकरी सत्तेचा निदर्शक असा कोयता-हातोडा चिन्हांकित भव्य लाल बावटाहि शेजारीं डौलानें फडकतांना दिसतो; आणि त्यांच्या जोडीला क्रेमलवरील घड्याळ दर रात्रीं बारा वाजतां सोव्हियट राष्ट्रगीताची ( म्हणजेच "इंटर-नॅशनल"ची ) घोषणा करीत असतें.

ज्याला लाल-चौक ( Red Square ) म्हणतात तो क्रेम्लिनच्या उत्तरेस आहे. ह्या चौकाच्या दक्षिणेच्या कोनांत लेनिनची समाधि आहे. ह्या ठिकाणीं कांचेच्या पेटींत लेनिनचा देह ठेवलेला असून त्याचें दर्शन घेण्यास लांबलांबच्या अंतरावरून अनेक लोक दररोज येतात. लेनिनच्या अचाट कार्याची कल्पना असलेल्या लोकांना हें स्थान एखाद्या तीर्थासारखें पवित्र व स्फूर्तिदायक वाटणें साहजिक आहे. "मे-दिन" व "ऑक्टोबर क्रांति-दिन" ह्यांसारख्या महत्त्वाच्या प्रसंगीं लाल चौकांत लेनिनच्या समाधीसमोर मॉस्कोंतील हजारो रहिवाशी व लाल फौजा उभ्या रहातात व नंतर सलामीचें कूच करतात. क्रांतीचा मुख्य नेता जो लेनिन त्याचें पुण्यस्मरण या दिवशीं लोकांना घडतें.

लाल चौकाच्या सभोंवतीं अनेक सरकारी कचेऱ्या, वस्तुगृहें आणि पुरातन व प्रसिद्ध सेंट-बॅसिल नांवाचें देऊळ आहे. ह्या देवळाच्या शिखरावर अननसाच्या आकाराचे रंगीबेरंगी घुमट असून त्याच्या तळमजल्याचा एक भाग वस्तुगृहासाठीं वापरण्यांत येतो, व दुसऱ्या भागांत जुन्या मूर्ती पहावयास मिळतात. ह्या मूर्तींची प्रार्थना अजून कांहीं एकटे दुकटे वृद्ध इसम करतांना आढळतात.

एकाद्या इसमाचे डोळे बांधून जर त्याला मॉस्को शहरांत आणलें व त्याचे डोळे सोडून त्याला मॉस्को शहर पहाण्यास सांगितलें तर त्याला आपण कुठल्या तरी विशिष्ट अशा अदृष्टपूर्व शहरीं आल्याचें लगेच कळून येईल. ह्याचें एक कारण म्हणजे इतर शहरांतून दिसणाऱ्या व्यापारी जाहिराती त्याला तेथें कोठेंही दिसणार नाहींत. आमचा माल तुम्ही खरेदी करा अशा अर्थाचा प्रयत्न ह्या शहरांत औषधालासुद्धां सांपडणार नाहीं. लोकांचें मन वेधण्यासाठीं स्त्रियांच्या चित्रांचा उपयोग सोव्हियट नियतकालिकांकडून केला जात नाहीं. शृंगारिक चित्रांची पोष्ट-कार्डें तुम्हाला मॉस्कोंत मिळणार नाहींत. बलात्कार आणि खून यांच्या बातम्यांनीं भरलेलीं वर्तमानपत्रें मॉस्को शहरांत नाहींत. दुसऱ्या देशांप्रमाणें व्यापारी जाहिरातीचा उपयोग मॉस्को शहरांत जरी करण्यांत येत नसला, तरी उपदेशपर सचित्र मोठीं पत्रकें मात्र जाहिरातीप्रमाणें रस्त्यांतून, सिनेमा-नाटक गृहांतून व वस्तुसंग्रहांतूनही पहावयास सांपडतात.

सोव्हियट यूनियनमध्यें मोठ्या उद्योगधंद्याच्या व प्रचंड कारखान्यांच्या दृष्टीनें मॉस्कोचा नंबर पहिला लागतो. ह्या शहराच्या कुठल्याही भागांतून कारखान्यांच्या उंच उंच चिमण्यांची रांगच्या रांग दिसते. जुन्या लाकडी इमारतीऐवजीं नव्या दगडी भव्य इमारती आणि जुन्या ओबडधोबड रस्त्यांच्या जागीं नवे डांबरी रस्ते मॉस्को शहरांत दिसून येतात. मॉस्कोंतील जमिनीखालून जाणाऱ्या विजेच्या गाड्या, एकंदर शहराचे अकस्मात् बदललेलें स्वरूप, व्होल्गा नदीस मॉस्को नदी जोडण्या-साठीं केलेला नवा कालवा हीं कामें सोव्हियट यूनियनच्या अफाट उद्योग धंद्याच्या उत्कर्षाची स्पष्ट द्योतक आहेत. हा नवा अजस्र कालवा उत्तरेस बाल्टिक समु-द्राची व दक्षिणेस काळ्या-पांढऱ्या समुद्रांची मॉस्को शहराशीं गांठ घालून देतो; हें ध्यानांत आणलें म्हणजे ह्या कार्याची कल्पना सहज येईल.

पंधराव्या शतकापासून मॉस्कोच्या आजूबाजूच्या खेडेगांवांतून चाललेल्या निर-निराळ्या घरगुती धंद्यांची ख्याती होती. सतराव्या आणि अठराव्या शतकांत पहि-

त्यांदा सुती, लोकरी व रेशमी कापडाचे मोठे कारखाने ह्या ठिकाणीं उभे करण्यांत आले. १८३० नंतर बाहेर देशांतून येणाऱ्या मालाविरुद्ध जकातीची भिंत उभारल्यामुळें व सरकारच्या इतर मदतीमुळें मॉस्कोचे धंदे झपाट्यानें वाढूं लागले. पहिलें महायुद्ध (१९१४–१९१८) सुरू होण्यापूर्वी सबंध रशियाला प्रामुख्यानें मॉस्कोचे कारखाने माल पुरवीत असत. आज खुद्द मॉस्को शहरांत युरोपमधील कारखान्यांस लाजविणारे स्टालिन मोटर–कारखाना व बॉल-बेअरींगचा कारखाना यासारखे नवे प्रचंड कारखाने दिसून येतात.

लाखों माणसांना राहण्यासाठीं आज मॉस्कोमध्यें २५०० नव्या इमारती आहेत. लोकांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष दिलें जात असून, प्रत्येक मोठ्या कारखान्यांत दवाखाने उघडण्यांत आलेले आहेत.

संस्कृतीच्या दृष्टीनें सुद्धां मॉस्कोला आज विशेष महत्त्व आलेलें आहे. ह्या शहरांत शिक्षणाचीं अनेक स्थानें असून प्राचीन कालापासून शास्त्रीय संशोधनाचें प्रख्यात असें विश्वविद्यालय मॉस्कोंतच आहे.

सध्या मॉस्कोमध्यें २१२ वस्तुसंग्रहालयें व ५६५ वाचनालयें आहेत; तसेंच इझवेस्तिया नांवाचें मुख्य सरकारी पत्र आणि कम्युनिस्ट पार्टीचें प्राव्हडा हें वर्तमानपत्र मॉस्कोंत प्रसिद्ध होत असून अनेक दुसरींहि वर्तमानपत्रें व मासिकें निरनिराळ्या भाषांतून छापलीं जात आहेत. सर्वांत मोठें वाचनालय लेनिन वाचनालय हें असून त्यांत ९० लाख ग्रंथ आहेत.

व्यायामी खेळांचीं साधनें मॉस्को शहरांत बरींच आहेत. मॉस्कोंतील 'डायनामो' क्रिडांगणांत ९० हजार प्रेक्षक एका वेळीं मावतात. एक लक्ष प्रेक्षकांची सोय होईल असें खेळण्याचें दुसरें नवें मैदान तेथें बांधीत आहेत. गॉर्कींच्या नांवानें मॉस्को शहरीं एक विराट् बगीचा लाखों नागरिकांच्या मदतीनें बांधलेला आहे. ह्या बगीच्याचा फायदा दररोज ७०,००० लोक घेतात. बगीच्यांतच सिनेमा, उघडें नाटकगृह, संगीताच्या (गायन-वादन व नृत्यांच्या) जागा, निरनिराळ्या खेळांसाठीं पटांगणें, पोहण्यासाठीं तलाव, वाचनालयें, शिशुसंगोपनाची सोय आणि विश्रांतीचीं ठिकाणें आढळतात. मॉस्कोंत आणखीं १० मोठे सार्वजनिक बगीचे असून केवळ बालकांसाठीं २८ बगीचे आहेत. सिनेमापेक्षां नाटकगृहें मॉस्कोंत जास्त आढळून येतात. मॉस्कोंतील नाट्यकलेची ख्याती जगभर झालेली आहे. मॉस्कोचें वैशिष्ट्य म्हणजे ह्या शहरांत केवळ बालकांकरितां तीन नाट्यगृहें

असून त्यांत बालकांसाठीं मुद्दाम लिहिलेलीं नाटकें पहावयास मिळतात. तसेंच मुलां-मुलींना पहाण्यास योग्य असे चित्रपट आणि त्यांच्यासाठीं मुद्दाम बनविलेले चित्रपट मॉस्कोंतील बालकांच्या तीन सिनेमागृहांत दाखविले जातात. सोव्हियट यूनियनमध्यें केवळ बालकांसाठीं म्हणून १५० सिनेमागृहें आहेत. १६ वर्षांखालील मुलां-मुलींस दुसऱ्या सिनेमागृहांत जाण्याची सक्त मनाई आहे. पण मॉस्कोंतील प्रत्येक मूल खास आपल्यासाठीं असलेल्या सिनेमागृहांत जाऊन महिन्यांतून एकदांतरी चित्रपट पहातेंच. मॉस्को शहरांत केवळ बालकांसाठीं चित्रपट बनविण्याकरितां एक स्टूडिओहि आहे.

'शहर सोव्हियट' नांवाची संस्था मॉस्कोचा कारभार पहाते. शहराचें आरोग्य, म्युनिसिपालिटीच्या शाळा, रस्त्यांची रोषणाई इत्यादि कार्येंहि इतर देशांतील शहरांप्रमाणें मॉस्को सोव्हियट ( थोडक्यांत मोस्सोव्हियट ) म्युनिसिपालिटीचें काम संभाळते; पण त्याखेरीज बँका, व्यापार, नाटकगृहें, पोलीस कोर्टें व इतर संस्थांचें संचालन मोस्सोव्हियटच्या स्वाधीन आहे.

मॉस्सोव्हियटच्या मुख्य खात्यास प्लेनम असें नांव आहे. प्लेनमची सभा सहा आठवड्यांनीं होत असून त्याचें कार्य बरेच दिवस चालतें. सभासदांची निवडणूक दर दोन वर्षांनीं होते. अठरा वर्षांवरील कोणत्याही नागरिकास ह्या निवडणुकींत भाग घेण्याचा हक्क आहे.

झारशाहींत म्युनिसिपालिटीला फारसें महत्त्व नव्हतें, पण आज मोस्सोव्हियट ही सरकारी कारभाराची एक महत्त्वाची शाखा झालेली आहे.

इतर शहरांपेक्षां निराळें असें स्वरूप मॉस्कोचें असलें तरी त्याचा अर्थ असा नाहीं कीं तें नांदतें शहर नाहीं. उलट त्याच्या नावीन्यांत विशेष चेतना दिसून येते. मॉस्कोचा माझ्यावर झालेला परिणाम माझ्या स्मरणांत चिरकाल राहील. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मॉस्को शहरीं व्यापाराच्या जोरावर वैयक्तिक स्वार्थ साधूं इच्छिणाराला स्थान नाहीं; किंवा दुसऱ्याच्या श्रमावर कोणालाही मजा मारितां येत नाहीं. हीच तऱ्हा सोव्हियट यूनियनमधील लेनिनग्राड, स्टालिनग्राड, बुखारा वगैरे शहरीं आहे हें निराळें सांगावयास नकोच.

# ५

# पुढें काय ?

माझ्याबरोबर असलेले बरेचसे प्रवासी पंधरा दिवसांनंतर आपआपल्या देशीं जाण्यास निघाले. ह्या तुटपुंज्या अवधींतील अनुभवाच्या पुंजीवरच पुष्कळसे इसम अधिकारवाणीनें रशियाविषयीं बोलूं शकतात. परंतु मी सोव्हियट जीवन व सोव्हियट चित्रपटांचें मर्म ह्यांचा अभ्यास करण्याच्या हेतूनें गेलों असल्यामुळें मी जें पाहिलें तें फारच थोडें असें मला वाटूं लागलें. पहिल्या मुशाफरीच्या परवान्यावर मला फार तर आणखी एक महिना रहातां आलें असतें. पण पुढें काय ? असा मला विचार पडला. शिक्षणाचा व कामाचा परवाना मिळविण्यासाठीं उरलेल्या थोड्या मुदतींत मी आटोकाट प्रयत्न केला. सूर्योदयापासून रात्रौ आठ वाजेपर्यंत पायांना बिलकुल विश्रांति न देतां मॉस्कोंतील अनेक संस्कृतिविषयक संस्थांकडे मदतीसाठीं मी फिरत राहिलों. अनेकदां मला उपाशीं पोटींसुद्धां हिंडण्याची पाळी आली. प्रत्येक संस्था माझा आदरसत्कार करी पण परवान्यासाठीं मात्र दुसऱ्या संस्थेकडे बोट दाखवी. पुष्कळदां मला वाटे कीं, माझा प्रयत्न फोल ठरणार, परंतु मी आशा सोडली नाहीं व प्रयत्न करीत राहिलों.

माझी प्रवासांतील सोबतीण मारी सीटन हिनें सोव्हियट चित्रपटाचे जगद्विख्यात कर्ते म्हणजे पुडॉव्हकिन, आयसनस्टाइन व डोवझेंको ह्यांच्याशीं माझी ओळख करून दिली.

प्राचीन काळच्या हिंदी विद्यार्थ्याप्रमाणें मी बेलाबालाश नांवाच्या प्रसिद्ध लेखकाच्या घरीं परवान्याच्या मदतीसाठीं पूर्वीची ओळख नसतांनाहि गेलों. बालाशचीं सिनेमा व इतर विषयांचीं पुस्तकें मी जर्मनींत वाचलीं होतीं. रॉमे रोलां व लुनाचार्स्की ह्यांच्या मार्फत केलेल्या प्रयत्नांची हकीकत मी त्यांच्या कानावर घातली. रोलॉंला पाठविलेले फोटोही मी त्यांस दाखविले व माझ्याबद्दलची सर्व माहिती त्यांस करून दिली. हिंदी जीवनाचा व संस्कृतीचा बालाश हा मोठा

चाहता असल्यामुळें माझे फोटो त्यास फारच आवडले आणि त्याला असें वाटूं लागलें कीं, मला मॉस्कोमध्यें चित्रपटाचा अभ्यास करण्याची संधी जरूर साध्य करून दिली पाहिजे. आमची मैत्री दिवसेंदिवस वाढत गेली व पुढें त्याच्या मदतीचा मला मोठा उपयोगहि झाला.

मॉस्कोमध्यें कोणालाहि कामाची व अभ्यासाची संधी सहज मिळते. परंतु मुख्य अडथळा म्हणजे परवान्याचा–परदेशांतील इसमास कामाशिवाय परवाना मिळत नाहीं व काम परवान्याशिवाय अशक्य असतें. ह्या चक्रांतून बाहेर कसें पडावें हाच प्रश्न रात्रंदिवस माझ्यासमोर उभा होता. हें चक्र तोडण्यासाठीं शेवटीं मी बालाशबरोबर सोव्हियट ट्रेड यूनियनच्या संस्कृति–शाखेंत गेलों. ह्या संस्थेच्या मार्फत परवान्यासाठीं आम्ही बराच प्रयत्न केला व कांहीं काळानें माझ्या चिकाटीचें फळ मला मिळालें. ह्या परवान्यावर मी रशियांत तीस महिने राहिलों.

मॉस्कोमध्यें मी आयझन्स्टाईनचीं चित्रपटावरचीं व्याख्यानें ऐकलीं व तसेंच दुसऱ्या अनेक चित्रपटनिपुण लोकांबरोबर चित्रपटाचें काम केलें. सोव्हियट चित्र-पट म्हणजे सोव्हियट जीवनाचा अभ्यास हें सांगणें अवश्य आहे. तीस महि-न्यांच्या अवधींत मला निरनिराळ्या सोव्हियट संस्थांचा अभ्यास करण्याची संधी लाभली. इझवेस्तिया, प्राव्हडा, कस्त्योर वगैरे सोव्हियट वर्तमानपत्रें व मासिकें ह्यांत माझे फोटोग्राफ व लेख प्रसिद्ध झाले. मधूनमधून मी वस्तुसंग्रहांत काम करीत असें व संस्कृतीच्या विषयावर लेख लिहीत असें. संस्कृतीचा फैलाव कर-णाऱ्या सोव्हियट संस्थांमार्फत मी रशियांत बराच प्रवास केला व लोकांच्या जीव-नाचा अभ्यास चालविला. केवळ पुस्तकांच्या द्वारें मला ह्या नवीन जीवनाची खरी कल्पना आली नसती, हें येथें नमूद करणें मी माझें कर्तव्य समजतों.

चित्रपटांच्या कामामुळें सोव्हियट लेखकांच्या व कलानिपुणांच्या बऱ्याच ओळखी मला घडल्या. मॉस्को व लेनिनग्राडमध्यें माझ्यावर ममतेचा वर्षाव होत असे. त्याचें कारण मी हिंदी माणूस हें होय. हिंदुस्थानी इसमाला मग तो हिंदु, मुसलमान किंवा इतर कोणत्याही जातीचा असो, रशियन लोक ‘ इंदुस ’ म्हणतात. माझें वर्तन सर्वांशीं ममतेचें पण उघडें होतें. त्यामुळें मला बरेच मित्र मिळाले. मनांत एक व बाहेर एक असें मी कधींहीं केलें नाहीं. मला दोष दिसले कीं, मी ते उघडपणें बोलून दाखवीत असें. अर्थात् हें सर्वांसच पसंत

पडत होतें, असें म्हणतां येणार नाहीं; पण त्यामुळें आपसांत बेबनाव मात्र झाला नाहीं. मी रशियन कुटुंबांतच रहात असें म्हणून मला सोव्हियट जीवनाची चांगली ओळख झाली. राजकारणांत माझें फारसें लक्ष नव्हतें. माझ्या शिक्षणाचें क्षेत्र सोव्हियट संस्कृति होतें. सोव्हियट जीवनाचा निरनिराळ्या बाजूनें मार्मिक अभ्यास करावा असा माझा हेतु होता, त्याप्रमाणें एकंदर सोव्हियट जीवनाचा मी पुष्कळ अभ्यास केलाहि; पण सोव्हियट संस्कृति हा माझा आवडीचा मुख्य विषय होता. सोव्हियट जीवनांत जर मला कांहीं विशेष आवडलें असेल तर सोव्हियट बालकें व त्यांच्या माता. अल्पसंख्य लोकांकरितां सोव्हियट राज्यव्यवस्थेनें जो उपाय काढला आहे त्याचा माझ्या मनावर फारच खोल व इष्ट असा परिणाम झाला. ह्या विषयांवर मी पुढील भागांत माझें निरीक्षण विस्तारानें सांगितलेंच आहे.

रशियांत रहात असतांना माझ्या जीवनावर जे निरनिराळ्या प्रकारचे संस्कार घडत होते त्यांची मी रोजनिशी ठेवलेली नाहीं. परंतु मधुर संगीताप्रमाणें सोव्हियट जीवनाचा ध्वनि माझ्या कानांत अजून सारखा घुमत आहे.

# ६

## नवी पिढी—नवें शिक्षण

"मुलें पांच वर्षांची होईपर्यंत मला त्यांच्यांशीं बोलूं द्या म्हणजे माझें पाऊल कधींहि मागें पडणार नाहीं."

—लेनिन

रशियांत जर कांहीं पूर्णपणें सिद्धीस गेलें असेल तर लाल फौज व नवी पिढी, असें वारंवार म्हणण्यांत येतें. सोव्हियट जीवनाची किल्ली म्हणजे बालकांचें पाळण्यांतील शिक्षण ही होय.

लहान मुलांच्या पुस्तकांचें छोटेंसें दुकान मॉस्को शहरीं गॉर्की रस्त्यावर आहे. ह्या दुकानाची भेट मी पुष्कळदां घेत असे. मुलांच्या आवडीनिवडीकडे बारकाईनें लक्ष पुरवून त्यांच्या बुद्धीची परीक्षा करणाऱ्या सुशिक्षित बायका तेथें विक्रीचें काम करीत असतात. शेंकडों मुलें आपल्या आईबापांबरोबर ह्या दुकानांत दररोज येतात. लहान मुलांसाठीं बरेंच सुंदर व चित्रमय वाङ्मय येथें विक्रीसाठीं ठेवलेलें असतें. पुष्किन, टॉलस्टॉय, चुकॉव्स्की, मार्श्याक, इलिन वगैरे लेखक बालकांस फार आवडतात.

बालकांसाठीं लिहिलेलीं पुस्तकें सोप्या व चटकदार भाषेंत असतात. नव्या पुस्तकांत नव्या सोव्हियट जीवनाची व इतर अनेक शास्त्रीय विषयांची माहिती असते. "उत्तर ध्रुव कसा जिंकला?", "मोटार कशी धावते?", "चिनी मुलें काय करितात?" असलीं पुस्तकें रशियांत मुलें वाचतात. त्यांत आकर्षक रंगांचीं चित्रेंहि असतात.

कांहीं सोव्हियट बालकांनीं हिंदी जनतेबद्दल पुस्तकें वाचलेलीं होतीं. पण त्यांतील फारच थोड्यांना हिंदी माणूस पहाण्यास मिळाला असेल. म्हणून जेव्हां जेव्हां मी त्या दुकानांत शिरें तेव्हां तेव्हां लहान मुलें आपले निळे डोळे मोठाले करून माझ्याकडे

कुतूहलानें पहात व वडील माणसांस माझ्यावद्दलची माहिती विचारीत. एके दिवशीं "हिंदी बंधूस" म्हणून माझ्यासाठीं लिहिलेलें पत्र ह्या दुकानांत ठेवलेलें होतें. हें पत्र त्यान्या नांवाच्या लहान मुलीनें लिहिलेलें असून आपल्या शिशुपालनगृहास मी भेट द्यावी अशी मला त्या पत्राच्या द्वारें विनंती केलेली होती. पत्रासोबतच्या दुसऱ्या कागदावर तिथें कसें पोहोंचावें हें नकाशा काढून दाखविलें होतें.

हें शिशुपालनगृह मॉस्कोच्या जवळच होतें. ह्या इमारतीच्या विस्तीर्ण अंगणांत मोठालीं झाडें व फुलांच्या कुंड्या होत्या. ही इमारत एक मजली असून लांबलचक पसरलेली आहे. तळमजल्याच्या एका भागांत अगदीं लहान बालकें वागडत होतीं. तेथें कांचेच्या एका मोठ्या गोल भांड्यांत सोनेरी मासा इकडून तिकडे पोहत होता. निळ्या डोळ्यांची व सोनेरी केसांची एक गुटगुटीत लहान मुलगी माझ्याकडे पहात उभी होती. जवळच एका मेजावर फुलझाडांच्या कुंड्या ठेवलेल्या होत्या. दुसरी एक लहान मुलगी आपले लहानसे गोंडस हात लांब करून हळूच फुलांना शिवण्याचा प्रयत्न करीत होती. "बाळा लिल्या, संभाळ वरं, नाहीं-तर फूल तुटून पडेल" असें तिला दाई म्हणाली. पण "मी फूल तोडीत नाहीं, त्याला नुसतें कुरवाळीत आहें. पहा माझे हात कसे साफ आहेत ते" असें म्हणून त्या मुलीनें आपले लहानगे हात दाईस दाखविले. इतक्यांत खेळण्याची वेळ संपली व गोंगाट न करितां बालकें एका दालनांत जाऊन आपापल्या छोट्या मेजांजवळ खुर्च्यांवर बसलीं. तीन वर्षांच्या मुलांचा हा जेवणाचा वेळ होता. वीस लहान बालकें छोट्या खुर्च्यांवर बसलीं आणि त्यांच्या वाटींत सूप घालण्यास दाईनें सुर-वात केली. प्रत्येक मूल आपआपला जेवणाचा चमचा हातांत घेऊन वाट पाहात होतें. हीं बालकें कसें खावें हें येथें शिकतात. स्वावलंबनाचें शिक्षण शिशुपालनगृहांत पहिल्यापासून दिलें जातें व हें ह्या संस्थेचें एक महत्त्वाचें वैशिष्ट्य आहे.

इतर बालकांबरोबर लिल्या जेवणांत मग्न होती. ती चार वर्षांची होती. थोड्या दिवसांपूर्वीच लिल्याच्या मातेनें तिला पहिल्यांदांच येथें आणली होती. प्रथम तिला चार वर्षांच्या बालकांबरोबर ठेवण्यांत आलें. कपडे कसे घालावे, किंवा चमचा कसा धरावा हें तिला घरीं कोणी दाखविलेलें नव्हतें; परंतु येथें इतर बालकांस स्वावलंबनाचें शिक्षण मिळालें होतें. लिल्येला दाई कपडे घालीत असे व खाण्यासाठीं तिला भरवावेंही लागे. कारणाशिवायच लिल्या मला घरीं

पोहोंचवा असें सतत म्हणत असे. चारदोन दिवसांत दाईच्या ध्यानांत ह्याचें कारण आलें व लिल्यास खालच्या वर्गात रवानगी झाली. ह्या वर्गातील बालकें नुकतीच कुठें स्वावलंबनाचे धडे घेत असत. लिल्या तर आतां आपल्यासारख्याच नव्यानें प्रवेश झालेल्या बालकांत दाखल झाल्यामुळें सदोदित आनंदी असे व इतरांबरोबर नाचे व खेळे. दोन आठवड्यांत तीच लिल्या आपल्या जुन्या दाईकडे जाऊन हंसून "बघ, मी काय काय शिकलें !" असें म्हणून तिनें जलद कपडे काढून तसेच पुन्हां घालून दाखविले.

मुलांचें जेवण झाल्याबरोबर दाई हात तोंड धुण्यासाठीं पाण्याचें भांडें जेवणाच्या खोलींत आणून ठेवते. "बालकांनो चला हात धुवा" असें म्हणून ती मुलांस स्वच्छतेचे धडे देते. मुलांमुलींना स्वच्छतेची संवय लावणें हा शिशुपालनगृहाचा दुसरा उद्देश आहे.

जेवण आटोपल्यावर बालकें विश्रांतीसाठीं मऊ बिछान्यावर पडतात. नंतर खेळणें, गाणें आणि नाचणें ह्यांतच मुलांचा दिवस निघून जातो. मुलांना वामकुक्षी एकदीड तास घ्यावी लागते व त्यावेळीं पूर्णपणें शांतता पाळली जाते.

शिशुपालनगृहांतील सर्व वस्तु मोठ्या श्रमानें निवडलेल्या दिसतात. खाटा, खुर्च्या, मेजें तसेंच जिन्यांच्या पायऱ्या व संडास बालकांच्या सोईकडे लक्ष देऊन बनविलेले आहेत. मुलांचें मन नेहमीं आल्हादमय रहावें म्हणून सुंदर चित्रें, फुलें, रंगीबेरंगी खेळ तसेंच भिंतींचा रंग या बाबतींत शास्त्रीय दृष्टीनें पुष्कळ विचार करून त्यांची योजना निश्चित केल्याचें दृष्टीस पडतें.

मी जें शिशुपालनगृह पहावयास गेलों होतों, तेथें एका ठिकाणीं रंगीबेरंगी कुंड्यांत निरनिराळ्या प्रकारचीं झाडें ठेवलेलीं होतीं. मोठ्या दिवाणखान्यांत बालकांची कसरत व संगीत चाललें होतें. संगीत-शिक्षिकेनें मधुर आवाजांत साधीं गाणीं पियानोवर बालकांस गाऊन दाखवावीं आणि छोट्या मुलांनीं तीं गाणीं आवडीनें ऐकावी, असा प्रकार चाले. हें दृश्य सहा वर्षांच्या मुलांच्या वर्गाचें होय. शिक्षिकेबरोबर मुलेंहि गायनाचा अभ्यास करीत असतात. गाणें संपल्यावर ही शिक्षिका बालकांना पुस्तकें वाचून दाखवी व तदनंतर मुलांना गोष्टी सांगण्याबद्दल सुचवी. विमानें, मोटारगाड्या, जहाजें, ट्रॅक्टर, झाडें, फुलें व पक्षी अशा निरनिराळ्या विषयांचीं चित्रें मुलें काढतात. तसेंच मुलें मातीचे पुतळेही बनवीत

असतात. बालकांच्या कामांत शिक्षक लुडबुड करीत नाहींत. त्यांना अनेक प्रकारें प्रोत्साहन मात्र देतात व मधून मधून तीं चित्रें कशीं करावीं हें प्रत्यक्ष कृतीनें समजावून दाखवितात. नंतर हीं चित्रें व पुस्तकें काळजीनें कपाटांत ठेवण्यांत येऊन त्यांचें प्रदर्शनही वेळोवेळीं होत असतें.

शिशुपालनगृहाचें काम पहाटेला सुरू होतें. सात वाजल्यापासून माता आपल्या मुलांना येथें घेऊन येतात. मोठीं मुलें एकटींच येतात. शिशुपालनगृहें कामगारांच्या वस्तीपासून लांब नसतात. कोणत्याही वेळीं मूल आलें तरी त्याला शिशुपालनगृहांत मज्जाव नसतो. प्रत्येक बालकाला आपआपल्या वस्तु ठेवण्यासाठीं कपाटांचे खण राखून ठेवलेले असतात. आपआपला खण ओळखतां यावा म्हणून फूल, हत्ती, उंट, विमान इत्यादि खुणांचीं चित्रें खणावर लावलेलीं असतात. ह्या चिन्हांची त्यांना सहज ओळख होते, व तीं आपआपल्या जिनसा बूट, टॉवेल, साबू वगैरे सहज ओळखूं शकतात.

बालकें शिशुपालनगृहांत आल्याबरोबर त्यांची प्रथम डॉक्टर तपासणी करतो. ही परीक्षा संपल्यानंतर मुलांना शाळेचे स्वच्छ कपडे दिले जातात. आणि न्याहारीसाठीं दुधाची खीर, अंडीं वगैरे पदार्थ देण्यांत येतात. सायंकाळीं पांच वाजतां मुलें आपआपल्या घरीं जातात; परंतु ज्यांच्या माता शिक्षणासाठीं किंवा इतर कामामुळें लवकर घरीं येऊं शकत नाहींत, त्या मुलांना किंडरगार्टनमध्येंच तेवढा वेळ रहावें लागतें. त्यांची निगा व देखरेख शिकलेल्या दाया ठेवतात. मागें राहिलेल्या मुलांस सात वाजतां जेवण मिळतें आणि नऊ वाजतां त्यांना त्यांच्या घरीं पाठविण्यांत येतें.

मुलांचें संगोपन व शिक्षण कसें करावें याचें ज्ञान मातांना मिळावें असाही क्रेश ( Creche ) व किंडरगार्टनचा एक उद्देश आहे. मुलें काय शिकतात हें पहाण्यासाठीं मुलांचे आईबाप किंडरगार्टनच्या अधिकाऱ्यांच्या आमंत्रणावरून व स्वतः जाऊन तें शिक्षण पहातात. तसेंच बालकांचे शिक्षक मुलें घरीं कशीं रहातात वागतात याचें अवलोकन करून त्यांत काय सुधारणा कराव्या हें पालकांना समजावून देतात.

लहान मुलांच्या हिताकडे सोव्हियट सरकारचें लक्ष पहिल्यापासून आहे. गेल्या महायुद्धानंतर पडलेल्या दुष्काळांतहि सोव्हियट सरकारनें मुलांसंबंधींच्या जबाबदारी-

कडे दुर्लक्ष केलेलें नव्हतें. ह्या सरकारी धोरणाचा हेतु असा कीं, लेकुरवाळ्या स्त्रियांना आपल्या बौद्धिक विकासास फुरसत मिळावी व आपलें काम निश्चितपणें करतां यावें. ज्या कारखान्यांत बाया काम करतात त्या कारखान्यांना लागून त्यांच्या लेकरांसाठीं क्रेश व किंडरगार्टन या संस्था असतात. ह्या संस्थांमुळें बालकांस आपआपल्या वयाच्या मुलांबरोबर खेळतां येतें व त्यांच्या शिक्षणाची सोय होते. ह्याचा परिणाम म्हणजे कोणत्याहि शहरांत गेल्यास तेथें अगदीं लहान मुलें सार्वजनिक बागांतून दायांच्याबरोबर खेळत बागडत असल्याचें दिसून येतें.

चार वर्षांपर्यंत मुलें 'क्रेश' मध्यें रहातात. या संस्थेचें काम अहोरात्र चाललेलें असतें. मुलांना त्यांत सोडून आईबाप कामावर जातात. स्त्रिया संध्याकाळीं निर्धास्तपणें सभांना किंवा नाटकें पहाण्याला जातात. कॉलेजांतून शिकणाऱ्या आयांसाठीं कॉलेजनजीक मुलें सांभाळण्याची व्यवस्था असते. यामुळें स्त्रियांना अभ्यास करितां येतो. कापणी—मळणीच्या वेळीं शेतावरहि अशीच सोय केलेली असते.

'क्रेश' संस्थेचा उद्देश लहान मुलांची केवळ निगाच राखण्याचा नसून तेथें बालकांना नकळत पुष्कळच शिक्षण देण्यांत येतें. मुलांच्या मनांत अनिष्ट कल्पना शिरण्यास तेथें मुळींच अवसर ठेवलेला नसतो. दहा दहा मुलांचा एकेक गट असतो व 'जें काम बालकांस करतां येतें तें त्यांच्याकडूनच करवावें' हें तत्त्व 'क्रेश' मध्यें फार कसून व दक्षतेनें पाळलें जातें. 'क्रेश' व 'किंडरगार्टन' ह्या अत्यंत अवश्य अशा संस्था आहेत परंतु त्याचा अर्थ असा नव्हे कीं, सोव्हियट सरकार आईबापांपासून मुलांची ताटातूट करूं इच्छितें. कारण 'मातेचें दूध व मातेचें प्रेम यांची बरोबरी दुसऱ्या कशानेंही होणार नाहीं!' हें तत्त्व सोव्हियट रशियांत सर्वांच्या हाडींमासीं खिळलेलें आहे.

खेळण्या-बागडण्याच्या प्राथमिक शाळांतून मुलें बाहेर पडलीं कीं, त्यांना पुस्तकी शिक्षणाच्या प्राथमिक शाळेंत जावें लागतें. या ठिकाणींहि त्यांचा फुरसतीचा वेळ कारणीं लागावा म्हणून नानाप्रकारच्या संस्था सोव्हियट सरकारनें स्थापन केल्यापासून तरुणांनीं त्याचा लाभ घ्यावा इकडे सरकारचें सारखें लक्ष असतें.

मॉस्को व इतर शहरांतून मुलांसाठीं वेगळ्या जागा, वेगळीं ग्रंथालयें व वेगळीं क्रिडांगणें आहेत. प्रत्येक ठिकाणीं शिक्षक हजर असतात व सरकारांतून त्यांना

वेतन मिळतें. हे शिक्षक निरनिराळ्या आवडीनिवडींचे ( Hobbies ) तज्ज्ञ असतात. असे तज्ज्ञ शिक्षक नेमण्यांत मुलांना कसल्यातरी उपयुक्त विषयाचा नाद लागावा हाच उद्देश असतो. ह्याखेरीज पायोनियर पॅलेस ( Pioneer Palace ) नांवाच्या संस्था आहेत. त्यांच्या मार्फत जुन्या मोठाल्या सरदारी इमारतींमधून इंजिनियरींग, विमानें, रेल्वे, चित्रें, शिल्प, नृत्य, फोटोग्राफी, मैदानी खेळ, बुद्धिबळें वगैरे अनेक विषयांचीं साधनें ठेवलेलीं आहेत. जें मूल आपल्या शाळेंत हुशारी दाखवील किंवा कमालीचें खोडकर असेल, त्यालाच या संस्थेचा फायदा घेण्यासाठीं परवानगी मिळते.

अलीकडे कित्येक शहरांतून मुलांच्या आगगाड्या चालू झाल्या आहेत. या आगगाड्यांचीं सर्व कामें मुलेंच करतात. बहुधा या आगगाड्यांचा प्रयोग सार्वजनिक बागांतून चालतो. लेनिनग्राड व ओडेसा येथें केवळ मुलांकरितां अशीं समुद्र-किनाऱ्यावर स्वतंत्र बंदरें आहेत. त्यांत लहान जहाजांचे काफिले असून त्यांची हालचाल सर्वस्वीं मुलांकडे सोंपविलेली आहे.

मुलांचीं नाटकेंहि एकट्या रशियांतच आहेत. अशा मुलांच्या थिएटरांची संख्या त्या देशांत शंभरावर आहे. मुलांसाठीं मुद्दाम नाटकें लिहिलीं जातात. त्यांचा प्रयोग मुलांसाठीं करून दाखवितात. मुलांचीं सिनेमागृहेंहि झपाट्यानें वाढत आहेत. शहर, शाळा, व कामगार संघ यांच्या मार्फत उन्हाळ्यामध्यें मुलांच्या छावण्या उभारल्या जातात. या छावण्यांवर दाया, शिक्षक व डॉक्टर यांची देखरेख असते. आतां लढाईमुळें शहरें सोडणाऱ्या मुलांकरितां तर या छावण्यांना कायमचें स्वरूप येऊं लागलें आहे.

लहान मुलांच्या पुस्तकांची एक स्वतंत्र प्रकाशनसंस्था आहे. मुलांचे आवडते असे जे कांहीं लेखक आहेत, त्यांच्या पुस्तकांच्या पांच पांच लाख प्रती खपल्या गेल्या आहेत. “भूगर्भांत रस्ता कसा बांधला ?”, “रात्रीचा दिवस कसा होतो ?” अशीं अनेक पुस्तकें भपकेदार रंगांनीं व चित्रांनीं ठिकठिकाणीं मांडलेलीं दिसतात. सन १९३७ मध्यें केलेल्या योजनेनुसार अशीं एक कोट वीस लाख पुस्तकें छापण्यांत आलीं. एकंदर वाङ्मयाचा हा अर्धा हिस्सा आहे. बालोपयोगी वाङ्मय-प्रकाशन संस्था ५३ नियतकालिकें प्रसिद्ध करते. एक दिवसा आड “पायोनिअर्स्काया प्राव्हडा” नांवाचें मुलांचें वर्तमानपत्र निघतें. रशियांतील सर्वांत मोठ्या रेडीओ-स्टेशनवर केवळ मुलांसाठीं दररोज तीनदां कार्यक्रम असतो.

पाळण्यांतच मुलांस कलेचें शिक्षण मिळतें. लहान मुलांसाठीं मधुर गाणीं, नव्या तऱ्हेचे रंगीबेरंगी खेळ व मन आकर्षणारीं चित्रें अशा गोष्टींकडे सोव्हियट सरकार बरेंच लक्ष देतें. मुलांच्या वयांचीं चार ते सात वर्षें किंडरगार्टनमधील कलाशिक्षणांतच जातात. येथें मुलांनीं आपली कल्पना लढवून नव्या नव्या गोष्टी सांगाव्या म्हणून त्यांना उत्तेजन देतात. त्यांनीं स्वतःचीं खेळणीं स्वतःच तयार करावीं व चितारकाम करावें अशा तऱ्हेचा या शिक्षणांत अंतर्भाव करण्यांत आलेला आहे. मूल सहा वर्षांचें होईपर्यंत त्याला वाचणें लिहिणें शिकवीत नाहींत.

मुलाच्या पुस्तकी शिक्षणास सुरवात झाली तरी कला व शास्त्रीय शिक्षण, शाळेंत व शाळेबाहेर मिळतेंच. मुलांना कलेचें शिक्षण देणाऱ्या १२० संस्था रशियाभर पसरलेल्या आहेत. संगीताचा नाद असलेल्या मुलांस मॉस्को व लेनिनग्राडमधील प्रसिद्ध संगीत विश्वविद्यालयांत संगीताचें शिक्षण देण्यांत येतें. आज त्याचा उपयोग ५०० विद्यार्थी घेत आहेत. हे विद्यार्थी अत्युच्च संगीताचें शिक्षण घेणारे होत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ज्यांच्यांत संगीताची एक प्रकारें प्रतिभा दिसून येईल किंवा जे पुढें या विषयाचे असामान्य पंडित ठरण्याचा संभव असेल, अशाच निवडक विद्यार्थ्यांची ही संस्था आहे.

शास्त्रीय ज्ञानाचा नाद असलेल्या मुलांसाठीं शास्त्रीय शिक्षण देणाऱ्या ७५० संस्था आहेत. त्या संस्थांमार्फत विमानें, रेडीओ, मोटरगाड्या, जहाजें, ट्रॅक्टर, वगैरे विषयांची मुलांस माहिती करून देण्यांत येते व त्यांचे नमुने (models) मुलांकडून बनवून घेण्यांत येतात. या संस्थांमधील मुलांची एकंदर संख्या ५ लाख आहे. लहान मुलांच्या ३९ रेल्वे रशियांत असून त्यांचा उपयोग १ लाख मुलांकडून केला जातो. ह्या रेल्वेवर इंजिन-ड्राइव्हर, गार्ड, तिकीटकलेक्टर, सिग्नल देणारे व स्टेशन मास्तर वगैरेंचीं कामें मुलेंच पहातात.

सोव्हियट यूनियन हा मुलांचा स्वर्ग आहे असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं.

वेतन मिळतें. हे शिक्षक निरनिराळ्या आवडीनिवडींचे ( Hobbies ) तज्ज्ञ असतात. असे तज्ज्ञ शिक्षक नेमण्यांत मुलांना कसल्यातरी उपयुक्त विषयाचा नाद लागावा हाच उद्देश असतो. ह्याखेरीज पायोनियर पॅलेस ( Pioneer Palace ) नांवाच्या संस्था आहेत. त्यांच्या मार्फत जुन्या मोठाल्या सरदारी इमारतींमधून इंजिनियरींग, विमानें, रेल्वे, चित्रें, शिल्प, नृत्य, फोटोग्राफी, मैदानी खेळ, बुद्धिबळें वगैरे अनेक विषयांचीं साधनें ठेवलेलीं आहेत. जें मूल आपल्या शाळेंत हुशारी दाखवील किंवा कमालीचें खोडकर असेल, त्यालाच या संस्थेचा फायदा घेण्यासाठीं परवानगी मिळते.

अलीकडे कित्येक शहरांतून मुलांच्या आगगाड्या चालू झाल्या आहेत. या आगगाड्यांचीं सर्व कामें मुलेंच करतात. बहुधा या आगगाड्यांचा प्रयोग सार्वजनिक बागांतून चालतो. लेनिनग्राड व ओडेसा येथें केवळ मुलांकरितां अशीं समुद्र-किनाऱ्यावर स्वतंत्र बंदरें आहेत. त्यांत लहान जहाजांचे काफिले असून त्यांची हालचाल सर्वस्वीं मुलांकडे सोंपविलेली आहे.

मुलांचीं नाटकेंहि एकट्या रशियांतच आहेत. अशा मुलांच्या थिएटरांची संख्या त्या देशांत शंभरावर आहे. मुलांसाठीं मुद्दाम नाटकें लिहिलीं जातात. त्यांचा प्रयोग मुलांसाठीं करून दाखवितात. मुलांचीं सिनेमागृहेंहि झपाट्यानें वाढत आहेत. शहर, शाळा, व कामगार संघ यांच्या मार्फत उन्हाळ्यामध्यें मुलांच्या छावण्या उभारल्या जातात. या छावण्यांवर दाया, शिक्षक व डॉक्टर यांची देखरेख असते. आतां लढाईमुळें शहरें सोडणाऱ्या मुलांकरितां तर या छावण्यांना कायमचें स्वरूप येऊं लागलें आहे.

लहान मुलांच्या पुस्तकांची एक स्वतंत्र प्रकाशनसंस्था आहे. मुलांचे आवडते असे जे कांहीं लेखक आहेत, त्यांच्या पुस्तकांच्या पांच पांच लाख प्रती खपल्या गेल्या आहेत. "भूगर्भांत रस्ता कसा बांधला ?", "रात्रीचा दिवस कसा होतो ?" अशीं अनेक पुस्तकें भपकेदार रंगांनीं व चित्रांनीं ठिकठिकाणीं मांडलेलीं दिसतात. सन १९३७ मध्यें केलेल्या योजनेनुसार अशीं एक कोट वीस लाख पुस्तकें छापण्यांत आलीं. एकंदर वाङ्मयाचा हा अर्धा हिस्सा आहे. बालोपयोगी वाङ्मय-प्रकाशन संस्था ५३ नियतकालिकें प्रसिद्ध करते. एक दिवसा आड "पायोनिअर्स्काया प्राव्हडा" नांवाचें मुलांचें वर्तमानपत्र निघतें. रशियांतील सर्वांत मोठ्या रेडीओ-स्टेशनवर केवळ मुलांसाठीं दररोज तीनदां कार्यक्रम असतो.

पाळण्यांतच मुलांस कलेचें शिक्षण मिळतें. लहान मुलांसाठीं मधुर गाणीं, नव्या तऱ्हेचे रंगीबेरंगी खेळ व मन आकर्षणारीं चित्रें अशा गोष्टींकडे सोव्हियट सरकार बरेंच लक्ष देतें. मुलांच्या वयांचीं चार ते सात वर्षें किंडरगार्टनमधील कलाशिक्षणांतच जातात. येथें मुलांनीं आपली कल्पना लढवून नव्या नव्या गोष्टी सांगाव्या म्हणून त्यांना उत्तेजन देतात. त्यांनीं स्वतःचीं खेळणीं स्वतःच तयार करावीं व चितारकाम करावें अशा तऱ्हेचा या शिक्षणांत अंतर्भाव करण्यांत आलेला आहे. मूल सहा वर्षांचें होईपर्यंत त्याला वाचणें लिहिणें शिकवीत नाहींत.

मुलाच्या पुस्तकी शिक्षणास सुरवात झाली तरी कला व शास्त्रीय शिक्षण, शाळेंत व शाळेबाहेर मिळतेंच. मुलांना कलेचें शिक्षण देणाऱ्या १२० संस्था रशियाभर पसरलेल्या आहेत. संगीताचा नाद असलेल्या मुलांस मॉस्को व लेनिनग्राडमधील प्रसिद्ध संगीत विश्वविद्यालयांत संगीताचें शिक्षण देण्यांत येतें. आज त्याचा उपयोग ५०० विद्यार्थी घेत आहेत. हे विद्यार्थी अत्युच्च संगीताचें शिक्षण घेणारे होत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ज्यांच्यांत संगीताची एक प्रकारें प्रतिभा दिसून येईल किंवा जे पुढें या विषयाचे असामान्य पंडित ठरण्याचा संभव असेल, अशाच निवडक विद्यार्थ्यांची ही संस्था आहे.

शास्त्रीय ज्ञानाचा नाद असलेल्या मुलांसाठीं शास्त्रीय शिक्षण देणाऱ्या ७५० संस्था आहेत. त्या संस्थांमार्फत विमानें, रेडीओ, मोटरगाड्या, जहाजें, ट्रॅक्टर, वगैरे विषयांची मुलांस माहिती करून देण्यांत येते व त्यांचे नमुने (models) मुलांकडून बनवून घेण्यांत येतात. या संस्थांमधील मुलांची एकंदर संख्या ५ लाख आहे. लहान मुलांच्या ३९ रेल्वे रशियांत असून त्यांचा उपयोग १ लाख मुलांकडून केला जातो. ह्या रेल्वेवर इंजिन-ड्राइव्हर, गार्ड, तिकीटकलेक्टर, सिग्नल देणारे व स्टेशन मास्तर वगैरेंचीं कामें मुलेंच पहातात.

सोव्हियट यूनियन हा मुलांचा स्वर्ग आहे असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं.

# ७

## स्त्रीस्वातंत्र्याचा एकच मार्ग !

"ज्या राष्ट्रांत, स्वयंपाकगृहांतून अर्धी लोकसंख्या म्हणजे-बायका-गुलामाप्रमाणें राबते, तें राष्ट्र स्वतंत्र नव्हे."

—लेनिन

सोव्हियट रशियांत बायकांना जें आज महत्त्वाचें स्थान मिळालें आहे तें पाहून कोणालाही आश्चर्य वाटेल. सोव्हियट स्त्रीच्या स्वातंत्र्याचा भलभलता अर्थ बऱ्याच पुस्तकांतून वाचण्यास मिळतो. रशिया हें धांगडधिंग्याचें माहेरघर असावें असें बऱ्याच लोकांना वाटतें. पण रशियांत स्त्रीस्वातंत्र्याचें खरें स्वरूप तरी काय आहे, याचा आपण थोडा विचार करूं.

युरोपांत कांहीं बाया वरच्या व खालच्या दर्जाचें काम करून उदरनिर्वाह करतात हें खरें, पण बऱ्याचशा बायका घरचेंच काम पहातात. युरोपमधील मोठमोठ्या लोकांच्या बायका फावल्या वेळांत थोडीबहुत समाजसेवाहि करतात. तसेंच इंग्लंडच्या राणीनें आज एक नवें जहाज थाटानें समुद्रांत लोटलें, चर्चिलच्या बायकोनें एखादी जत्रा उघडली, लाव्हालच्या बायकोनें शाळेंत पारितोषिकें दिलीं, गरींगच्या बायकोनें धूम्रपान करूं नका म्हणून स्त्रियांस उपदेश केला, गवल्सची बायको संतति वाढवा म्हणून बायकांच्या सभेंतून बोलली, ह्या अर्थाच्या बातम्या वर्तमानपत्रांतून रकानेच्या रकाने भरून येतात. ह्या स्त्रियांना जें महत्त्व दिलें जातें तें केवळ त्यांचे नवरे महत्त्वाच्या जागांवर आहेत म्हणूनच.

पण सोव्हियट रशियांत स्त्रियांचें पुढारीपण सर्वस्वीं त्यांच्या कर्तबगारीवर अवलंबून असतें. नवऱ्याच्या मोठेपणामुळें बायकांचीं चित्रें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होत नाहींत, अथवा त्यांना पुढारीपणही मिळत नाहीं. मे-दिनानिमित्ताच्या किंवा इतर महत्त्वाच्या समयीं स्टालिनचा जेव्हां लाल फौजेकडून अथवा बहुजनसमाजा-

करून सार्वजनिक स्वरूपाचा सन्मान होतो, तेव्हां स्टालिनची बायको त्याच्याबरोबर असलेली आढळून येत नाहीं. इतकेंच काय पण स्टालिन व त्याची पत्नी किंवा इतर अधिकाऱ्यांचीं जोडपीं एकत्र उभीं राहून वर्तमानपत्रांस फोटोहि पुरवीत नाहींत. इतर स्त्रियांप्रमाणेंच स्टालिनची पत्नी धंदेशिक्षणाच्या शाळेंत शिकत होती व तिची महत्त्वाकांक्षा आपल्या कर्तबगारीवर एकाद्या कारखान्याची मॅनेजर होण्याची होती. मी मॉस्कोंत असतांना माझ्या चित्रपटाच्या विश्वविद्यालयांत लिटव्हीनॉफची बायको मूलभूत इंग्रजी भाषेचे ( Basic English ) वर्ग घेत असे. त्यावेळीं लिटव्हीनॉफ हा परराष्ट्र मंत्र्याच्या मोठ्या हुद्याच्या जागेवर होता. क्रेमलिन-मधील एका मोठ्या अधिकाऱ्याची बायको माझ्याबरोबर चित्रपटाचें काम शिकत असे. बस, मोटर, विमानें हाकण्याचें तसेंच इंजीनीअरचें किंवा न्याय देण्याचें काम सोव्हियट स्त्रिया पुरुषांबरोबर करतात. पुरुषांनीं बाहेरचीं कामें करणें व बायकांनीं केवळ घरचा कारभार पहाणें हें आज रशियांत दिसून येत नाहीं.

रशियाला नवजीवनाच्या मार्गावर लावण्यासाठीं लेनिन आणि इतर पुढाऱ्यांनीं बायकांकडे विशेष लक्ष दिलें. युरोप आणि अमेरिकेमध्यें बायकांचा उद्धार करण्याचे प्रयत्न आज शंभर वर्षें आस्ते कदम चालले आहेत. फनीना हाल नांवाची प्रसिद्ध जर्मन लेखिका म्हणते—“ आज रशियांत चाललेली स्त्रियांची उन्नति इतरत्र झालेल्या आजपर्यंतच्या स्त्रियांच्या उन्नतीपेक्षां अगदीं भिन्न आहे. सोव्हियट स्त्रियांची उन्नति फार श्रेष्ठ दर्जाची आहे. कालांतरानें ह्या स्त्रियांच्या उन्नतीला काय स्वरूप येईल हें आज सांगतां येत नाहीं. पण आजच्या पुरतें बोलावयाचें म्हटल्यास सोव्हियट स्त्रिया इतर कोणत्याही देशांतील स्त्रियांपेक्षां फार पुढें गेल्या आहेत, असें कबूल करणें भाग आहे. स्त्रीस्वातंत्र्य हा सोव्हियट ध्येयाचा एक महत्त्वाचा घटक गणला जातो आणि सोव्हियट समाजानें स्त्री-स्वातंत्र्याचा प्रश्न बहुतांशीं सोडविलाहि आहे. ”

रशियांतील स्त्रियांचें स्वातंत्र्य हें कार्य किती बिकट व अचाट आहे ही कल्पना रशियाच्या इतिहासाकडे पाहिलें तरच ध्यानांत येईल. रशियाच्या लोकसंख्येचा दहावा हिस्सा मुसलमान जातीचा असून ह्या स्त्रियांना शेंकडों वर्षें बुरख्यांत रहावें लागलें होतें व त्यांना कमीपणानें वागविण्यांत येत असे. नवऱ्याच्या मृत्यूनंतर घरांतील भांडीं व जनावरें जशीं मागल्या कर्त्या पुरुषाच्या मालकीचीं म्हणून गणलीं जात

त्याचप्रमाणें विधवांचीहि व्यवस्था केली जात असे. इतर सामानाप्रमाणेंच विधवांनाहि बाजारांत विकीत असत. इतर जातीच्या रशियन स्त्रियांचीही स्थिति विशेष चांगली नव्हती. रशियांतील ख्रिस्ती धर्माप्रमाणें बायकांना कायदेशीर असे हक्क मुळींच नव्हते. "बायकांनीं नवऱ्याची आज्ञा सर्व बाबतींत सदैव पाळली पाहिजे आणि त्यांनीं विनय सोडून नवऱ्याच्या अधिकाराविरुद्ध कधींही जाऊं नये" हा रशियांतील स्त्रीधर्म होता. एकादी स्त्री शिकविण्याचें किंवा दुसरें कांहीं काम करीत असेल तर तिचें लग्न झाल्याबरोबर तिची त्या नोकरीवरून हकालपट्टी होत असे. लग्न केलेल्या बायकांना स्वतंत्र असा पासपोर्टसुद्धां मिळत नसे. खेडेगांवांतून तर स्त्रियांची स्थिति कुत्र्यांपेक्षांहि वाईट होती. पुढें दिलेल्या रशियन म्हणींवरूनहि स्त्रियांबद्दल रशियनांच्या मनांत काय भावना होती हें स्पष्ट होतें. "बायकांचे केस लांब, पण बुद्धि कोती", "बायको ही मडकें नव्हे—कारण झोडली तरी फुटत नाहीं", "शिकलेली बायको केली तर ती सणाची सुटी घेते." थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे रशियन बायकांना गोठ्यांतील जनावरांप्रमाणें वागविण्यांत येत असे.

बायकांना खरें स्वातंत्र्य मिळवून देण्याचा सोव्हियट सरकारचा निश्चय असल्यामुळें, हें सरकार बायकांना केवळ राजकीय हक्क देऊनच थांबलें नाहीं. त्यांना आपला उदरनिर्वाह स्वतंत्रपणें करतां येईल अशी सोयहि सोव्हियट सरकारनें निर्माण केली. अर्थात् जुन्या चालीरीतींच्या विरुद्ध हें कार्य असल्यामुळें बायकांच्या उन्नतींत बरेच अडथळे प्रथमतः आले. परंतु सोव्हियट सरकारच्या निग्रही धोरणापुढें व पुरोगामी विचारी लोकांच्या मदतीनें स्त्रीस्वातंत्र्याचें कार्य सिद्धीस गेलें. सुरवातीपासून कामाप्रमाणें वेतन हें तत्त्व पुरुष व बायका ह्यांस सारखेंच लावण्यांत आलें. स्वयंपाकगृहाच्या गुलामगिरींतून बायकांना सोडविण्यासाठीं सोव्हियट सरकारनें सार्वजनिक स्वयंपाकघरें, भोजनासाठीं सार्वजनिक स्वच्छ व सुंदर जागा, कपडे धुण्याच्या सोयी वगैरे व्यवस्था बांधून दिलेल्या आहेत. लेकुरवाळ्या मातांना आपला उदरनिर्वाह निश्चितपणें करतां यावा म्हणून त्यांच्या अपत्यासाठीं सर्व देशभर क्रेश व किंडरगार्टनसारख्या संस्था आहेत. गरोदर स्त्रीला पगारी सुटी देण्यांत येते व एक वर्ष होईपर्यंत मुलाचा खर्च सरकारांतून मिळतो.

सोव्हियट रशियांतील इतर कुठल्याहि सामाजिक घडामोडीपेक्षां स्त्रियांच्या जीवनांतील घडामोडी विशेष प्रामुख्यानें दृष्टीस पडतात. युरोप-अमेरिकेंतील स्त्री-

पुरुषांची समता केवळ दिखाऊ आहे. खऱ्या हुद्याच्या जागा तेथें क्वचितच स्त्रियांना मिळतात. उलट सोव्हियट स्त्रिया मोठ्या हुद्यांवर असलेल्या आढळतात. कोलंटाय नांवाची स्त्री स्वीडनमध्यें सोव्हियट सरकारचे मार्फत वकिलतीचें काम करते. यार्कोव्लेवा नांवाची स्त्री आर्थिक खात्याची मंत्री होती. अनेक सोव्हियट बायका न्यायाधीशाचें काम करतात व तसेंच अनेक जहाजांचें मुख्याधिकार स्त्रियांकडे आहेत.

'बायकांच्या उन्नतीच्या मार्गांतील सर्व अडथळे आज दूर करण्यांत आले आहेत,' अशी घोषणा लेनिननें १९२० सालीं केली. आज सोव्हियट लोकमहासभेच्या सभासदांपैकीं एकपंचमांश सभासद बायका आहेत. स्थानिक सोव्हियटमध्यें पांच लक्ष स्त्रिया निवडून आल्या असून शेंकडों स्त्रिया ह्या संस्थांत अध्यक्ष व चिटणीस या नात्यानें काम करीत आहेत. सोव्हियट न्यायाधीशांमध्यें एकचतुर्थांश संख्या बायकांची आहे. स्त्रियांची उन्नति झपाट्यानें व्हावी या हेतूनें त्यांना विश्वविद्याल-याचे दरवाजे खुले ठेवलेले आहेत. डॉक्टरी शाळेंत मुलांपेक्षां मुलींचा भरणा जास्त असतो. इंजिनीअरिंग कॉलेजांत मुलांच्या निम्यानें मुली आहेत. बऱ्या-चशा कारखान्यांचा व शेतवाड्यांचा कारभार सर्वस्वीं बायका पहातात. विमानें, मशीनगनसारखीं यंत्रें चालविण्याचें पद्धतशीर शिक्षण घेणाऱ्या ४० लाखांवर बायका रशियांत आहेत. अनेक स्त्रियांनीं लष्करी विद्यालयांतून सेनापतीचा हुद्दा मिळविला आहे.

"स्त्रियांना मिळणारे समतेचे हक्क प्रत्यक्ष कार्यांत येण्यासाठीं व त्यांची उन्नति होण्यासाठीं देशाच्या एकंदर कारभारांत त्यांनीं भाग घेतला पाहिजे. देशांतील थोड्याशा स्त्रियांनीं काम करण्याऐवजीं लाखों स्त्रिया कार्यप्रवण झाल्या पाहिजेत," असें लेनिन म्हणे. आज ८० लाख स्त्रिया कारखान्यांतून निरनिराळीं कामें करीत आहेत. खलाशी, इंजिन ड्रायव्हर, वैमानिक, ह्या नात्यानें वहातुकीच्या कामांतही त्या आहेत; तसेंच सुतारकीच्या व खाणींतील कामांतहि त्या दिसून येतात. आजचा जीवनकलह सर्वव्यापी आहे. त्याच्या सीमा शेताला व कारखान्याला भिडलेल्या आहेत. म्हणूनच आज अनेक स्त्रिया युद्धाच्या हुरूपानें आपलीं कामें मोठ्या ईर्ष्येनें फत्ते करीत असतांना दिसतात. याची तुलना लाल फौजेच्या युद्धांतील विजयश्रीशींच प्रशंसेनें व समर्पक रीतीनें करतां येईल.

सोव्हियट राजनीतिप्रमाणें बायकांना पुरुषांइतकेच हक्क आहेत. परंतु सोव्हियटच्या आशियाच्या भागांत अशा समान हक्कांचा अम्मल करणें सुकर नव्हतें. सोव्हियट पुढारी राज्यारूढ झाल्यावर "बुर्खा फेका" म्हणून समरकंद व बुखाऱ्याच्या बाजारांतून पुकारा करण्यांत आला. बुर्खा टाकणाऱ्या शेंकडों बायकांना त्यावेळीं आपलीं घरेंदारें सोडावीं लागलीं व त्यांच्यावर बलात्कार होऊन त्यांना ठार मारण्यांत आलें; परंतु ही विलक्षण प्रतिक्रिया फार दिवस टिकली नाहीं. थोड्याच कालानंतर हजारों स्त्रिया आपल्या बुर्ख्यांची उघड्या रस्त्यांतून निर्विघ्नपणें होळी करीत असल्याचे देखावे वारंवार दिसूं लागले. आणि आज तर ह्या पौर्वात्य स्त्रिया जुन्या गुलामगिरीचे कसलेच रिवाज पाळीत नाहींत व जनाना सोडून दुसऱ्या नागरिकांप्रमाणें आपल्या सर्व हक्कांचा पूर्ण अनुभव घेत आहेत.

पूर्वीप्रमाणें लग्न हेंच आयुष्याचें इतिकर्तव्य असा प्रकार आतां उरलेला नाहीं. आज मुलांप्रमाणेंच मुली आपल्या आयुष्याचें ध्येय ठरवून त्यासाठीं सतत प्रयत्न करतांना आढळतात. सोव्हियट स्त्रियांचा हुद्दा व मान त्यांच्या पतीवर अवलंबून नाहीं हें पूर्वीं एकदां निदर्शनास आणलेंच आहे; तो हुद्दा व मान त्यांच्या स्वतःच्या कर्तबगारीवर अवलंबून असतो. कित्येक स्त्रियांचा हुद्दा व पगार त्यांच्या पतीपेक्षां जास्त आढळून येतो. तथापि कुटुंबाच्या खर्चाची जबाबदारी पत्नीवर व पतीवर सारखीच असते.

सोव्हियट रशियांत लग्नाचे कायदे करतांना मुलाबाळांच्या हिताकडे लक्ष दिलें जातें. सोव्हियट कायद्याप्रमाणें दोन तऱ्हेच्या लग्नास मान्यता मिळते. एक जुन्या तऱ्हेचें लग्न व दुसरें सिव्हिल लग्न. नव्या तऱ्हेचें लग्न 'झाग्स' नांवाच्या संस्थेमार्फत तीन रुबल देऊन नोंदतां येतें. या वेळीं वधूवरांची प्रकृति, दुसरें लग्न असेल तर पूर्वीचीं मुलें, ह्यासंबंधीं प्रश्न विचारतात. मुलांचें संगोपन व कुटुंबाचा खर्च ह्याची जबाबदारी विवाहितांना घ्यावी लागते. अठरा वर्षांच्या आंत कोणालाहि लग्न करतां येत नाहीं. आशियांत हा निर्बंध सोळा वर्षांचा आहे. बौद्धिक किंवा शारीरिक दोष असलेल्या लोकांना लग्न करण्याची सक्त मनाई आहे. लग्नाची वैद्यकीय परीक्षा मोफत असून आपला रोग लपविणाराला कडक शिक्षेचें धनी व्हावें लागतें. जुन्या तऱ्हेचीं लग्नें व नोंदलेलीं लग्नें हीं दोन्ही सारखींच कायदेशीर समजतात. परंतु नव्या तऱ्हेच्या लग्नाला सोव्हियट सरकार प्रोत्साहन देतें. त्याचें कारण घटस्फोटाचा प्रसंग आल्यास मुलांच्या हिताची हेळसांड होत नाहीं. सोव्हियट रशियांत घट-

स्फोट मिळविणें फार सोपें आहे, त्यासाठीं विशेष कालावधि दवडावा लागत नाहीं. पति किंवा पत्नी ह्यांपैकीं कोणीही तसा अर्ज केल्यास तत्काल घटस्फोट मिळतो. परंतु सोव्हियट सरकार अशा काडीमोडीला उत्तेजन देत नाहीं. घटस्फोटाची फी क्रमशः वाढती ठेवलेली असून त्यामुळें घटस्फोटाला प्रतिबंध झाल्याशिवाय रहात नाहीं. "लग्न करा व पाहिजे तर दोघांच्या संमतीनें काडी मोडा, पण मुलांस मात्र विसरूं नका. नाहींतर तुमचे कान पकडून तुम्हांला कोर्टांत ओढलें जाईल," असें सेमाश्को नांवाचा आरोग्यखात्याचा जुना मंत्री म्हणत असे.

अनौरस व इतर मुलांत कोणताही फरक आजच्या रशियांत करण्यांत येत नाहीं. घटस्फोट झाला तरी मुलांच्या संगोपनाची व शिक्षणाची जबाबदारी घटस्फोट करणाऱ्या पतिपत्नीला टाळतां येत नाहीं. मुलांची रखवालदारी साधारणपणें आई-कडेच रहाते. सोव्हियट न्यायाप्रमाणें एका मुलासाठीं आपल्या उत्पन्नाचा चवथा हिस्सा, दोन मुलें असल्यास तिसरा हिस्सा आणि दोहोंहून अधिक असल्यास अर्धा हिस्सा, या प्रमाणें आपल्या मिळकतीचा वांटा मुलांच्या खर्चासाठीं घटस्फोट करणाऱ्या बापाला मुलांच्या आईला द्यावा लागतो. कायद्याची घटस्फोटाला संमति आहे पण त्याबरोबरच समाजाचें स्थैर्य कायम राहील अशी खबरदारीही घेण्यांत आलेली आहे.

कुटुंब हा समाजरचनेचा पहिला घटक होय. मात्र जुनी कुटुंबपद्धति सोव्हियट रशियांतून नष्ट होत चालली आहे. स्त्रिया स्वतंत्रपणें कामधंदा करूं लागल्यामुळें त्यांना पुरुषांवर अवलंबून रहाण्याची गरज उरलेली नाहीं. अर्थात् धीरे धीरे पुरुषांचा स्त्रियांच्या बाबतींतला वरचष्मा कमीकमी होत आहे. घरच्या राहणींत त्यामुळें विलक्षण फेरफार झालेला आहे. पण त्यावरून कोणी असा ग्रह करून घेऊं नये कीं खरें प्रेम म्हणतात तें रशियांत कायमचें नष्ट झालें आहे. उलट पतिपत्नीचें आपसांतलें प्रेम, मुलाबाळांवरील ममत्व या भावना तेथें बळावल्या-चाच अनुभव येतो. तात्पर्य कौटुंबिक ऐक्याला तेथें धक्का बसलेला नाहीं.

मुलांच्या संगोपनाची जबाबदारी आईबापांवर असून, वयांत आलेल्या मुलांनीं आपल्या म्हाताऱ्या आईबापांचा सांभाळ केलाच पाहिजे असा तेथें निर्बंध आहे. आपसांतील प्रेम हें समाजसत्तावादी कुटुंबाचें जीवन असून त्याशिवाय कुटुंब–समाजाचा आद्य घटक–टिकणेंच शक्य नाहीं असें मत मॉस्कोंतील "प्राव्हदा" ह्या कम्युनिस्ट पत्रानें अनेकवार प्रतिपादन केलें आहे.

## ८

# १९० जाती व १५० भाषा

"रशिया हा देश नाहीं तर तें जग आहे."

**जुनी रशियन म्हण.**

मॉस्कोमध्यें जितके निरनिराळ्या जातीचे लोक पहावयास मिळतात तितके इतरत्र कोठेंही मिळत नाहींत. मॉस्कोंतील गजबजलेल्या रस्त्यांतून टर्क, आर्मेनियन, इराणी, पठाण, मंगोलियन, कझाक, किरघीझ, जॉर्जियन, उझबेक, कोसॅक, वगैरे जातीचे लोक आपआपल्या राष्ट्रीय वेषांत निळ्या डोळ्यांच्या व सोनेरी केसांच्या गोऱ्या रंगाच्या अशा स्लाव जातीच्या रशियनांमध्यें पूर्ण मोकळेपणानें फिरतांना दिसतात. हे लोक जर युरोपाच्या कोठल्याही शहरांत फिरतांना दिसून आले तरी त्यांच्याकडे युरोपमधले लोक टकमकां पहातील. पण मॉस्कोमध्यें ह्याबद्दल कसलेंच कौतुक दृष्टीस पडत नाहीं. तेथें ही एक नित्याची गोष्ट होऊन बसली आहे.

मॉस्को हें सोव्हियट यूनियनचें सूक्ष्म स्वरूपच आहे असें समजा. ह्या शहराप्रमाणें सोव्हियट सृष्टि ही निरनिराळ्या जातींच्या, धर्मांच्या व वर्णांच्या लोकांनीं भरलेली आहे. आणि हे सर्व लोक एकाच राष्ट्राचे म्हणून फार प्रेमानें रहातात. ह्या देशाला पुष्कळसे लोक सोव्हियट रशिया असें म्हणतात; पण तें चुकीचें आहे. इंग्रजी भाषेप्रमाणें त्यांचें खरें नांव "यूनियन ऑफ सोव्हियट सोशलिस्ट रिपब्लिक्स (Union of Soviet Socialist Republics) किंवा सोव्हियट यूनियन असें आहे. थोडक्यांत सोव्हियट राज्य हा एक संघ आहे. युरोपचा अर्धा व आशिया खंडाचा तिसरा हिस्सा ह्या एका देशांत आलेला आहे. किंवा निराळ्या तऱ्हेनें पहावयाचें झाल्यास असेंहीं म्हणतां येईल कीं, सोव्हियट यूनियनचा पांचवा हिस्सा युरोपमध्यें आहे व बाकीचा हिस्सा आशिया खंडांत आहे. आपल्या लोकांनीं ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखीं आहे. भिन्न राजकीय

गटांच्या एकीकरणाच्या दृष्टीनें पाहिल्यास एवढा मोठा गट जगांत दुसरा नाहीं. भौगोलिक दृष्टीनें पाहिलें तर दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या देशाचा संबंध युरोप व आशिया खंडांशीं फार जवळचा आहे.

सोव्हियट यूनियनचें क्षेत्रफळ ८३,५०,००० मैल असून तें पृथ्वीच्या जवळ जवळ एक-षष्ठांश भागाइतकें मोठें आहे. ह्या देशाच्या अगदीं पश्चिमेच्या भागांत जेव्हां रात्र होते तेव्हां पूर्व भागांत सूर्य उगवतो. यावरून दिसून येईल कीं ह्या देशांत सूर्य कधींच मावळत नाहीं. सोव्हियट यूनियनची लोकसंख्या १९ कोटींवर आहे व ती एकंदर मनुष्य-जातीच्या एक-दशांशाइतकी होते. ह्या देशाची सीमा थेट फिनलंड, पोलंड, रुमानिया, टर्की, इराण, अफगाणिस्थान, चीन, जपान, व हिंदुस्थान ह्या देशांना येऊन भिडलेली आहे. ह्या देशाच्या उत्तरेस आर्टिक समुद्र असून ह्या बाजूनें अमेरिकेचा उत्तर भाग फक्त छत्तीस मैलांवर आहे. अमेरिकेचें "लहान डिओमीड बेट" व सोव्हियटचें "मोठें डिओमीड बेट" ह्यामध्यें केवळ पांच मैलांचें अंतर आहे.

स्थूलपणें सोव्हियट यूनियनचा भूगोल ध्यानांत भरण्याला अवघड नाहीं. ह्या देशाला एक सपाट मैदानच म्हणावयास हरकत नाहीं; त्याचें रूप मात्र उत्तरेकडून दक्षिणेकडे क्रमशः बदलतें. अगदीं उत्तरेकडून दक्षिणेकडे जाण्यास निघालें तर पहिला पट्टा "टंड्रा" किंवा दगडी जमीन व दलदलीचे खड्डे हा असून तो काय-मचा बर्फाच्या जाड थराखालीं असतो. ह्याच्या नंतरचा पट्टा दाट जंगलाचा आहे व त्याचें क्षेत्रफळ सोव्हियट यूनियनच्या अर्ध्यानें आहे. एवढा मोठा अरण्याचा प्रदेश पृथ्वीवर दुसरीकडे नाहीं. ह्या पट्ट्याच्या दक्षिणेस असलेल्या विभागांत एकहि झाड दिसून येत नाहीं. ज्याला स्टेप-मैदान ( पामीरचें पठार ) असें म्हणतात त्यांत झाड नाहीं. पण जगांतील पहिल्या दर्जाचा सुपीक प्रदेश हाच आहे. ह्याला "काळ्या मातीचा" प्रदेश असेंही म्हणतात. ह्या पट्ट्याला उक्रेअनच्या पूर्वेकडील भागांत सुरवात होते. आणि तो उरल व सैबेरियांतून पलीकडे जातो. कास्पियन समुद्राच्या पूर्वेकडील बाजूस ह्याचा शेवट होतो. त्या पलीकडे ह्या पट्ट्याचें रूप ओसाड मैदानाप्रमाणें दिसूं लागतें.

सोव्हियट यूनियनमधील मुख्य पर्वत म्हणजे सैबेरियांतील आलटाई, काळ्या व कास्पियन समुद्रांच्या मधला कॉकेशस, आणि हिंदुस्थानपासून रशियाला दूर करणारा पर्वत पामीर हा आहे. उरल पर्वतांची रांग उत्तरेकडून दक्षिणेकडे पसरलेली

असून युरोपियन रशिया व आशियांतील रशिया ह्यांची ती सीमा समजली जाते. नीस्तर, नीपर, डोन, व्होल्गा, ओव, येनिसी, लेना आणि अमुर ह्या मोठ्या नद्या असून सोव्हियट प्रदेशांतून दक्षिण आणि उत्तर दिशेनें वहातात. ह्या नद्यांचे प्रवाह हिंवाळ्यांत गोठून बर्फमय बनतात व इतर ऋतूंत त्यांचा जलमार्गासाठीं उपयोग केला जातो. ही त्यांची कामगिरी प्राचीन काळापासून चालू आहे.

सोव्हियट यूनियन हा अति थंडीचा तसाच अति उन्हाळ्याचा प्रदेश आहे. हिंवाळ्यामध्यें एकंदर देशांत उष्णतामापकांतील अंशाचा पारा शून्याखालीं जातो आणि जिकडे तिकडे बर्फाशिवाय दुसरें कांहींच दिसत नाहीं. उन्हाळयांत सोव्हियट यूनियनच्या आशियांतील कांहीं भागांत अत्यंत उष्णता असते.

जलशक्ति, कोळसा, धातू आणि तेल ह्यांचा मोठा सांठा सैबेरियांत आहे. पण त्याचा पूर्णपणें फायदा अद्याप घेतला जात नाहीं. सैबेरियाच्या प्रदेशांत जगांतील इतर कुठल्याहि प्रदेशापेक्षां लांकडाचा मोठा सांठा आहे. सोव्हियट यूनियनच्या दक्षिण भागांत चहा, रबर, कापूस व फळें तयार होतात. पश्चिमेच्या भागांत म्हणजे उक्रेअनमध्यें अत्यंत विपुल असें गव्हाचें पीक निघतें.

नकाशाकडे पाहिलें तर दिसून येईल कीं, सोव्हियट यूनियन हा अफाट देश आहे. हुंबोल्ट नांवाचा जर्मन खगोलशास्त्रज्ञ म्हणतो कीं, संपूर्ण चंद्राच्या दृष्टि-गोचर होणाऱ्या क्षेत्रफळापेक्षां रशियाचें क्षेत्रफळ मोठें आहे. अर्थात् अशा मोठ्या प्रदेशावर १९० जातीचे लोक रहातात व ते १५० निरनिराळ्या भाषा बोलतात, यांत नवल नाहीं. ह्या सोव्हियट यूनियनच्या एकंदर लोकसंख्येमध्यें तीन-चतुर्थांश लोक स्लाव जातीचे असून बाकीच्या सर्व जातींची संख्या एक-चतुर्थांशा-इतकी आहे. स्लाव जातीलाच रशियन या नांवानें ओळखतात.

१९१७ नोव्हेंबरच्या राज्यक्रांतीनंतर पूर्वीच्या रशियन साम्राज्याला सोव्हियट यूनियन हें नांव देण्यांत आलें. सोव्हियट यूनियनमध्यें रशिया, उक्रेअन, बेलारूस, जॉर्जिया, आर्मेनिया, अझरबैजान, उझबेक, तज्जीक, तुर्कमेनीया, किर्घिस्तान, कझाकस्तान, करेली–फिनलंड, मोल्डाव्हिया, एस्टोनिआ, लाट्विआ, लिथोनिया, हे ऐतिहासिकदृष्ट्या रशियाचे प्रांत गणले जातात. हे प्रांत झारशाहींत रशियामध्यें होते. पुढें कांहीं काळ यांतील शेवटचे पांच प्रांत रशियाबाहेर स्वतंत्र राहिले. पण १९४० सालीं त्यांचा नव्या सोव्हियट यूनियनमध्यें समावेश करण्यांत आला.

निरनिराळ्या लोकांच्या गटांची राज्यव्यवस्था ज्यांच्या त्यांच्या हातांत असून त्यांनीं एकमेकांशीं पूर्ण एकीचा व प्रेमाचा संबंध राखलेला आहे.

हें सोव्हियट यूनिअनच्या भूगोलाचें वर्णन जर्मनी व रशियामधील लढाई सुरू होण्याच्या पूर्वीच्या स्थितीस धरून केलेलें आहे.

सोव्हियट यूनियन हा अत्यंत महत्त्वाचा देश असून त्याच्या भूगोलाचें व इतिहासाचें ज्ञान फारच थोड्या लोकांना असावें हें एक आश्चर्य आहे. ह्या देशांतील गेल्या २५ वर्षांतील परिवर्तन, जिज्ञासूंना एकाद्या मनोरंजक कादंबरी-प्रमाणें वाटल्याशिवाय रहाणार नाहीं.

# १

# क्रेमलिनमध्यें कामगार

“ फ्रेंच क्रांतीनंतरच्या काळांतील जगाच्या सामाजिक इतिहासांत अत्यंत महत्त्वाची अशी तारीख ७ नोव्हेंबर १९१७ ही आहे, असें मी मानतों. फ्रेंच क्रांतीच्या परिवर्तनापेक्षां रशियन क्रांतीनें झालेलें परिवर्तन फारच मोठें आहे. चुका, मूर्खपणा, तसेच दुसरे कित्येक गुन्हे रशियन क्रांतीमध्यें घडले नाहींत असें नाहीं. पण हा क्रांतीचा प्रयत्न प्रचंड असून यशस्वी होईल.”

—रोमें रोलाँ

रशियाचें रशियन भाषेंतील नांव “ रूस ” असून त्याचा उदय नवव्या शतकांत झाला. त्यावेळीं रूरीक नांवाच्या व्हायकिंग सरदारानें स्लाव जातीच्या रहवाश्यांवर आपला पगडा बसविला. तेराव्या शतकापासून जंगीझखानानें चालविलेल्या स्वाऱ्या थेट मध्यकालापर्यंत सुरूच राहिल्या. व तोंपर्यंत स्लाव लोक मोंगलांच्या ( किंवा टार्टार ) सत्तेखालून पूर्णपणें बाहेर पडूं शकले नाहींत. सोळाव्या शतकांत मोंगलांना स्लाव प्रांतांतून हुसकावून लावण्यांत आलें. अठराव्या शतकांत पीटर दी ग्रेट राजानें स्वीड लोकांचें प्रभुत्व हिसकावून झारशाही सत्तेचा पाया उभारला. दुसऱ्या कॅथेरीन राणीनें तुर्कस्थानच्या साम्राज्याला खो दिला आणि क्रमशः रशियन साम्राज्याची सीमा वाढवून त्या सत्तेखालीं बरेच परकीय लोक ओढून आणले. पश्चिमेकडे लिथुनिया व पोलंडचा भाग, पूर्वेकडे काळ्या समुद्रावरील तुर्की सरदारांचे प्रांत हे त्यावेळीं रशियानें जिंकले. पुढें कांहीं कालानें रशियन सत्ता सैबेरियांत स्थापन झाली. रशियन साम्राज्याची वाढ १९ व्या शतकापर्यंत एकसारखी चालली होती व तिचा प्रसार पॅसिफिक समुद्रावरील व्हाडिव्होस्टाक शहरापर्यंत झाला. १८१२ सालीं रशियांत नेपोलियनचा पराभव झाला व त्यामुळें झारला ‘युरोपचा पोलीस’ असें मानण्यांत येऊं लागलें. १८४८ मध्यें युरोपमधील क्रांतीचे अनेक

प्रयत्न झारच्या मदतीनें निरनिराळ्या देशांत मोडण्यांत आले. परंतु त्याबरोबर रशिया हा एक बागुलबुवा होऊन बसला. रशियन साम्राज्य हिंदुस्थानास भिडत असल्यामुळें इंग्लंडला रशियाची भीति वाटूं लागली. ही भीति आजतागायत तशीच आहे. परंतु आजची भीति ही रशियन साम्राज्याच्या वाढीची नसून सोव्हियट विचारांच्या फैलावाची आहे.

एकोणिसाव्या शतकांत रशिया एक देश नाहीं तर तें दोन देशांचें एकीकरण आहे असें बरेंचदां म्हणण्यांत येत असे. एका रशियांत पूर्वी शेतकऱ्यांस गुरां-ढोरांप्रमाणें वागविण्यांत येत असून जमिनीची मालकी पूर्णपणें जमीनदारांच्या हातीं असे. त्यांच्या शेतीचीं साधनें हिंदुस्थानाप्रमाणें अगदीं भिकार होतीं. शेतावर काम करणाराला गुलामाप्रमाणें लिलांवानें विकतां येत असे; तसेंच घोडे व कुत्र्यां-बरोबर नगास नग म्हणून ह्या शेतीच्या कामगाराची अदलाबदल करण्याचा रिवाज तेथें चालू होता. जुगाराच्या खेळांत ह्या कामगारांचा पण लावण्याची वहिवाट होती. ही स्थिति १८६१ पर्यंत चालू होती व तिचा अंत होण्याचें कारण शेतकऱ्यांचीं बंडें. गरीब शेतकामगारांचीं हृदयद्रावक वर्णनें रशियन वाङ्मयांत बरींच असून टॉलस्टॉयनें तर हीं वर्णनें परिणामकारकतेच्या दृष्टीनें कळसास पोंचविलीं आहेत.

रशियाच्या ह्या गुलामगिरीचे सूत्रधार पुष्कळच होते. सरकारी अंमलदार, जमीनदार, श्रीमंत व्यापारी, कायद्याच्या कचेऱ्या व पोलीस हा या सूत्रधारांचा दुय्यमवर्ग असून ह्या सर्वांवर झारचा हुकूम पूर्णपणें गाजत असे. युरोपमध्यें रशिया अत्यंत प्रतिगामी देश असून त्याला "पुण्यात्मा रशिया" अशी संज्ञा होती; व झारला गोऱ्या रंगाचा लहान पिता (ईश्वर हा मोठा पिता) असें म्हणत. रशियाचे धर्माधि-कारी व सरकारी अंमलदार वरच्यासारख्या मूर्खपणाच्या कल्पना लोकांत जोरानें पसरवून त्यांना कायमचें पायांखालीं ठेवण्याचा प्रयत्न करीत होते. १८२५ सालीं असल्या बेशरम झारशाहीविरुद्ध सैन्यांतील उदारमतवादी अधिकारी तसेंच इतर सरदार ह्यांनीं बंड उभारलें. पण तें उत्पन्न होतांच मोडण्यांत आलें व झारची सत्ता वाढली. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या पन्नास वर्षांत क्रांतिकारक विचा-रांचा पुन्हां नव्यानें फैलाव झाला. १८९० सालीं समाजसत्तावाद बराच पुढें गेलेला असून एक गट कार्ल मार्क्सच्या तत्त्वांचें प्रतिपादन करी व दुसरा गट 'नरोद्नीकी' विचारांचा होता. नरोद्नीकी म्हणजे लोकपक्ष. सरकारी अंमलदारांचा

व जमल्यास खुद्द झारचा वध केल्याशिवाय क्रांति सफल होणार नाहीं असा नरोझीकी पक्षाच्या मताचा रोख होता, व या पक्षाला आपल्या उद्योगांत हत्याकांडाच्या दृष्टीनें बरेंच यश आलें पण त्याच्या परिणामीं क्रांति सफल होण्याऐवजीं अनेक लोकांना फांशी मात्र जावें लागलें. कित्येकांना जन्मठेप, हद्दपारीची शिक्षा भोगावी लागली. अर्थातच क्रांतीचे विचार उघडपणें चव्हाट्यावर मांडणें यामुळें अशक्य झालें. पण मनांतील असंतोषाची आग विझणें अशक्य होतें. क्रान्तीच्या विचारांचा प्रसार मुळांत उपटून टाकण्यासाठीं लेखकांच्या संख्येपेक्षां कितीतरी पटीनें जास्त सेन्सर ( वाङ्मय नियंत्रणाधिकारी ) तेव्हां नेमले गेले होते व गणिताच्या पुस्तकांवर सुद्धां ह्यांच्याकडून आक्षेप घेण्यांत येत असे.

१९१७ सालच्या जानेवारी महिन्यामध्यें क्रांतीचा उठाव होण्यापूर्वी लोकांना हक्क असे कांहीं उरलेच नव्हते. निर्भेळ गुलामगिरी त्यांच्या नशिबीं आलेली होती. एकाद्या कायद्याचा अंमल करणें किंवा त्याला गुंडाळून ठेवणें हे प्रकार लोकांना न विचारतां अधिकाऱ्यांकडून मनसोक्त रीतीनें घडत असत.

सभांतून किंवा वर्तमानपत्रांतून वादविवाद करण्याची सरकारी कायद्यानें मुळींच परवानगी ठेवलेली नव्हती. सभा म्हटली कीं आधीं अधिकाऱ्यांची संमति व नंतर देखरेख असा दुहेरी काच लोकांना सोसावा लागे. झार व त्याचे होयबा अधिकारी यानांच काय तो विचारासाठीं मेंदूचें चलनवलन होऊं देण्याचा जणूं काय ईश्वरी संनदेनें मक्ता मिळालेला होता.

एकोणिसाव्या शतकांतील रशियन सत्ता जमीनदारी वर्गावर अवलंबून होती. वरच्या वर्गांतील लोकांस अधिकार व खालचा असंख्य वर्ग केवळ गुलामांचा हें तत्त्व तेव्हां अंमलांत होतें. ह्या शतकाच्या शेवटल्या वर्षांत परक्या देशांतील संपत्तीवर कारखानदारीचा उद्योग शहराशहरांतून झपाट्यानें वाढला. त्यामुळें शेतकरी वर्ग कामासाठीं बऱ्याच मोठ्या प्रमाणांत शहरांकडे धावूं लागला. हिंदी मजुरांप्रमाणें ते मजूर मधून मधून आपापल्या गांवीं जात असत. परंतु नकळत नव्या क्रांतिकारक विचारांचा फैलाव शहरच्या रहाणीमुळें त्यांच्यामध्यें चालू होता.

सारा दिवस काबाडकष्ट करावे व अगदीं थोड्या मजुरीवर जगावें, अशी या कामगारांच्या जीवनाची स्थिति होती. ह्या स्थितींत सुधारणा घडवून आणण्यासाठीं कामगार वर्गाला पुनः पुन्हां लढा करावा लागला. देशाच्या एका टोंकापासून

दुसऱ्या टोंकापर्यंत वणव्याप्रमाणें मोठाले संप भडकून पसरूं लागले. हे संप मोडण्याचा प्रयत्न झारशाहीकडून कमालीच्या जुलूम-जबरदस्तीनें करण्यांत आला; परंतु त्या योगानें कामगारांचा मनःक्षोभ जास्तच वाढत जाऊन कामगारांची संघटना व चळवळ अधिकाधिक तीव्र होत गेली.

ह्या चळवळीचा पुढाकार समाजसत्तावादी लोकांच्या हातांत होता. १८८० सालापासून सुशिक्षित लोक मार्क्स व अँगल्स यांच्या तत्त्वानुसार समाजसत्तावादाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करूं लागले. पुढल्या दहा वर्षांत रशियांतील अनेक शहरांतून ह्या नव्या तत्त्वाचा अभ्यास करणारे गट निर्माण होऊन कामगारांना समाजसत्तावादाचें शिक्षण देणारे बरेच लोक पुढें आले. १८९५ ते १८९६ सालांत झालेले संप हे पुढील रशियन क्रांतीच्या यशाचें मूळ होत, असें म्हणणें अतिशयोक्तीचें ठरणार नाहीं. १९०५ ते १९०७ पर्यंत समाज-सत्तावादी पुस्तकांच्या सहा कोट प्रती रशियांत खपल्या आणि वाचल्या गेल्या. पूर्वोक्त शिक्षणाचा हा एक दृश्य परिणाम होय असें म्हटल्यास गैर होणार नाहीं. अशा वातावरणांत रशियन क्रांतीचा पुढाकार घेणारा व्ह्लाडीमीर इलिच उल्यानॉफ—म्हणजेच लेनिन—वाढला. बेकायदेशीर रशियन सोशल डेमोक्रॅटिक पार्टीचा पुढारीपणा लेनिनकडे असून त्याला आपल्या आयुष्यांतील बरींच वर्षें गुप्त रीतीनें इतर देशांत काढावीं लागलीं. अनेक वेळां त्यानें तुरुंगवासाची व हद्दपारीची शिक्षा भोगली. त्याचा वडील बंधु दुसऱ्या अलेक्झांडरचा खून करणारांत सामील असल्याच्या आरोपावरून फांसावर लटकला. पुढील काळांत रशियन सोशलिस्ट पार्टीचे दोन विभाग झाले. बोल्शेव्हिक म्हणजे बहुमताचा पक्ष व मेनशेव्हिक म्हणजे अल्प मताचा पक्ष. बोल्शेव्हिक पक्षाचा पुढाकार लेनिनकडे होता.

१९१४ च्या महायुद्धामुळें झारशाही आंतून पोखरली जाऊन कमकुवत बनली. ह्या युद्धांत १ कोट रशियन शिपाई रणांगणावर बेपत्ता, जखमी व ठार झाले. देशाची एकंदर स्थिति फारच खालावली. १९१७ सालीं लोकांना युद्ध नकोसें वाटूं लागलें. अन्नाच्या तुटवड्यानें देशभर लोक मरूं लागले. देशांतील राजसत्तेंत एकाएकीं भराभर फरक होऊं लागला. लिटव्हिनॉफच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, "धान्याच्या दुकानासमोर लांबच लांब रांगांतून उभ्या रहाणाऱ्या स्त्रिया क्रांतीच्या तांडवास कारण झाल्या." लोक व पोलीस ह्यांच्यामध्यें मारामारी होऊं लागली. नेहमींप्रमाणें क्रूर कोसॅक शिपायांना हातांत चाबूक देऊन लोकांना

झोडपून पळविण्यासाठीं लोकांच्या गर्दीवर सोडण्यांत आलें, पण ह्या प्रसंगीं ते सगळेच शिपाई हातांतील चाबकाचा उपयोग लोकांवर करण्यास तयार नव्हते; व त्यांच्यांतील पुष्कळजण झारशाहीबद्दल बेदिल झालेले होते. अशा लष्करी शिपायांनीं झारशाहीविरुद्ध लोकांतर्फे लढण्याला आरंभ केला व लवकरच रस्त्यांतील किरकोळ झटापटींना बंडाळीचें रूप आलें. झारशाहीच्या विरोधक दळानें दारू-गोळ्याचीं कोठारें लुटलीं. लष्करी शिपाई लोकांच्या बाजूला वाढत होतेच. कामगार व त्यांच्या मिलाफाचें लष्कर यांच्या हातीं झारशाहीचें केंद्र पडण्यांत या लढ्याचें पर्यवसान घडलें. बंडाच्या ह्या सामर्थ्याची जाणीव झारशाहीला फार उशीरा झाली.

अखंड तीनशें वर्षें ज्या रोमानॉफ राजवंशानें रशियावर अंधाधुंदीची. यथेच्छ सत्ता गाजविली. त्या राजवंशाचा १२ मार्च १९१७ सालीं समूळ उच्छेद झाला. क्रांतीच्या सुरवातीस रशियांत एकाच वेळीं दोन मतांचीं सरकारें अस्तित्वांत आलीं होतीं. एक प्रोव्हिजनल (कामचलाऊ) सरकार व दुसरें सोव्हियट; परंतु सोव्हियट मताविरुद्ध कोणाचेंही चालण्यासारखें नव्हतें.

७ नोव्हेंबर १९१७ रोजीं सोव्हियट सरकारच्या हातांत पूर्णपणें सत्ता आली. मार्च महिन्यांतील क्रांतीच्या ह्या पहिल्या उठावांतच झारशाही संपली आणि सत्ता पुरोगामी लोकांच्या हातीं आली. पूर्वीच्या झारशाहींतील एकंदर संस्था नष्ट होऊन त्या जागीं सोव्हियट स्थापन करण्यांत आलें. सोव्हियट संस्था रशियन कामगार, शेतकरी, व शिपाई इत्यादि वर्गास नव्या नव्हत्या; कारण १९०५ च्या अयशस्वी क्रांतीच्या प्रसंगीं रशियाच्या अनेक भागांतून सोव्हियट संस्था उभारण्यांत आल्या होत्या. फेब्रुआरी ते नोव्हेंबरच्या काळांत बोल्शेव्हिक पक्षाच्या मतप्रणालीनें सगळा रशिया पादाक्रांत केला. ह्या यशाचें मुख्य कारण म्हणजे बोल्शेव्हिक पक्ष एकविचारानें युद्ध सुरू ठेवण्याच्या विरुद्ध होता हें होय.

संपूर्ण राजकीय सत्ता हातांत येतां क्षणीं बोल्शेव्हिकांनीं आपलें लक्ष "प्रति-राज्यक्रांतीच्या प्रयत्नांचें घातक विषारी मूळ" देशांतून कायमचें नष्ट करण्याकडे लाविलें. क्रांतीनंतरच्या पहिल्या काळास—War Communism हें नांव आहे. देशांतील यादवी संपविणें, प्रतिक्रांतीचे प्रयत्न नष्ट करून देशभर शांतता स्थापन करणें व देशाच्या आर्थिक उन्नतीच्या कार्यास सुरवात करणें ह्याकडे सोव्हियट सरकारनें पूर्णपणें लक्ष दिलें. ह्या कार्यात त्यांनीं उत्तम यश मिळविलें. देशांतील प्रतिराज्यक्रांतीचे प्रयत्न करणारांस भांडवलशाही देशांतून द्रव्याची मदत सुरू होती,

इतकेंच नव्हे तर दारूगोळा व शिपाईसुद्धां पुरविले जात होते. पण बोल्शेव्हिकांनीं हे प्रयत्न अतोनात कष्ट भोगून व जरूर पडली तेव्हां क्रूर उपायांचा स्वीकार करून कायमचे निकालांत काढले. ह्या यशाची कल्पना येण्यासाठीं एक गोष्ट ध्यानांत ठेवणें अवश्य आहे. ही नवी सोव्हियट सत्ता उलथून पाडावी या हेतूनें इंग्रजांचें व अमेरिकेचें मोठें लष्कर आर्चांगलच्या भागांत तळ देऊन बसलें होतें व जपानी सैन्य व्हाडीव्होस्टाकमध्यें उतरलें होतें; पोलंडच्या व झारच्या बाजूस असलेल्या रशियन सैन्यानें कीव्ह, ओडेसा आणि काळ्या समुद्रास वेढा दिला होता. सोव्हियट पुढाऱ्यांना कोणत्या बिकट परिस्थितीशीं सामना देऊन यश मिळवावें लागलें याचा बोध वरील हकीकतीनें होईल.

सोव्हियटकडील लाल फौजेस ह्यावेळीं पुरेसें अन्नहि मिळत नव्हतें, त्यांच्याकडे पांघरण्यास कपडे नव्हते, पायांत बूट नव्हते, व त्यांच्याकडे भरपूर शस्त्रास्त्रेंहि नव्हतीं. अशा भिकार स्थितींत असूनसुद्धां जो पराक्रम इतक्या सुसज्ज राष्ट्रांविरुद्ध रशियानें गाजविला तो न विसरल्यास आजचा जर्मनीच्या चढाईविरुद्ध दिसणारा सोव्हियट फौजेचा अद्भुत पराक्रम एक प्रकारें साहजिकच म्हणावा लागतो. सोव्हियट नवयुगासंबंधीं रशियन लोकांचा निस्सीम विश्वास हेंच ह्या आश्चर्यकारक पराक्रमाचें रहस्य आहे.

देशांतील यादवी आटोपल्यावर युद्धकालीन जुजबी समाजसत्तावादाची ( War Communism ) इतिश्री झाली. व 'नेप' चा ( नवी आर्थिक योजना ) काल १९२१ सालीं उदयास आला. नेप सुरू झालें तेव्हां बरेच लोक म्हणूं लागले कीं आतां लेनिन भांडवलशाहीकडे वळला; कारण 'नेप' च्या सुरवातीस लहान सहान व्यापाराविषयीं सोव्हियट सरकारनें सहानुभूति दाखविली होती; परंतु ही सहानुभूतीची शक्कल केवळ नव्या कार्याचीं मुळें खोल रुजण्याला सवड सांपडावी म्हणूनच काढलेली होती. खुद्द लेनिनच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे " एक पाऊल मागें व दोन पुढें " असा या शक्कलीचा अंतःस्थ हेतु होता असें पुढील धोरणाच्या अनुषंगानें म्हणावें लागतें.

# १०

## वीज + सोव्हियट = समाजसत्तावाद

" रशिया माते, तुझी संपत्ति आणि शक्ति अफाट असूनही तूं आज दीन व लाचार झालेली आहेस."

—नेक्रासॉफ

११ मार्च १९२८ सालीं जेव्हां सोव्हियट सरकार पेट्रोग्राड सोडून मॉस्कोला गेलें, तेव्हां वरील मथळ्याखालीं लेनिननें एक लेख लिहिला, यासाठीं सोव्हियट सरकारनें आपल्या देशाची संपत्ति व ताकद कशी वाढविली ह्याच्याकडे आपण लक्ष देणें उचित आहे. झारशाहीकडून सोव्हियट सरकारास मिळालेला राष्ट्रीय संपत्तीचा वारसा जवळ जवळ शून्याचाच होता. राष्ट्राची आर्थिक स्थिति फारच खालच्या दर्जाची असून त्या स्थितीची तुलना पाश्चिमात्य राष्ट्रांशीं करणें अशक्यच होईल. मॉस्को व पेट्रोग्राड शहराजवळ तसेंच डोनेत्स आणि ड्नीपरच्या प्रदेशांतच मोठ्या कारखानदारीचे धंदे पहावयास मिळत. परंतु हा प्रदेश रशियन साम्राज्याच्या विस्ताराकडे नजर टाकल्यास 'दर्यामें खसखस' असा ठरतो हें मुद्दाम सांगावयास नकोच. कारखान्यांतून काम करणारांची संख्या २० लक्ष होती आणि त्याच्या दुप्पट कामगार ग्रामोद्योगांत होते. रशियन साम्राज्याची लोकसंख्या जर १०० मानली तर १५ इसम शहरांत रहात असून त्यांतील १० लोक कारखान्यांतील कामगार होते. लोकसंख्येच्या चार-पंचमांशाइतकी संख्या शेतकीचें काम जुन्या पद्धतीच्या नांगरानें करीत असे. शेतकरी कुटुंब मोठें असून त्याचें उत्पन्न महिना १५ रुपयांपेक्षां जास्त नसे.

रशियांतील आगगाडीच्या वहातुकीचें प्रमाण युरोपमध्यें अति कनिष्ट दर्जाचें होतें. रशियांतील औद्योगिक कारखान्यांतून वरच्या दर्जाचें काम परराष्ट्रांतील लोक पहात; त्याला लागणारीं साधनें व पैसा परराष्ट्रांतूनच येत होता. रशियाच्या आंतल्या प्रदेशांतून फक्त कच्चा माल तयार होत असे. आणि रशियाच्या शेतांचें पीक अत्यंत

मोठ्या प्रमाणांत युरोपमधील देशांस पुरविण्यांत येई. रशियांत येणाऱ्या मालापैकीं एक-तृतीयांश व पक्का माल असे; बाकीचा लोखंड, पोलाद, कापूस, लोकर व कोळसा वगैरे असे.

अशा मागासलेल्या रशियाची स्थिति मागील महायुद्धानंतर अत्यंत निकृष्टावस्थेस पोंचली ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. युद्धाच्या वेळीं रशियन फौजेस लढाईच्या आघाडीवर सामान पुरविणें अशक्य झालें; कारण वहातुकीचीं साधनें फार अपुरीं व अंदाधुंदीचीं होतीं. खुद्द देशांतही हीच स्थिति आली. वस्तूंचे भाव अतोनात वाढूं लागले. रात्रंदिवस दुकानापुढें लोकांना मालासाठीं उभें रहावें लागे. झारनें कागदी-चलनाचा सुकाळ केला, पण शेतकरी वर्ग ह्या चलनाला मान देईनासा झाला. यामुळें शेतकरी आपला मालहि विकीना. क्रांति होण्याच्या दिवसापर्यंत ही स्थिति चालू राहिली. क्रांतीनंतरच्या यादवीच्या व इतर राष्ट्रांच्या लुडबुडीच्या दोन वर्षांत वरील स्थिति जास्तच बिघडली. या काळापूर्वी रशियन कारखान्यांचें उत्पन्न इतर देशांच्या मानानें आधींच अगदीं क्षुल्लक होतें; पण तें आतां पूर्वीच्या क्षुल्लक प्रमाणाच्या पंचमांशावर आलें. शेतीची बाबहि अशीच झाली. लागवडीचें क्षेत्रफळ आंखडत आंखडत निम्म्यावर आलें. आणि निम्में क्षेत्रफळ उजाड होऊन त्याचें पीक थांबलें. या दुर्दशेंतून सोव्हियट सरकारला आपलें डोकें वर काढण्यासाठीं १९२८ सालापर्यंत सारखी धडपड करावी लागली. परिणामस्वरूप म्हणजे १९२८ सालीं राष्ट्राचें उत्पन्न १९१४ सालाइतक्या प्रमाणावर आलें हें होय. सोव्हियट राजवटीची मुहूर्तमेढ रोवतांना लेनिननें जाहीर केलें होतें कीं, " समाजसत्तावादी रशिया ' नेप ' काळांतून उदयास येईल. " पण हें ऊर्जितावस्थेचें भविष्य यथार्थ कसें ठरवावयाचें, हा प्रश्न सोडविण्यामध्यें सोव्हियट राज्यकर्ते अहर्निश चूर होते. शेवटीं त्यांच्या आशावादाला मोहोर आला व प्रारंभीं दिलीं गेलेलीं अभिवचनें हीं केवळ उत्साहाचीं सुखस्वप्नें नव्हतीं, असें सगळ्या जगाला दिसून आलें.

योजना हा समाजसत्तावादाचा प्रमुख घटक आहे. " योजना करण्यास घाबरूं नका. योजनेशिवाय आर्थिक सुधारणा होणार नाहीं " असें लेनिन नेहमीं म्हणे. त्याप्रमाणें सोव्हियट सरकारनें नवा मार्ग शोधून काढला. १९२१ सालीं विजेच्या पुरवठ्याची दहा वर्षांची योजना जाहीर करण्यांत आली. ह्या योजनेप्रमाणें देशभर तीस मोठीं विजेचीं ठिकाणें बांधावयाचीं असें ठरलें. लेनिनचा ह्याच्यावर इतका विश्वास होता कीं, तो म्हणे, " वीज + सोव्हियट = समाजसत्तावाद. " लेनिनच्या

शब्दांत सांगावयाचें म्हणजे " ह्या योजनेनें राष्ट्राची सर्व ताकद एकत्र करतां येईल. " तसेंच तो म्हणे कीं, " अशाच दहा किंवा वीस वर्षांच्या अफाट योजनेवर कामगारांत हुरूप उत्पन्न करतां येईल. " आज विजेच्या बत्त्या सोव्हियट खेड्यांतूनही दिसतात व त्यांना लोक " लेनिनचा उजेड " असें म्हणतात.

१९२२ सालीं सोव्हियट इतिहासांतील अत्यंत महत्त्वाची अशी एक गोष्ट घडली. ती ही कीं " गोस्प्लान " अथवा " राष्ट्रसंघटनेच्या योजनेच्या संस्थेची" स्थापना. देशांतील निरनिराळ्या संस्थांच्या योजनेंत फरक करणें व त्यांस एक विशिष्ट दिशा देणें ह्या कार्याकडे " गोस्प्लान " नें लक्ष दिलें. १९२५ सालीं अनेक योजनांतून एक सूत्रीपणा आणण्याचें कार्य या संस्थेनें केलें व प्रत्येक राष्ट्रीय कार्यकारी संस्थेस योग्य व जरूरीचें काम देण्यांत आलें. अनेक निरनिराळ्या संस्थांशीं " गोस्प्लान " चा निकट संबंध आल्यामुळें आतां आंकडेवार चोख व बिनचूक माहिती जमा करणें शक्य झालें, व त्यामुळें त्यांच्या पुढील योजनेस मदत झाली. ह्या योजनेप्रमाणें निरनिराळ्या खात्यांनीं पुढील अमुक काळांत काय केलें पाहिजे ह्याचा अंदाज बांधण्यांत आला. व ह्यावरूनच सबंध राष्ट्रांसाठीं म्हणून एक योजना करण्यांत आली.

" पंचवार्षिक योजना " जिला म्हणतात तिची सुरवात १९२८ सालीं करण्यांत आली. ह्या योजनेचा उद्देश म्हणजे मागासलेल्या शेतीच्या धंद्याचें आधुनिक प्रचंड उद्योगधंद्यांत परिवर्तन करणें हा होय. हें साध्य करण्यासाठीं सर्व मोठे उद्योगधंदे विजेवर चालविणें व कच्च्या मालाची झपाट्यानें वाढ करणें जरूर आहे असें दिसून आलें; तसेंच जुन्या वैयक्तिक शेतीऐवजीं नवी सामुदायिक शेतीची पद्धति अंमलांत आणणें जरूर भासलें. यासाठीं मोठमोठ्या शेतांवर यंत्राच्या सहाय्यानें शेतीला सुरवात झाली. याबरोबरच कच्च्या मालाची पैदास वाढवून व यंत्राच्या सहाय्यानें शेतीचें प्रमाण अधिक चढवून, फालतू राहिलेले लोक दुसऱ्या छोट्या मोठ्या उद्योगधंद्याकडे वळविण्यास सुरवात झाली.

१९२८ ते १९३३ पर्यंत खालील कार्यक्रम यशस्वी करण्याचें सोव्हियट सरकारनें ठरविलें. ( १ ) लहान लहान कारखान्यांचें उत्पन्न दुप्पट करणें; मोठ्या कारखान्यांचें तिप्पट करणें; देशांतील विजेची शक्ति चौपट करणें; आणि कामगारांस शेंकडा ११० टक्क्यानें काम वाढविण्यास शिकविणें. ( २ ) साठ लक्ष लहान शेतें

मोठ्या सामुदायिक शेतींत बदलणें व नव्या यंत्रांवर शेतीचें काम चालविणें. ( ३ ) एक कोटी सत्तर लाख लोकांस लिहावयास व वाचावयास शिकविणें. आठ लाख लोकांस इंजिनिअरींग व भौतिकशास्त्रांचें शिक्षण देणें. ( ४ ) परकीय राष्ट्रांच्या तोंडाकडे न पहातां ८६, ०००, ०००, ००० रुबल इतक्या रकमेची उभारणी या योजनेच्या अंमलबजावणींतूनच करणें.

प्रथमतः दुसऱ्या राष्ट्रांतून ह्या योजनेची चेष्टा होऊं लागली. बरेच लोक म्हणत कीं, हें स्वप्न आहे. कांहीं लोक म्हणत कीं, रशियांतील भोळ्या लोकांना मोठ्या आंकड्यांनीं फसविण्याचा बोल्शेव्हिकांचा हा एक डाव आहे. तथापि इतरांच्या स्तुतिनिंदेकडे लक्ष न देतां आपली योजना कशी मूर्तावस्थेस न्यावी, ह्या एकाच विचारांत सोव्हियट पुढारी रात्रंदिवस निमग्न होते.

ह्या अचाट योजनेची प्रत्यक्ष उभारणी करण्यास रशियन लोकांना किती कमालीचे श्रम पडले हें सांगावयास नको. या कामगारांच्या श्रमाचा मोठा हिस्सा मोठमोठे उद्योगधंदे उभारण्यांत खर्च होत असे. बाहेरच्या देशांतून केवळ ह्या धंद्यासाठीं लागणारा माल सोव्हियट सरकार मागवी पण मनुष्याच्या रोजच्या व्यवहारास लागणाऱ्या वस्तूंची मात्र फार टंचाई असे. बरेच लोक मोठ मोठ्या कारखान्यांत काम करूं लागल्यामुळें त्यांचें उत्पन्न वाढलें पण त्या लोकांना लागणाऱ्या वस्तूंचा मात्र अभाव होता. रशियांत ह्या काळाला " मालाचा दुष्काळ " असें म्हणत. असा माल सर्वांस मिळावा म्हणून रेशनची प्रथा रशियांत सुरू करावी लागली. महत्त्वाचें काम करणारांकरितां मात्र बऱ्याच वस्तु राखून ठेवण्यांत येऊं लागल्या. ही परिस्थिति १९३४ च्या अखेरपर्यंत चालू राहिली.

" पंचवार्षिक योजनेचा " दुसरा हप्ता १९३४ ते १९३७ पर्यंत होता. ह्या काळांत राष्ट्राचें उत्पन्न दुप्पट करावयाचें असें ठरलें व मुख्यत्वेंकरून राष्ट्राचें लक्ष मोठे कारखाने उभारण्याकडेच होतें. पहिल्या योजनेपेक्षां ही योजना झपाट्यानें तडीस नेण्यांत आली. १९३७ सालांत योजनेच्या मूळ अंदाजी आंकड्यापेक्षांही राष्ट्राचें उत्पन्न वाढलें ह्याचें कारण सोव्हियट कामगारांस आतां नव्या कामाचा सराव झाला होता व त्यांचें कौशल्यही वाढलें होतें. ह्याचें स्पष्ट प्रतीक म्हणजे—" स्टखानॉफ मार्ग. " स्टकानॉफ हा खाणींत काम करीत असे.

१९३५ सालीं त्यानें आपल्या बरोबरच्या कामगारांस काम कसें झटपट करावें हें दाखविलें. त्याच्या यशाचें कारण म्हणजे यंत्रांचा कुशलतेनें उपयोग, कामाची आवड आणि आस्था, व त्याकडे लक्ष, हें होय. त्याचें उदाहरण थोड्याच काळांत निरनिराळ्या कार्यकर्त्यांनीं उचललें. फलस्वरूप म्हणजे १९३३ सालापेक्षां प्रत्येक मजुराचें काम तिप्पट वाढलें. स्टखानॉफच्या या कुशलतेबद्दल त्याला इतका मान मिळाला कीं, सोव्हियट वर्तमानपत्रें स्टालिनला "स्टखानॉफ नंबर एक" असें म्हणूं लागलीं.

रशियांतील माझ्या रहिवासाचा काळ हा दुसऱ्या योजनेचा काळ होता. मी १९३४ सालीं रशियांत गेलों, तेव्हां सोव्हियट दुकानांतून माल थोडा व कमी प्रतीचा मिळे. परदेशी नाणें जवळ असणाऱ्याला "टोर्गसीन" नांवाच्या दुकानांतच चांगल्या वस्तु मिळावयाच्या; याचें कारण सोव्हियट सरकारला यंत्रें विकत घेण्यास परदेशी नाण्यांची जरूरी होती. परंतु १९३६ सालीं ही स्थिति बदलली व पाहिजे त्या दुकानांत सोव्हियट चलनावर उत्तम माल मिळूं लागला. खाद्य पदार्थ, मांस, तंबाखू, ग्रामोफोन, रेडीओ, कॅमेरे वगैरे जिनसा जिकडेतिकडे दिसूं लागल्या. दुकानांचें रूप एखाद्या नखरेदार स्त्रीप्रमाणें वारंवार बदलूं लागलें व गांवोगांवीं ह्या जिनसा आतां तयार होऊं लागल्या.

दुसऱ्या योजनेच्या सुरवातीसच लढाईचे काळे ढग दिसूं लागले. १९३१ सालीं जपाननें मांचुरीयावर स्वारी केली. १९३३ सालीं जर्मनीमध्यें हिटलरचा उदय झाला. म्हणून दुसऱ्या योजनेंत बरेच फेरफार करावे लागले. कधीं ना कधीं युद्धाची पाळी सोव्हियट सरकारवर येणार हें ध्यानांत घेऊन सरकारनें आपलें लक्ष विशेषतः युद्धसामुग्रीच्या उत्पादनाकडे लावलें व त्या दृष्टीनें उपयुक्त असे नवे धंदे सोव्हियटच्या मध्य आशियांतील भागांत उभारण्यांत आले. बाहेरून जरी सर्व ठाकठीक दिसे. रेशनिंगहि काढून टाकण्यांत आलें असलें तरी यावेळीं राष्ट्राचें लक्ष सर्वस्वी युद्धसामुग्रीच्या उत्पादनाकडे लागलेलें होतें.

तिसरी "पंचवार्षिक योजना" १९३७ मध्यें सुरू झाली. १९४२ सालीं ही योजना पुरी करण्याचा सोव्हियटचा मानस होता. ह्या योजनेप्रमाणें उरल, सैबेरिया आणि मध्य आशियांतील कारखाने पूर्णपणें यशस्वी झाले व युद्धसामुग्रीचें सामान झटपट तयार करण्यांत येऊं लागलें.

उद्योगधंद्याच्या ह्या पूर्वगामी योजनेस कितपत यश मिळालें तें आजच्या युद्धांतील रशियन विजयांवरून ध्यानांत येण्यासारखें आहे. लढाई सुरू झाल्यावर उद्योगधंद्यांना आणखी जास्त महत्त्व आलें व बरेचसे पश्चिमेकडील कारखाने व त्यांतील कुशल कामगार ह्यांना पूर्वेकडे नेण्यांत आलें. आजकाल उरलचें उत्पन्न सर्व देशाच्या निम्मे आहे. उक्रेन व डोनेत्स प्रांत जेव्हां जर्मनीनें घेतला तेव्हां तर सोव्हियट सरकारचें लक्ष पूणपणें पूर्वेकडेसच लागलें.

# ११

# योजनेचे कर्ते लाखों लोक

" आजच्या भौतिक काळास आमचें सरकार आर्थिक व सामाजिक विचारांचा लगाम घालणार आहे व तसें करण्यांत तें खात्रीनें विजयी होईल. कारण आमच्या सरकारचें धोरण कालगतीस धरून आहे."

—लेनिन

सोव्हियटमध्यें सर्वांगीण उन्नतीस भरपूर वाव आहे. ह्या देशाचें क्षेत्रफळ अफाट व जमीन संपन्न असून रबराखेरीज इतर कारखान्यांस लागणारे इतर सर्व पदार्थ उपलब्ध आहेत. रबराचा हा अभाव दूर करण्यासाठीं आजकाल कृत्रिम रबर ( synthetic rubber ) तयार करण्याला सुरवात झाली आहे. लाकडाचा पुरवठाहि रशियांत विपुल आहे. मोठमोठ्या नद्यांपासून जलशक्तीचा पुरवठाहि चांगलाच होतो. लोखंड, मँगेनीज, सोनें व खतासाठीं लागणारे खनिज पदार्थ यांचे दुसऱ्या कोणत्याहि देशांपेक्षां रशियांतील उत्पन्न मोठें आहे. शास्त्रज्ञांचा असा तर्क आहे कीं, सोव्हियट भूमींतील संपत्ति इतर सर्व देशांच्या एकत्रित संपत्तीपेक्षांही जास्त होईल. सोव्हियटमधील कोळशाचें उत्पन्न अमेरिकेच्या खालोखाल असून सैबेरियांतील टंड्रा प्रदेशांत मिळणाऱ्या निकलच्या धातूंचें उत्पन्न कॅनडाच्या खालोखाल आहे. आशियांतील मध्य भागांत तांबें सांपडतें. शिसें, जस्त, बाक्साईट व क्रोम धातू रशियांत आहेत. धान्याच्या प्रचंड पुरवठ्याबद्दल तर तेथें प्रश्नच नाहीं.

झारशाहींतील रशियाची स्थिति ध्यानांत ठेवून आज सोव्हियटनें युरोपमधील कोणत्याही प्रगल्भ राष्ट्राइतकी केलेली स्वतःची उन्नति व कांहीं बाबतींत पुढारलेल्या अमेरीकेचीहि केलेली बरोबरी पहातां सोव्हियटची ही कामगिरी प्रचंड आणि प्रशंसनीय आहे, असेंच कोणीहि म्हटल्याशिवाय राहाणार नाहीं; परंतु सर्वच बाबतींत सोव्हियटनें पुढारलेल्या राष्ट्रांना मागें टाकलें आहे असें मात्र म्हणतां येत नाहीं.

आपलीं घरें, धान्य व इतर सामुग्री जाळून टाकतात व जर्मन सैन्यास शेताचा कोणत्याही तऱ्हेनें उपयोग होऊं नये ह्याची चांगली काळजी घेतात. जगांत अशी समजूत आहे कीं, शेतकरी वर्ग आपल्या शेतांचा नाश स्वतःच्या हातानें कधींच करणार नाहीं. पण सोव्हियट शेतकरी या समजूतीला अपवाद असल्याचें प्रस्तुत युद्धांत दिसून आलें आहे. विहीरींत माती लोटून त्या तो भरून टाकतो. गोठे, तेलाचीं, धान्याचीं कोठारें व घरें या सर्वांचा जाळून निकाल लावतो. हीं कृत्यें त्याच्या हातून बेदरकारपणें कां घडतात याचा शोध केल्यास आपल्या मागें आपलें सरकार असल्याबद्दलची त्याची खात्री असते हें कारण अचूक सांपडेल. सरकारच्या हुकमानें कराव्या लागलेल्या विध्वंसाची भरपाई युद्धोत्तर काळांत सरकारकडून होईल असा त्याला भरवंसा आहे. वरच्यासारखीं कृत्यें उरकलीं म्हणजे कृषिरक्षक मंडळें, बहुधा खब्या सरकारी फौजेच्या मदतीनें लोकांना जंगलांतून पोंहोचवितात आणि मग हे लोक गनिमी काव्यानें शत्रूशीं लढाई करूं लागतात. संपत्तीच्या समाजसत्तावादी व्यवस्थेनें रशियांतील निरनिराळ्या जनतेमधील भेद लयास नेऊन त्या सर्वांची एकजूट अस्तित्वांत आली आहे. मोठाल्या वसाहतींत आप्पलपोटेपणानें वागविणाऱ्या अवाढव्य साम्राज्यांतून अशी एकजूट तुलनेलासुद्धां सांपडावयाची नाहीं. सोव्हियटमधील भिन्न भिन्न समाजांची एकजूट सक्तीच्या उपायांमुळें उत्पन्न झालेली नाहीं. सोव्हियट राज्यव्यवस्थेंत 'राष्ट्रीय' हा प्रश्न आपखुषीच्या एकजुटीनें सोडविला आहे. या एकजुटीचा रशियाला आज अतोनात फायदा झालेला आहे. झारशाहींत राष्ट्रीयत्वाच्या झगड्यांत एकंदर देशाचें नुकसान सुरू होतें. झारशाहींतला रशिया हें स्लाव जातीचें राष्ट्र होतें; स्लावखेरीज इतर जाती म्हणजे कःपदार्थ अशा समजुतीनें तेव्हांचा व्यवहार चालला होता. यामुळें मध्यआशियांतील लोकांना रशियन लष्करांत दाखल होण्याची संधी मुळींच नव्हती. आतां हा परकेपणाचा प्रपंच उरलेला नाहीं. सध्यां लष्करांत भरती होण्याची सर्वांना मोकळीक आहे व सगळ्यांचा व्यवहार अगदीं बरोबरीच्या नात्याचा आहे. लाल फौजेंत स्लाव नसलेल्या लोकांचा भरणा एकतृतीयांशाइतका आज आहे.

ज्या स्त्री-पुरुषांनीं देशांतील बेफाम अंदाधुंदी मोडून व्यवस्था अमलांत आणली, कमालीच्या दारिद्र्यांतून द्रव्याचा मार्ग शोधून काढला, जेथें निरक्षरतेचें राज्य होतें तेथें संस्कृतीची स्थापना केली, त्याच स्त्री-पुरुषांची पिढी आजच्या लढाईंत देशासाठीं आपल्या प्राणांची आहुति देत आहे. आपण निर्माण केलेल्या अभिनव

सृष्टीचें रक्षण हें त्यांच्या कडव्या देशभक्तीचें बीज आहे. पंचवीस वर्षांमागें रशियन शिपाई ज्या धीरानें व काटकपणानें लढला त्याच धीरानें व काटकपणानें तो आजही लढत आहे. पण आज त्याच्याजवळ उत्तम शस्त्रास्त्रांची विपुलता आहे. आज त्यांच्यामध्यें लढवय्येपणाचें कौशल्य जास्त दिसून येत आहे. अडचण उपस्थित झाल्यास तो अंमलदाराच्या तोंडाकडे पहात बसण्याऐवजीं स्वतःच्या जबाबदारीवर युक्ति लढवून अडचण ओलांडून जाण्याला समर्थ बनलेला आहे. परंतु सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आजच्या रशियन शिपायाला आपण कशासाठीं लढत आहों याचें बिनचूक व जिव्हाळ्याचें ज्ञान आहे ही होय. त्याच्या देशभक्तीची खूण झेप्रप्रोस्त्रॉयचें प्रचंड धरण फोडून टाकण्याच्या बेपर्वाईत दिसेल. हें धरण शत्रूच्या हातीं पडून त्याचा शत्रूला उपयोग होण्यापेक्षां त्याचा निःपात झालेला बेहत्तर, ही भावना या बेपर्वाईत भरलेली आहे. दुसरी खूण लेनिनग्राड व स्टालिनग्राड या शहरासाठीं छातीचा कोट उभारून केलेल्या बचावाच्या लढायांत दिसेल. भूतलावर मानव-समाज असे तोंवर या साहसाचे पोवाडे अखंड गाइले जातील.

# १५

## कुल्टूर*

रशियन व जर्मन भाषेंत संस्कृति ह्या शब्दाला 'कुलट्टर' ( Kultur ) असा शब्द आहे.

सोव्हियट यूनियन हें सर्वस्वीं नवें जग आहे व तेथील जनतेचे पुढारी संस्कृतीकडे अगदीं नव्या दृष्टीनें पाहतात. कला, भौतिक शास्त्रें, शिक्षण, बौद्धिक व शारीरिक उन्नति, ह्या सर्वांचा सोव्हियट मतानुसार संस्कृतीमध्यें अंतर्भाव होतो. ते आपल्या सार्वजनिक बागांना देखील संस्कृतीचीं व विश्रांतीचीं स्थानें समजतात.

याच्या उलट 'संस्कृति' हा शब्द कानांवर पडतांच मला माझें पिस्तुल रोखावेंसें वाटतें, असे एका नाझी अधिकाऱ्याचे उद्गार प्रसिद्धच आहेत. सोव्हियट संस्कृतींत व्यक्तीचें स्वातंत्र्य हिरावून घेतलेलें नाहीं. यंत्रानें बनविलेल्या जिनसांचें स्वरूप जसें एकाच ठशाचें असतें, तसा प्रकार सोव्हियट संस्कृतीचा नाहीं. कारण, लेनिननें सोव्हियट संस्कृतीची कल्पना पुढीलप्रमाणें स्पष्ट केलेली आहे :— 'कामगार संस्कृति ही शून्यांतून निघालेली कल्पना नाहीं, किंवा अशा संस्कृतीचे तज्ज्ञ म्हणून टेंभा मिरविणाऱ्या लोकांची ही करामत नाहीं; जुन्या समाजव्यवस्थे-मुळें झालेल्या ज्ञानाचा स्वाभाविक व तर्कशुद्ध असा हा विकास आहे. मात्र ह्या विकासाला योग्य वळण लावण्याची जबाबदारी आपल्यावर आहे.'

सामुदायिक शेतकी, व सहकारी तत्त्वावर चालणारी प्रचंड कारखानदारी, यांच्यामुळें सोव्हियट नागरिकाला आपला विकास करून घेण्यास भरपूर संधी मिळाली आहे. प्रत्येकाला संस्कृतीकडे लक्ष देतां यावें अशा रीतीनें कामाची,

---

* पुढील मजकूर ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसनें चालविलेल्या "आजचें राजकारण" मालेंतील प्रस्तुत लेखकाच्या 'सोव्हियट संस्कृति' या पुस्तकांतून त्या प्रेसच्या परवानगीनें घेतला आहे.

सुट्टीची व पगाराची व्यवस्था तेथें आहे. सोव्हियट समाजांत माणसांवर यंत्राचा अंमल चालत नसून माणसेंच यंत्रांकडून पाहिजे तें काम करवून घेतात. खऱ्या संस्कृतीला यंत्रें पोषक आहेत, असा सोव्हियट समाजपद्धतीचा एक ठाम सिद्धांत आहे. प्रख्यात रशियन ग्रंथकार चेकॉफ म्हणतो :–' अस्फाल्ट आणि वीज यांच्यांत सहकारिता उत्पन्न करण्याचें जितकें सामर्थ्य आहे तितकें टॉलस्टॉयच्याही उपदेशांत नाहीं.'

सोव्हियट अमदानींत धर्माचें उच्चाटन झालें अशी पुष्कळांची समजूत आहे. पण धर्माच्या वर्चस्वाचें उच्चाटन म्हणजे कांहीं धर्माचें उच्चाटन नव्हे. व्यक्तिशः कुठल्याही धर्माचा आश्रय रशियन नागरिकांना करतां येतो; धर्म हा सर्वस्वीं व्यक्तीच्या खासगी व्यवहाराचा भाग आहे असें सोव्हियट संस्कृति मानते.

लोकांच्या इतर हितकार्याप्रमाणेंच त्यांच्या आरोग्याकडे सोव्हियट सरकार लक्ष देत आहे. तेथें प्रत्येक मूल, स्त्री व पुरुष ह्यांना सरकारी खर्चानें औषधोपचार मिळतो. प्रत्येक कामाच्या जागेला लागून दवाखाना असतो. तसेंच सर्व इस्पितळांत उपचारासाठीं सोव्हियट नागरिकांना मोफत राहतां येतें; सर्व इस्पितळें व औषधाचीं दुकानें सरकारी आहेत. डॉक्टरीचा अभ्यास सोव्हियट सरकारी खर्चानें होतो. म्हणून डॉक्टर व शुश्रूषा करणाऱ्या बाया यांची सोय प्रत्येकाला कांहीं खर्च न पडतां मिळते. प्लेग, कालज्वर, किंवा मलेरिया यांसारख्या रोगांचा रशियांत आज बींमोड झालेला आढळतो.

निरनिराळ्या धंद्यांतील विशिष्ट रोग कसे टाळावे ह्याचा अभ्यास करण्यासाठीं संशोधक काम करीत आहेत. खुद्द मॉस्को शहरांत रोगांच्या ३० संशोधनसंस्था आहेत. ह्या सर्व व्यवस्थेमुळें सोव्हियट रशियांत मृत्यूचें प्रमाण हजारीं १७ झालें आहे. १९१७ सालीं तें ३२ होतें.

सोव्हियट नागरिकांसाठीं ६०० हवा खाण्याचीं ठिकाणें असून तीं थेट उत्तर-ध्रुवापर्यंत पसरलेलीं आहेत.

अफीमबाज, कोकेनचे कैफी, व दारूच्या संवयीचे लोक अशा सर्वांना नवें जीवन दाखविण्यासाठीं बरेच नवे उपाय होत आहेत. दारूबाजीवर समाजांतील घाणेरड्या रोगांइतकाच रशियन सरकारचा कटाक्ष आहे.

१९१८ पासून व्यायाम आणि मैदानी–मर्दानी खेळ यांकडे लक्ष देण्याला सोव्हियट सरकारनें सुरुवात केली. व्यायामशाळा व आखाडे यांचा सर्व खर्च सोव्हियट सरकार व कामगार संघ हे चालवितात. त्यांच्या सभासदांना फी द्यावी लागत नाहीं. असे सभासद १ कोटीहून जास्त आहेत. व्यायामशाळांची एक मध्यवर्ती संस्था आहे. वस्ताद तयार करण्यासाठीं सहा मोठीं कॉलेजें आहेत. त्यांत ३००० विद्यार्थि अभ्यास करीत असतात. धंदेवाईक खेळाडू मात्र तेथें नाहींत.

सगळीं माणसें वंशतः एकाच योग्यतेचीं असें सोव्हियट शिक्षणांतील एक तत्त्व आहे. शेती व कारखानदारी यांची मालकी सरकारची, असें दुसरें तत्त्व आहे. एकानें दुसऱ्याच्या नफ्याकरितां राबावें, या कल्पनेला सोव्हियट शिक्षणांत कुठेंहि थारा नाहीं.

खासगी मालमत्तेला रशियांत अवकाश नसल्यानें तेथें शोधाबाबत लपवाछपवी करण्याचें कारण उरत नाहीं. अर्थात् संशोधकाला जें कळेल तें सर्वांना समजतें. प्रयोगशाळेंत तयार केलेला जिन्नस बाजारांत सर्वांसमोर येण्याला उशीर लागत नाहीं. ज्ञानाच्या उघड्या व्यवहारामुळें अनेकांच्या बौद्धिक श्रमांचीं फळें एकवटून विविध प्रकारच्या व्यवहारांत पुष्कळ फायदा होईल असा रशियाचा आशावाद आहे. मॉस्को युनिव्हर्सिटीच्या देवडीवर ‘ श्रमजीवी लोकांसाठीं भौतिक शास्त्रें आहेत ’ असें सुभाषित कोरलेलें आहे.

सोव्हियट राजवटींत लेखकांना फार श्रेष्ठ स्थान दिलेलें आहे. गॉर्की जेव्हां इटलींतून रशियांत परत आला, तेव्हां त्याच्या सन्मानार्थ लोकांनीं कमानी व गुढ्या-तोरणें ठिकठिकाणीं उभारलीं होतीं. त्याच्या ४० व्या वाढदिवशीं एका शहराला त्याचें नांव दिलें. त्याच्या नांवाचें एक विद्यालय स्थापन झालें. विमानांचा एक काफिला त्याच्या नांवानें ओळखला जाऊं लागला. रस्ते, शाळा, कारखाने यांना त्याचें नांव लोकांनीं अभिमानानें लावलें. गॉर्कीच्या प्रेतयात्रेला हजारों माणसें जमलीं आणि त्याच्या शवाला स्टालिननें व इतर मोठाल्या सोव्हियट अधिकाऱ्यांनीं खांदा दिला.

वाङ्मयाचा आपल्या जीवनाशीं कितपत संबंध आहे, इकडे रशियन जनतेचें बारीक लक्ष असतें. नवा ग्रंथ प्रसिद्ध होतांच वाङ्मयाचे भोक्ते त्याच्या गुणावगुणांची

छाननी करतात. पण रशियांत आणखी एक प्रकार रूढ आहे. कामगारांच्या वस्तींत साहित्यभक्त जाऊन त्यांच्यामध्यें नव्या पुस्तकांचा पुकारा करितात. ‘जीवनाचें ज्याला अनुभवसिद्ध ज्ञान नाहीं, तो वाङ्मय काय लिहिणार ?’ असा सोव्हियट बहुजनसमाजाचा सवाल असून याच कसोटीवर तेथें वाङ्मयाची पारख होते.

क्षोभाच्या व कलहाच्या परिस्थितींतून वाङ्मय अवतरतें. रशियाच्या वाङ्मयांत तेथील नव्या प्रतिभेनें नव्या कल्पनांचा आश्रय केला आहे. पोलाद, पितळ, कॉंक्रिट, इत्यादि वस्तूंनीं रशियन कल्पकतेवर पगडा बसविला आहे. गूढवाद आणि विभूतिपूजा यांचें तेथें वर्चस्व नसल्यानें साक्षात्कारी संत व विचारग्रस्त हॅम्लेट यांच्यासारखीं पात्रें त्या वाङ्मयांत नाहींत. सोव्हियट साहित्यांतील पात्रें हीं व्यवहारी मनोनिग्रहाचीं कर्तृवगार माणसें असतात. नव्या जीवनाची सुरुवात व्हावी म्हणून झगडत राहणें हें त्यांचें कार्य असतें. आकाशाकडे डोळे लावून बसलेल्या किंवा कपाळावर हात मारून घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या ऐवजीं सामुदायिक शेतकींतील यशस्वी शेतकरी आजच्या रशियन वाङ्मयांत झळकतो. मोडकळीला आलेलीं यंत्रें टाकून देऊन कारखानें सजीव करणाऱ्या व्यक्ति, जेथें गवताची एक काडी उगवत होती तेथें दोन उगवून दाखविणाऱ्या व्यक्ति, उत्तरध्रुवाचा प्रदेश काबीज करणाऱ्या व्यक्ति—याच रशिअन वाङ्मयांत नायक असतात.

सोव्हियट रशियांत निरनिराळया १०६ लिहिण्याच्या भाषा चालू आहेत. या सर्वांच्या आवडीनिवडी साधण्यासाठीं गेल्या २५ वर्षांत मिळून शंभर कोट पुस्तकें या भाषांतून छापलीं. त्यांत टॉलस्टॉयच्या ग्रंथांच्या १२० लाख प्रती असून गॉर्कींच्या ग्रंथांच्या ३२० लाख आहेत. पुष्किनच्या शतसांवत्सरिक जन्मप्रसंगीं त्याच्या कविता व गोष्टींच्या पुस्तकांचा खप ८१ लक्ष ५० हजार प्रतींवर गेला. लघुकथेपासून तों ज्ञानकोशापर्यंत निरनिराळ्या विषयांचीं सुमारें ४५००० नवीं पुस्तकें दरसाल प्रसिद्ध होतात. इतकीं पुस्तकें जगांत दुसऱ्या कोणत्याही देशांत प्रसिद्ध होत नाहींत. सोव्हियट नियतकालकांपैकीं कितीतरी वाङ्मयास वाहिलेलीं आहेत. दरसाल साधारणपणें २॥ कोटी पुस्तकें छापलीं जातात. परराष्ट्रांचें अंतरंग रशियन समाजाला समजावें म्हणून सिंक्लेअर, ड्रायसर, हक्स्ले, मान यांच्यासारख्यांच्या ग्रंथांचीं भाषांतरें पुष्कळच होतात.

धंदेशिक्षणाला व भौतिक शास्त्रांच्या अभ्यासाला उपयोगी पडण्याजोगीं सहा हजार ग्रंथालयें असून अगदीं खास मुलांकरितां तीन हजार वाचनालयें आहेत. फिरतीं वाचनालयें २० हजार असून दूरदूरच्या प्रदेशांत आगगाडीच्या डब्यांतून किंवा उंटाच्या पाठीवरून डोंगरपठारांवरील धनगराला, कापणी करणाऱ्या शेतकऱ्याला, किंवा डोंगरदऱ्यांतील भटक्या जातीलाही पुस्तकें पुरविण्याची आजच्या रशियांत व्यवस्था आहे.

सोव्हियट राज्याचे लोक जेथें जेथें असतील तेथें तेथें छापखाने असतातच. मग ते लोक कामावर असोत, खेळण्यासाठीं जमलेले असोत, कवाईत करीत असोत, किंवा प्रत्यक्ष लढाईत गुंतलेले असोत. नदीला धरण बांधण्याचें किंवा कारखाना उभारण्याचें काम सुरू होण्यापूर्वीच छापण्याचीं यंत्रें त्या जागीं पोंचून वर्तमानपत्र सुरू केलें जातें. इंजिनियरांइतकीच संपादकांची महती सोव्हियट राजवटींत समजतात. भिंतीवरील वृत्तपत्रें हीं नांवाप्रमाणेंच भिंतीवर डकवलेलीं असतात. बातम्यांचे व चित्रांचे मोठाले कागद भिंतींवर अथवा कारखान्यांच्या मुख्य दरवाजांवर लावतात. लोक जातात येतात, अशा सर्व जागीं हीं वृत्तपत्रें दिसलींच पाहिजेत. हीं हातांनीं लिहिलेलीं असतात. या वृत्तपत्रांसाठीं संपादकांची निवड लोकच करतात. या वृत्तपत्रांचे नियमित बातमीदार व चित्रकारही असतात. सूचना, तक्रारी, स्तुतिपाठ, गरजा या बाबतींत प्रत्येकानें आपल्या मगदुराप्रमाणें मदत करावी अशी मुभा आहे. हा प्रकार रशियांत कमालीचा लोकप्रिय आहे.

कलेचा प्रसार व संस्कृतीचा विकास हीं दोन्ही कार्यें सिद्धीस जाण्यासाठीं सोव्हियट राजवटींत रेडिओ हें साधन अग्रगण्य समजतात, तें योग्यच आहे. रशियन मुलखांत अनेक समाज एकमेकांपासून दूर अंतरांवर रहातात. अशा परिस्थितींत रेडिओ ही केवढी मोठी सोय आहे याचें प्रत्यंतर सहज होतें. 'रेडिओचे मित्र' या नांवाची एक संस्था तेथें असून तिचे लाखों सभासद आहेत.

रेडिओकडे काम करणारीं माणसें रस्त्यांतून लोकांमध्यें मिसळतात, त्यांच्याबरोबर हिंडतात, ध्वनिक्षेपकानजीक असलेल्या जमावांत शिरतात व अशा रीतीनें लोकमत काय आहे याची बित्तंबातमी मिळवितात. लघुलहरींचीं स्थानिक केंद्रें पुष्कळच असल्यानें लाखों माणसें एकमेकांशीं बोलतात; अशीं केंद्रें मोठ्या शेतकी-

सुट्टीची व पगाराची व्यवस्था तेथें आहे. सोव्हियट समाजांत माणसांवर यंत्राचा अंमल चालत नसून माणसेंच यंत्रांकडून पाहिजे तें काम करवून घेतात. खऱ्या संस्कृतीला यंत्रें पोषक आहेत, असा सोव्हियट समाजपद्धतीचा एक ठाम सिद्धांत आहे. प्रख्यात रशियन ग्रंथकार चेकॉफ म्हणतो :–'अस्फाल्ट आणि वीज यांच्यांत सहकारिता उत्पन्न करण्याचें जितकें सामर्थ्य आहे तितकें टॉलस्टॉयच्याही उपदेशांत नाहीं.'

सोव्हियट अमदानींत धर्माचें उच्चाटन झालें अशी पुष्कळांची समजूत आहे. पण धर्माच्या वर्चस्वाचें उच्चाटन म्हणजे कांहीं धर्माचें उच्चाटन नव्हे. व्यक्तिशः कुठल्याही धर्माचा आश्रय रशियन नागरिकांना करतां येतो; धर्म हा सर्वस्वीं व्यक्तीच्या खासगी व्यवहाराचा भाग आहे असें सोव्हियट संस्कृति मानते.

लोकांच्या इतर हितकार्याप्रमाणेंच त्यांच्या आरोग्याकडे सोव्हियट सरकार लक्ष देत आहे. तेथें प्रत्येक मूल, स्त्री व पुरुष ह्यांना सरकारी खर्चानें औषधोपचार मिळतो. प्रत्येक कामाच्या जागेला लागून दवाखाना असतो. तसेंच सर्व इस्पितळांत उपचारासाठीं सोव्हियट नागरिकांना मोफत राहतां येतें; सर्व इस्पितळें व औषधाचीं दुकानें सरकारी आहेत. डॉक्टरीचा अभ्यास सोव्हियट सरकारी खर्चानें होतो. म्हणून डॉक्टर व शुश्रूषा करणाऱ्या दाया यांची सोय प्रत्येकाला कांहीं खर्च न पडतां मिळते. प्लेग, कालज्वर, किंवा मलेरिया यांसारख्या रोगांचा रशियांत आज बीमोड झालेला आढळतो.

निरनिराळ्या धंद्यांतील विशिष्ट रोग कसे टाळावे ह्याचा अभ्यास करण्यासाठीं संशोधक काम करीत आहेत. खुद्द मॉस्को शहरांत रोगांच्या ३० संशोधनसंस्था आहेत. ह्या सर्व व्यवस्थेमुळें सोव्हियट रशियांत मृत्यूचें प्रमाण हजारीं १७ झालें आहे. १९१७ सालीं तें ३२ होतें.

सोव्हियट नागरिकांसाठीं ६०० हवा खाण्याचीं ठिकाणें असून तीं थेट उत्तर-ध्रुवापर्यंत पसरलेलीं आहेत.

अफीमबाज, कोकेनचे कैफी, व दारुच्या संवयीचे लोक अशा सर्वांना नवें जीवन दाखविण्यासाठीं बरेच नवे उपाय होत आहेत. दारूबाजीवर समाजांतील घाणेरड्या रोगांइतकाच रशियन सरकारचा कटाक्ष आहे.

१९१८ पासून व्यायाम आणि मैदानी–मर्दानी खेळ यांकडे लक्ष देण्याला सोव्हियट सरकारनें सुरुवात केली. व्यायामशाळा व आखाडे यांचा सर्व खर्च सोव्हियट सरकार व कामगार संघ हे चालवितात. त्यांच्या सभासदांना फी द्यावी लागत नाहीं. असे सभासद १ कोटीहून जास्त आहेत. व्यायामशाळांची एक मध्यवर्ती संस्था आहे. वस्ताद तयार करण्यासाठीं सहा मोठीं कॉलेजें आहेत. त्यांत ३००० विद्यार्थि अभ्यास करीत असतात. 'धंदेवाईक' खेळाडू मात्र तेथें नाहींत.

सगळीं माणसें वंशतः एकाच योग्यतेचीं असें सोव्हियट शिक्षणांतील एक तत्त्व आहे. शेती व कारखानदारी यांची मालकी सरकारची, असें दुसरें तत्त्व आहे. एकानें दुसऱ्याच्या नफ्याकरितां राबावें, या कल्पनेला सोव्हियट शिक्षणांत कुठेंहि थारा नाहीं.

खासगी मालमत्तेला रशियांत अवकाश नसल्यानें तेथें शोधाबाबत लपवाछपवी करण्याचें कारण उरत नाहीं. अर्थात् संशोधकाला जें कळेल तें सर्वांना समजतें. प्रयोगशाळेंत तयार केलेला जिन्नस बाजारांत सर्वांसमोर येण्याला उशीर लागत नाहीं. ज्ञानाच्या उघड्या व्यवहारामुळें अनेकांच्या बौद्धिक श्रमांचीं फळें एकवटून विविध प्रकारच्या व्यवहारांत पुष्कळ फायदा होईल असा रशियाचा आशावाद आहे. मॉस्को युनिव्हर्सिटीच्या देवडीवर 'श्रमजीवी लोकांसाठीं भौतिक शास्त्रें आहेत' असें सुभाषित कोरलेलें आहे.

सोव्हियट राजवटींत लेखकांना फार श्रेष्ठ स्थान दिलेलें आहे. गॉर्की जेव्हां इटलींतून रशियांत परत आला, तेव्हां त्याच्या सन्मानार्थ लोकांनीं कमानी व गुढ्या-तोरणें ठिकठिकाणीं उभारलीं होतीं. त्याच्या ४० व्या वाढदिवशीं एका शहराला त्याचें नांव दिलें. त्याच्या नांवाचें एक विद्यालय स्थापन झालें. विमानांचा एक काफिला त्याच्या नांवानें ओळखला जाऊं लागला. रस्ते, शाळा, कारखाने यांना त्याचें नांव लोकांनीं अभिमानानें लावलें. गॉर्कीच्या प्रेतयात्रेला हजारों माणसें जमलीं आणि त्याच्या शवाला स्टालिननें व इतर मोठाल्या सोव्हियट अधिकाऱ्यांनीं खांदा दिला.

वाङ्मयाचा आपल्या जीवनाशीं कितपत संबंध आहे, इकडे रशियन जनतेचें बारीक लक्ष असतें. नवा ग्रंथ प्रसिद्ध होतांच वाङ्मयाचे भोक्ते त्याच्या गुणावगुणांची

छाननी करतात. पण रशियांत आणखी एक प्रकार रूढ आहे. कामगारांच्या वस्तींत साहित्यभक्त जाऊन त्यांच्यामध्यें नव्या पुस्तकांचा पुकारा करितात. 'जीवनाचें ज्याला अनुभवसिद्ध ज्ञान नाहीं, तो वाङ्मय काय लिहिणार ?' असा सोव्हियट बहुजनसमाजाचा सवाल असून याच कसोटीवर तेथें वाङ्मयाची पारख होते.

क्षोभाच्या व कलहाच्या परिस्थितींतून वाङ्मय अवतरतें. रशियाच्या वाङ्मयांत तेथील नव्या प्रतिभेनें नव्या कल्पनांचा आश्रय केला आहे. पोलाद, पितळ, कॉंक्रिट, इत्यादि वस्तूंनीं रशियन कल्पकतेवर पगडा बसविला आहे. गूढवाद आणि विभूतिपूजा यांचें तेथें वर्चस्व नसल्यानें साक्षात्कारी संत व विचारग्रस्त हॅम्लेट यांच्यासारखीं पात्रें त्या वाङ्मयांत नाहींत. सोव्हियट साहित्यांतील पात्रें हीं व्यवहारी मनोनिग्रहाचीं कर्तृवगार माणसें असतात. नव्या जीवनाची सुरुवात व्हावी म्हणून झगडत राहणें हें त्यांचें कार्य असतें. आकाशाकडे डोळे लावून बसलेल्या किंवा कपाळावर हात मारून घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या ऐवजीं सामुदायिक शेतकींतील यशस्वी शेतकरी आजच्या रशियन वाङ्मयांत झळकतो. मोडकळीला आलेलीं यंत्रें टाकून देऊन कारखाने सजीव करणाऱ्या व्यक्ति, जेथें गवताची एक काडी उगवत होती तेथें दोन उगवून दाखविणाऱ्या व्यक्ति, उत्तरध्रुवाचा प्रदेश काबीज करणाऱ्या व्यक्ति—याच रशियन वाङ्मयांत नायक असतात.

सोव्हियट रशियांत निरनिराळ्या १०६ लिहिण्याच्या भाषा चालू आहेत. या सर्वांच्या आवडीनिवडी साधण्यासाठीं गेल्या २५ वर्षांत मिळून शंभर कोट पुस्तकें या भाषांतून छापलीं. त्यांत टॉलस्टॉयच्या ग्रंथांच्या १२० लाख प्रती असून गॉर्कीच्या ग्रंथांच्या ३२० लाख आहेत. पुष्किनच्या शतसांवत्सरिक जन्मप्रसंगीं त्याच्या कविता व गोष्टींच्या पुस्तकांचा खप ८१ लक्ष ५० हजार प्रतींवर गेला. लघुकथेपासून तों ज्ञानकोशापर्यंत निरनिराळ्या विषयांचीं सुमारें ४५००० नवीं पुस्तकें दरसाल प्रसिद्ध होतात. इतकीं पुस्तकें जगांत दुसऱ्या कोणत्याही देशांत प्रसिद्ध होत नाहींत. सोव्हियट नियतकालिकांपैकीं कितीतरी वाङ्मयास वाहिलेलीं आहेत. दरसाल साधारणपणें २॥ कोटी पुस्तकें छापलीं जातात. परराष्ट्रांचें अंतरंग रशियन समाजाला समजावें म्हणून सिंक्लेअर, ड्रायसर, हक्स्ले, मान यांच्यासारख्यांच्या ग्रंथांचीं भाषांतरें पुष्कळच होतात.

धदेशिक्षणाला व भौतिक शास्त्रांच्या अभ्यासाला उपयोगी पडण्याजोगीं सहा हजार ग्रंथालयें असून अगदीं खास मुलांकरितां तीन हजार वाचनालयें आहेत. फिरतीं वाचनालयें २० हजार असून दूरदूरच्या प्रदेशांत आगगाडीच्या डब्यांतून किंवा उंटाच्या पाठीवरून डोंगरपठारांवरील धनगराला, कापणी करणाऱ्या शेतकऱ्याला, किंवा डोंगरदऱ्यांतील भटक्या जातीलाही पुस्तकें पुरविण्याची आजच्या रशियांत व्यवस्था आहे.

सोव्हियट राज्याचे लोक जेथें जेथें असतील तेथें तेथें छापखाने असतातच. मग ते लोक कामावर असोत, खेळण्यासाठीं जमलेले असोत, कवाईत करीत असोत, किंवा प्रत्यक्ष लढाईत गुंतलेले असोत. नदीला धरण बांधण्याचें किंवा कारखाना उभारण्याचें काम सुरू होण्यापूर्वीच छापण्याचीं यंत्रें त्या जागीं पोंचून वर्तमानपत्र सुरू केलें जातें. इंजिनियरांइतकीच संपादकांची महती सोव्हियट राजवटींत समजतात. भिंतीवरील वृत्तपत्रें हीं नांवाप्रमाणेंच भिंतीवर डकवलेलीं असतात. बातम्यांचे व चित्रांचे मोठाले कागद भिंतींवर अथवा कारखान्यांच्या मुख्य दरवाजांवर लावतात. लोक जातात येतात, अशा सर्व जागीं हीं वृत्तपत्रें दिसलींच पाहिजेत. हीं हातांनीं लिहिलेलीं असतात. या वृत्तपत्रांसाठीं संपादकांची निवड लोकच करतात. या वृत्तपत्रांचे नियमित बातमीदार व चित्रकारही असतात. सूचना, तक्रारी, स्तुतिपाठ, गरजा या बाबतींत प्रत्येकानें आपल्या मगदुराप्रमाणें मदत करावी अशी मुभा आहे. हा प्रकार रशियांत कमालीचा लोकप्रिय आहे.

कलेचा प्रसार व संस्कृतीचा विकास हीं दोन्ही कार्यें सिद्धीस जाण्यासाठीं सोव्हियट राजवटींत रेडिओ हें साधन अग्रगण्य समजतात, तें योग्यच आहे. रशियन मुलखांत अनेक समाज एकमेकांपासून दूर अंतरांवर रहातात. अशा परिस्थितींत रेडिओ ही केवढी मोठी सोय आहे याचें प्रत्यंतर सहज होतें. ‘रेडिओचे मित्र’ या नांवाची एक संस्था तेथें असून तिचे लाखों सभासद आहेत.

रेडिओकडे काम करणारीं माणसें रस्त्यांतून लोकांमध्यें मिसळतात, त्यांच्याबरोबर हिंडतात, ध्वनिक्षेपकानजीक असलेल्या जमावांत शिरतात व अशा रीतीनें लोकमत काय आहे याची बित्तंबातमी मिळवितात. लघुलहरींचीं स्थानिक केंद्रें पुष्कळच असल्यानें लाखों माणसें एकमेकांशीं बोलतात; अशीं केंद्रें मोठ्या शेतकी-

वर व कारखान्यांत तर आहेतच पण धातूंच्या खाणींतून देखील आहेत. उक्वेग पर्वताच्या शिखरापासून बेरिंग सामुद्रधुनीपर्यंत गेलेली जी कठड्यासारखी दिसणारी माळरानांची रांग आहे, तिच्यांतसुद्धां हीं केंद्रें आहेत. लोकसमूहांतील भेद नाहींसे करून एकच जनता या नात्यानें त्यांच्या जीवनाची व कार्यांची संघटना उत्पन्न करण्यांत रेडिओनें थोड्या अवकाशांत रशियामध्यें अतिशय मोठी कामगिरी बजावलेली आहे.

नाटकें पाहण्याची रशियन लोकांत जेवढी उत्कट अभिरुचि आहे, तेवढी अन्यत्र सांपडणें कठिण आहे. तशी सोयहि रशियांत भरपूर आहे. रशिया नाटकांसाठीं प्रसिद्ध असून तेथील ऑपेरा, बॅलेट यांचीहि विशेष ख्याति आहे.

पूर्वी रशियांत अवघीं १३५ नाट्यगृहें होतीं. आतां ८२५ आहेत. सोव्हियट प्रदेशांत नाट्याचा किती विस्तार झाला आहे याची खूण सदर आंकड्यांत सांपडेल. हौशी नटसंघांकरितां ५००० नाट्यगृहें असून ६० भिन्न भाषांतून नाटकें होतात. नाट्य शिकविण्याकरितां रशियांत संस्था आहेत. नाटयशिक्षणाबरोबर संशोधनहि या संस्थातर्फे होत असतें. खेड्यांतील नाट्यमंदिराच्या दर्शनी पडद्यावर बहुधा पुढील अर्थाचें सुभाषित दृष्टीस पडतें :— ' श्रमावांचून जगणें ही चोरी असून कलाहीन श्रम म्हणजे शुद्ध रानटीपणा समजावा. '

जगामध्यें इतरत्र असे बरेच सुशिक्षित लोक आहेत कीं ज्यांचें लक्ष सोव्हियट संस्कृतीकडे सोव्हियट चित्रपटांमुळें गेलेलें आहे. सोव्हियट चित्रपटाचा एक मोठा विशेष असा कीं त्यांतील वर्ण्यविषय आपल्या संस्कृतीशीं पूर्णपणें एकजीव असलेला दिसतो. चित्रपटांच्या द्वारें आपली संस्कृति प्रेक्षकांच्या नजरेसमोर एकसारखी ठेवली जाते. इतकेंच नाहीं, तर कलेच्याहि दृष्टीनें चित्र पटांच्या जगांत सोव्हियट चित्रपटानें सर्वत्र क्रांति केलेली आहे. कारण चित्रपटाला इतर सर्व कलांपेक्षां सोव्हियट संस्कृति समजावून देण्याच्या दृष्टीनें फार उच्च स्थान आहे असें लेनिन नेहमीं बजावीत असे. आज सोव्हियट यूनियनमध्यें १०,००० वर सिनेमागृहें आहेत. तसेंच शाळांतून व गांवागांवांतून चित्रपट दाखविण्यासाठीं २६,००० प्रोजेक्टर्स आहेत. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेप्रमाणें सन १९४२ अखेरीस ह्यांच्यांत सहापट वाढ करण्याचें ठरलेलें होतें.

सोव्हियट राज्यसंघाबद्दल अभिप्राय बनवितांना रशियांतील संस्कृतिविषयक कामगिरी लक्षांत घेतली नाहीं, तर तो अभिप्राय सपशेल चुकीचा ठरेल. ही कामगिरी इतकी प्रचंड व महत्त्वाची आहे कीं तिजमुळें सोव्हियटबद्दल विचार करणारांची दृष्टि निवळते, हें लक्षांत ठेवणें अवश्य आहे.

# १६

## दस्विदानिया !

१९३७ सालच्या मार्च महिन्यांत मी सोव्हियट रशियाची सीमा ओलांडली. रशियांतील माझ्या अडीच वर्षांच्या वास्तव्यांत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेनें झटपट होणारे फरक माझ्या डोळ्यांनीं मी पाहिले आहेत. व ह्या योजनेच्या कक्षेंतच स्वतः सोव्हियट सिनेमाच्या स्टूडिओमध्यें मी काम केलें आहे. कामानिमित्त मला मॉस्कोहून पुष्कळदां थोड्याफार मुदतीनें बाहेर जावें लागत असे; पण परत आलों कीं, त्या शहरामध्यें कितीतरी नवे फेरबदल झाल्याचें दृष्टीस पडे. कोठें नवीं घरें उभारलेलीं दिसत, तर कुठें अरुंद रस्ते मोडून त्या जागीं विस्तीर्ण रस्ते बांधल्याचें पहाण्यास सांपडे. याच रस्त्यांच्या विस्ताराशिवाय आणखी एक असा चमत्कार आढळे कीं, तेथील ट्रामगाड्या नाहींशा होऊन नव्या ट्रॉली-बस वहातुकीचें काम करीत आहेत. जागजागीं नव्या शाळा व नवीं प्रदर्शनगृहें निर्माण करण्याचा परिपाठ तर सृष्टिक्रमाच्या नियमाप्रमाणें अबाधित चाललेला असे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सोव्हियट जनतेला परिवर्तनाची इतकी संवय झाली होती कीं, जगही आपल्याचप्रमाणें पुढें जात आहे असें तिला वाटे.

मॉस्कोमधील संस्कृतीच्या कुठल्याही संस्थेस केव्हांही भेट देण्याचा मला मज्जाव नसे. निरनिराळीं वाङ्मयाचीं व वर्तमानपत्रांचीं प्रकाशनगृहें तर आपलीशींच मला वाटत. मी घेतलेले फोटो माझ्या नांवानें इझवेस्तिया, प्रावदा व इतर सोव्हियट वर्तमान-पत्रांतून बऱ्याच वेळां प्रसिद्ध होत असत. तसेंच मी हिंदी विषयांवर लेख लिहावे म्हणून मला आग्रह करण्यांत येई. हिंदी मुलें कशीं रहातात ह्या विषयावर लहान मुलांसाठीं मी एक पुस्तक लिहावें म्हणून मला मार्शाक नांवाच्या प्रसिद्ध सोव्हियट लेखकानें विनंती केली होती. ह्या विनंतीचें कारण म्हणजे मी एकदां सोव्हियट मुलें ग्रहणाच्या दिवशीं त्या घटनेचा अभ्यास कसा करतात हें वर्णन ‘ कस्त्योर ’

नांवाच्या लहान मुलांच्या मासिकांत केवळ फोटोद्वारें केलेलें होतें व तें मार्शाकच्या पहाण्यांस आलें होतें. त्या दिवसापासून माझे फोटो व त्याच्या कविता एकत्र येत. ह्याचा अर्थ म्हणजे समाजसत्तावादी रशियांत काम शोधावें लागत नाहीं, तर तुमच्याकडे तें चालत येतें व असलेल्या कर्तबगारीचें चीज होतें.

सोव्हियट संस्थेबद्दलचा उत्साह पाहून असा मात्र तर्क करूं नये कीं, सोव्हियट राजवटींत माझें जीवन पूर्ण सुखाचें होतें. सोव्हियट जनतेस जसे बरेच हाल सोसावे लागत, तसे ते मलाहि सोसावे लागले. इतकेंहि असून मी खात्रीनें म्हणतों कीं, रशियांतील माझें वास्तव्य अत्यंत समाधानकारक होतें. कारण समाधान हें कांहीं केवळ विलासाच्या वस्तु संपादन करण्यांत नसतें, तर तें एखाद्या ध्येयाच्या निष्ठेनें तत्सिद्ध्यर्थ सदैव काम करण्यांत असतें; हें तत्त्व रशियांत असतांना माझ्या मनांत खोल रुजलें गेलें.

परदेशी लोकांना रशियांत वास्तव्य करणें सुलभ नसून बऱ्याच अडचणी सोसाव्या लागतात. ह्याचें एक उदाहरण म्हणजे जेव्हां १ डिसेंबर १९३४ सालीं स्टालिनचा उजवा हात मानला जाणारा किरॉफ याचा लेनिनग्राड शहरीं खून झाला, तेव्हां प्रत्येक परदेशी माणसावर सोव्हियट पोलिसखात्याचा तीव्रतेनें कटाक्ष वळला. ह्याला दुसरें कारण म्हणजे त्याचवेळीं जर्मनींत हिटलरचा उदय झाला होता. हिटलरच्या नशिबाची चढती कमान दिसतांच आतां लढाईचा काळ जवळ आला, अशी खूणगांठ सोव्हियट राज्यकर्त्यांनीं आपल्या मनाशीं पक्की बांधली, व म्हणूनच कोणत्याहि परदेशीं माणसाबद्दल सोव्हियटला विश्वास वाटेनासा झाला. किरॉफचा खून हा एका व्यक्तीचा खून असें मानण्यास सोव्हियट सरकार तयार नव्हतें व ह्या खुनाचें मूळच उपटून टाकावें या इराद्यानें अतिशय जहरी उपाय त्या सरकारकडून योजले गेले. एकंदर देशांतील वातावरण यामुळें संशयानें दूषित व्हावें हें क्रमप्राप्तच होय. परिणामीं रशियन जनतादेखील परदेशी लोकां-बरोबर विशेष दाट संबंध ठेवण्यास भिऊं लागली; व ह्यामुळें सोव्हियट जनता व परदेशी लोक ह्यांच्यांत एक भिंतच उभी झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. मी हिंदी माणूस असल्यामुळें मला ह्या अडथळ्याचा इतकासा विशेष त्रास झाला नाहीं. ह्याचें कारण म्हणजे सोव्हियट जनता हिंदी लोकांसारख्या परकीय अमला-खालील लोकांशीं वहीमानें वागण्याऐवजीं बहुधा प्रेमानेंच वागते.

हिंवाळ्यांत एके दिवशीं सकाळीं अंगावर भरपूर कपडे न चढवितां मी पुस्तकें

पाहण्यासाठीं निघालों. पुस्तकांच्या दुकानासमोर मला एका सोव्हियट युवतीनें थांबण्यास सांगितलें, व रस्त्यावर पडलेला बर्फ गोळा करून माझें नाक चोळण्यास आरंभ केला. हें काय चाललें आहे ह्याची मला कल्पना होण्यापूर्वीच जवळच्या हॉस्पिटलमध्यें नेण्यांत आलें. पण मला मात्र त्याचें भान नव्हतें; मी जेव्हां शुद्धींत आलों, तेव्हां माझ्या जवळ एक नर्स बसून ती रम-दारूनें माझी छाती चोळीत आहे असें मला दिसून आलें. थोडा वेळ हें स्वप्न असावें असें मला वाटलें; पण ती नर्स मला म्हणाली कीं, जर तुझें नाक वेळींच बर्फानें चोळलें गेलें नसतें तर तें थंडीनें गळून पडलें असतें. मी बरा झाल्यावर मला मोटरींतून घरीं पोहोंचविण्यांत आलें. दुसरे दिवशीं सर्व मॉस्कोभर काल एक बिचारा हिंदी गृहस्थ रशियन थंडीला बळी पडला असें सहानुभूतीनें लोक बोलत असल्याचें मला समजलें. ही एकच गोष्ट माझ्यासारख्या परकी हिंदी गृहस्थाला सोव्हियटबद्दल माझेपणा कां वाटावा हें स्पष्टपणें समजून देण्याला समर्थ आहे.

सोव्हियट जनता ही केवळ गुणांचीच मूर्ति आहे असें मात्र नाहीं. स्टालिनची होणारी फाजील स्तुति मला तरी पसंत नसे. ह्याचा सोव्हियट जनतेच्या स्वभावावर काय परिणाम होईल, हें विचार करण्यासारखें आहे. एखाद्या कर्तबगार माणसाची वाजवी असली तरी फाजील स्तुति होऊं लागली तर त्याच्या ओंजळीनेंच सदैव पाणी पीत रहाण्याची संवय जनतेला जडण्याचा संभव असतो व त्या योगानें परावलंबनाचा दोष बळावतो, असें माझ्या मनांत नेहेमीं येत असे. दुसरी एक नावडण्यासारखी गोष्ट म्हणजे एखाद्या अल्प कामांतसुद्धां लाल फीतीच्या किंवा दप्तरबाजीच्या कारभारामुळें (red-tapism) बराच खोळंबा सोसावा लागतो व कित्येक अधिकारी कामगारांबरोबर बेफिकीरीनें वर्तन करतात. अशा कटु प्रसंगाचा अनुभव मला लेनिनग्राडमधील स्टूडिओंत, एकदां आला. स्टूडिओच्या मुख्याधिकाऱ्यानें माझ्या बाबतींत अन्याय केला व तो मी तसाच सोव्हियट न्यायाधिशापुढें मांडला. हा खटला मी स्वतःच चालविला व सोव्हियट न्यायाधीश बाईनें माझ्या बाजूनें न्यायदान दिलें. न्याय मिळाला, पण अन्यायाची वृत्ति तेथें साफ नष्ट न झाल्याचा हा एक दाखला म्हणूनच हा अनुभव या ठिकाणीं नमूद केला आहे.

सोव्हियट रशियाचें मी केलेलें वर्णन कित्येक लोकांना एकतर्फी व अपुरें वाटण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ, मी स्टालिन व ट्रॉट्स्कीच्या भांडणाचा ऊहापोह

गहू, बाजरी, ओट, राय, गाजरें, आंबाडी वगैरे धनधान्याचें उत्पन्न रशियांत पहिल्या नंबरचें होतें. यांत्रिक नांगर व आगगाड्यांचीं इंजिनें तयार करण्यांत रशियाचा नंबर पहिला ठरतो. विजेच्या उत्पन्नांत ब्रिटनच्यावर रशियाची ताण आहे. अमेरिकेच्या खालोखाल तेलाच्या बाबतींत रशियाची पायरी लागते. १९३८ सालीं बीडाच्या उत्पन्नांत रशिया अमेरिकेच्या बरोबरीस आला. कच्चें लोखंड व पोलाद यामध्यें रशिया ब्रिटनची बरोबरी करतो, पण अजून जर्मनीच्या मागें आहे. कोळशाच्या उत्पन्नांत ब्रिटन, जर्मनी, व अमेरिका यांच्या खालोखाल रशिया येतो. परंतु ही तुलना राष्ट्रीय संपत्तीची झाली. दरमाणसीं रशियाचें उत्पन्न अजून पुढारलेल्या देशांच्या मागें आहे.

पहिली "पंचवार्षिक योजना" १९२८ सालांत सुरू झाली व तिसरी योजना १९४२ झालीं पुरी करण्यांत आली. त्याचा परिणाम आंकडेवारीनें मोजावयाचा म्हणजे १९१३ सालीं १ कोटी दहा लक्ष असलेली कामगारांची संख्या १९४० सालीं तीन कोटींवर गेली; परंतु सोव्हियट योजना केवळ सांपत्तिक उन्नतीसाठीं नव्हती. त्या योजनेचें लक्ष सामाजिक सुधारणा व लोकांच्या सुखाची वाढ ह्याकडेही होतें. १९१३ सालीं रशियांत ८० लक्ष विद्यार्थी होते, पण ह्या योजनेमुळें आज ३ कोट २० लक्षांवर विद्यार्थ्यांची संख्या गेलेली आहे. विश्वविद्यालयांतून शिकणारांचा आंकडा एक लक्ष बारा हजारांवरून सहालक्ष वीस हजारांपर्यंत सदर योजनेमुळें पोहोंचला आहे. पूर्वीच्या वीस हजार डॉक्टरांऐवजीं आज रशियांत एक लक्ष वीस हजार डॉक्टर काम करीत आहेत. पूर्वी सर्व रशियांत १५३ नाट्यगृहें होतीं, तीं आज ८२५ आहेत आणि १५०० सिनेमागृहांच्या जागीं ३१००० झालीं आहेत.

"पंचवार्षिक योजना" या प्रकरणामध्यें कालानुसार व कार्यानुसार भेद दिसले तरी वस्तुतः त्यामध्यें मुळींच भेद नाहीं, हें लक्षांत ठेवणें अवश्य आहे. कारखान्यांच्या अभिवृद्धीचीं हीं तीन एकमेकांत गुंतलेलीं अंगें असून तिन्ही मिळून एकच कार्य साधलें गेलें आहे. कारखान्याच्या उभारणीचे ते चढते मजलेच होत, असें म्हटल्यास त्याची नीट कल्पना येईल. ह्या नव्या नव्या योजना यशस्वी करून दाखविणें किती श्रमाचें व कालावधीचें कार्य होतें ह्याविषयीं १९२० सालीं फारच थोड्यांना कल्पना होती. ह्या कार्याच्या परिपूर्णतेची जबाबदारी गोस्प्लानवर पडली होती. पण आतां त्यासाठीं People's

Commissariate ह्या नांवाचें अति महत्त्वाचें निराळें खातें उघडण्यांत आलेलें आहे.

"गोस्प्लान" चें मुख्य काम आतां कार्य तडीस नेण्याचें नसून त्याची माहिती गोळा करणें व योजना तयार करणें हें आहे. सोव्हियट यूनियनमध्यें ज्या कांहीं संस्था आहेत त्या सर्वांकडून झालेल्या व पुढें करावयाच्या कामांचें अंदाजपत्रक "गोस्प्लान" कडे नियमित पाठविलें जातें. अशा संस्थांत केवळ कारखाने व कृषि या संस्थांचाच समावेश होत नसून शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, संगीत, कला, राष्ट्रसंरक्षण, वहातुकीचीं खातीं इत्यादि अनेक संस्थाहि आपल्या कामाची माहिती न चुकतां गोस्प्लानकडे पाठवीत असतात व तशी ती त्यांनीं पाठविली पाहिजे असा कडक कायदाहि आहे. यामुळें असलें विविध व अफाट कार्य करण्यासाठीं गोस्प्लान खात्यांत निरनिराळ्या विषयांचे अनेक तज्ज्ञ रात्रंदिवस आपापल्या कामांत गुंग झालेले असतात. पंचवार्षिक योजना सुचविण्यासाठीं व तिला मूर्तस्वरूप देण्यासाठीं राष्ट्रांतील ७० विद्वानांचें एक "Planning Commission" नांवाचें खातें आहे. गोस्प्लानला विशेष मदत व्हावी म्हणून 'राष्ट्रीय-जमाखर्च' ठेवणारें एक खातें आहे व या खात्याच्या मदतीला जमाखर्चांत नवे मार्ग दाखविणारी संशोधनसंस्थाहि आहे. योजना करण्याचें शिक्षण देण्यासाठीं All Union Academy of Planning नांवाचीं विश्वविद्यालयें मॉस्को व लेनिनग्राड या शहरीं आहेत. खुद्द गोस्प्लान खात्यांत दोन हजारांवर तज्ज्ञ मदतनीस असून हजारों कारकून आहेत. कांहीं टीकाकार म्हणतात कीं, सोव्हियट सरकारच्या आंकड्यांत बरीच लटपट असते; या टीकाकारांना बहुश्रुत व विद्वान वेब दंपत्यानें आपल्या पुस्तकांत (Soviet Communism) पुढील चोख उत्तर दिलेलें आहे.

"गोस्प्लान" संस्थेचे आंकडे जगांतील कोणत्याहि सरकारी आंकड्यांपेक्षां अधिक विश्वसनीय आहेत. कारण सोव्हियटची आर्थिक उभारणी ह्या आंकड्यांवरच अवलंबून असते. हे आंकडे जर दिखाऊ असतील तर सोव्हियट सरकार आपोआपच डळमळून कोसळून पडेल."

देशांतील अनेक उत्कृष्ट इंजिनीयर, भौतिकशास्त्रांचे तज्ज्ञ, आंकडेशास्त्रांचे पंडित हे एकत्र बसून योजनेला पहिलें रूप देतात. पुढें हा कच्चा तक्ता वर्तमान-पत्रांतून जाहीर करण्यांत येतो व त्यावर लहानमोठ्या सभांतून कामगार, शेतकरी

व इतर लोक अनेक दिवस अभ्यासपूर्वक चर्चा करून आपलीं मतें सरकारास कळवितात. योजना करणें म्हणजे मेजाजवळ बसून केवळ आंकड्यांचा व शब्दांचा काथ्याकूट करणें नव्हे, तर ती कुठपर्यंत व कशी मूर्तरूपांत आणणें शक्य आहे हें सुचविणें होय. तें काम प्रत्यक्ष काम करणारांवर अवलंबून असतें म्हणून देशभर "पंचवार्षिक" योजनेविषयींची लोकांचीं मतें विचारलीं जातात. पंचवार्षिक योजना ही कोणाहि एका माणसाच्या मेंदूची लहर नसून लाखों लोकांच्या बुद्धीचें तें एक फळ असतें ही गोष्ट अवश्य ध्यानांत ठेवली पाहिजे. म्हणूनच "योजनेचे कर्ते लाखों लोक"—असें सोव्हियट सरकार प्रतिपादन करतें. या प्रतिपादनांतहि एक विशिष्ट हेतू आहे आणि तो हा कीं लाखों लोकांना ही योजना आपलीच आहे असें वाटून तिची पूर्तता करण्याकरितां त्यांनीं उत्साहानें झटावें. ही योजना केवळ आंकड्यांची सृष्टि नाहीं; ती लाखों लोकांच्या नव्या जीवनाचें व कार्याचें मूर्तस्वरूप आहे." स्टालिनची ह्या योजनेबद्दलची सदर उक्ति योग्य नाहीं असें कोण म्हणेल ?

सोव्हियट सरकारचा पंचवार्षिक योजनेचा विजय आपणांस तज्ज्ञ म्हणवून घेणाऱ्या बऱ्याच लोकांस पटत नसे. २२ जून १९४१ सालीं जर्मनीचा अचानक हल्ला जेव्हां रशियावर झाला तेव्हां कैक लोकांस असें वाटलें कीं दहा पांच दिवसांतच रशिया शरण जाईल. आज देखील सोव्हियटच्या अचाट, आर्थिक व औद्योगिक बलाची कल्पना बऱ्याचशा लोकांस नाहीं. इतकेंच नव्हे तर अजाण लोकांस फसविण्यासाठीं रशियाबद्दल खोटीं विधानेंहि पिकविलीं जातात. रशिया आज एवढ्या शौर्यानें व यशस्वीपणें कसा लढूं शकतो याविषयीं विचार केला असतां सोव्हियट फौजेच्या मागें उत्कृष्ट शस्त्रास्त्रें तयार करणारे सोव्हियट कारखाने आहेत व ते फौजेला सुसज्ज ठेवीत आले आहेत असें दिसून येईल. हे कारखाने तात्कालिक नाहींत. त्यांचा प्रादुर्भाव पंचवार्षिक योजनेंतून झालेला आहे. आज दिसून येणारी त्या कारखान्यांची कार्यक्षमता हें पंचवार्षिक योजनेचें फळ आहे. अर्थात् त्या योजनेच्या दूरदर्शीपणाचा निराळा उहापोह करण्याची गरज नाहीं.

पंचवार्षिक योजनेमुळें सोव्हियट राष्ट्राची संपत्ति अत्युच्च स्थितीस पोंहोचली आहे, हें कोणाही विचारी माणसाला सहज पटण्याजोगें आहे, पण ह्या योजनेचा परिणाम सोव्हियट लोकांच्या जीवनावरसुद्धां झालेला दिसतो, ही एक विशेष गोष्ट आहे व ती विसरून चालणार नाहीं. उदाहरणार्थ—योजनापूर्तीचें ध्येय

समोर ठेवून काम करण्याची संवय, बहुधा युद्धाच्या काळांतच दिसून येणारा हुरूप शांततेच्या काळांतही टिकून रहाणें, तसेंच संकल्पित कार्य शेवटाला नेण्यास लागणारी चिकाटी व ताकद इत्यादि गुण सोव्हियट जनतेमध्यें अशा योजनांच्या अंमलबजावणीनें उत्पन्न झाले आहेत. रशियन जनतेची आतां पूर्ण खात्री झाली आहे कीं, माणसांवर आंधळ्या आर्थिक परिस्थितीचा अम्मल नसून माणसेंच आपल्या नशिबांचे खरे कर्ते व नियंते होत. थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास ह्या योजनेचा हेतु " आर्थिक दृष्ट्या व वैचारिक दृष्ट्या लोकांमधील भांडवलशाही तत्त्वांचा पगडा नष्ट करणें, " हा आहे.

पं. जवाहारलाल नेहरूंनीं ह्या ' योजने ' च्या बाबतींत पुढील फारच मननीय विचार प्रकट केले आहेत. " योजना हा शब्द आज सर्वांच्या मुखीं झालेला आहे— कारण ह्या शब्दांत सोव्हियटनें जादू भरली आहे. या योजनेविषयीं अत्यंत महत्त्वाची व कौतुकास्पद गोष्ट म्हणजे तिच्यामागें असलेली भावना ही होय. आणि ही भावना म्हणजे राजकारण आणि उद्योगधंदे यांच्या मिलाफानें उत्पन्न झालेलें नवें चैतन्य होय. आधिभौतिक शास्त्रांच्या अभ्यासानेंच हें नवचैतन्य उदयास आणलें आहे. आधीं पूर्ण विचार करून शास्त्रोक्त पद्धतीनें समाजाच्या उभारणीचा प्रयत्न, असें या चैतन्याचें लक्षण आहे. असा प्रयत्न पूर्वीं कोणत्याही देशांत केला गेला नव्हता. फार सुधारलेल्या म्हणून गाजणाऱ्या देशांतूनही असा प्रयत्न झालेला नाहीं. सोव्हियट योजनेचें अगदीं ठळक लक्षण म्हणजे मनुष्याच्या वैयक्तिक व सामाजिक स्थितिगतीवर शास्त्रीय पद्धतीचा प्रयोग करणें, हें होय. "

# १२

## समाजसत्तावादाचा लोखंडी घोडा

> " उद्यां जर आम्ही खेडुतांना १० लाख यांत्रिक नांगर–पेट्रोल व हे नांगर चालविणारे यांसह–पुरविलें ( आज ही कल्पना केवळ स्वप्नवत् आहे म्हणा ) तर मध्यम स्थितीचा शेतकरी तावडतोब म्हणायला लागेल कीं ' आम्ही समाजसत्तावादाचे अनुयायी आहों ' प्रथम शेतकऱ्याला मदत करा म्हणजे त्याचा विश्वास तुम्हांला सहज संपादन करतां येईल. "
>
> **लेनिन**

१९२८ ते १९३३ या काळांत वस्तुतः एकाच वेळीं दोन पंचवार्षिक योजना पुऱ्या करण्याचें काम सोव्हियट सरकारनें सुरू केलें होतें. दुसरी योजना ही पहिलीच्या मानानें पार पडण्याला फार कठीण होती. रशिया हा मुळांत कृषिप्रधान देश. त्यांतील शेतकरी लोकांना कारखान्यांच्या संकुचित क्षेत्रांत आणणें हें सोपें नव्हतें. शेतकीचा व्यवसाय समाजसत्तेच्या कक्षेंत आणणें हें त्याहून कितीतरी पटीनें अधिक दुष्कर कार्य होतें. हें उघड आहे.

१९१७ मध्यें बोल्शेव्हिकांनीं जमिनीबाबत पुढील घोषणा केली :—" यापुढें राजाची, धार्मिक मठाकडची व जमीनदारांच्या ताब्यांतील अशी सगळी जमीन कायमच्या स्वरूपांत सरकारनें आपल्या मालकीची ठरविली आहे. " त्यावेळची परिस्थिति पाहिल्यास शेंकडा नव्वद टक्के जमीन शेतकऱ्यांच्या हातीं पडलेली होती व या जमिनीची वांटणी शेतकरीच आपसांत करीत होते असें दिसून येतें. मागील महायुद्ध सुरू होण्यापूर्वीच्या वर्षी म्हणजे १९१३ सालीं इकडेतिकडे पसरलेलीं अशीं सुमारें १ कोट लहान लहान शेतें रशियांत होतीं. १९१८ मध्यें ही संख्या २॥ कोटीच्या घरांत गेल्याचें आढळलें.

मराठी ग्रंथ

याचा अर्थ असा कीं, शेतांचे आणखी अतिशय बारीक बारीक तुकडे पडले. हे तुकडे मालकाच्या घरानजीकच असतील असा मात्र प्रकार नव्हता. मालक एकीकडे व त्याचें शेत कोठेंतरी लांब अंतरावर दुसरीकडे अशी स्थिति पुष्कळदां असे. शेतीची रीत अगदीं कमालीची साधी होती. पुष्कळ शेतकऱ्यांपाशीं नांगर चालवायला एक घोडा देखील नसे. कायद्याप्रमाणें सरकार नांवाला जमिनीचें मालक असलें तरी वस्तुतः शेतकरी कुटुंबाकडेच जमिनीचा ताबा राही. शेतामध्यें बांध घालून दोन निरनिराळ्या शेताच्या हद्दी दाखविल्या जात असत. जेव्हां क्रान्तीची लाट उसळली, तेव्हां जमीन मिळविण्याची ही एक आयती संधी चालून आली आहे अशा समजुतीनें शेतकऱ्यांनीं क्रांतीचें स्वागत केलें. जमीन पटकावण्याची संधी हेंच क्रान्तीचें राजकारण असा शेतकरी लोकांचा पक्का समज झालेला होता.

जमिनीचे लहान लहान तुकडे करीत गेल्यानें काय परिणाम होतो हें ठरलेलेंच आहे. जमिनींतील पिकाचें प्रमाण उतरत जाणें हाच तो परिणाम होय. रशियांत दर एकरीं चवथ्या हिश्शानें कमी पीक होऊं लागलें होतें. यंत्राच्या साह्याखेरीज हें पीक वाढविण्याला दुसरा उपाय नव्हता. पण जमीन सपाटून मोठी असल्याशिवाय यांत्रिक पद्धतीचा फारसा उपयोग होत नाहीं. लहान लहान शेतजमिनी एकत्र करून सोव्हियट सरकारनें शेतकीच्या उत्कर्षाचा अर्वाचीन उपाय अंमलांत आणला. या उपायाला त्या सरकारानें अभंग "समुदायीकरण" (collectives) असें नांव दिलें.

पूर्वी शेतकरी आपल्या जमिनीला गुलामाप्रमाणें जखडलेला होता. समुदायीकरणानें या पुरातन काळापासून चालत आलेल्या गुलामगिरींतून शेतकरी मुक्त व्हावा, असा या प्रयोगाचा आणखी एक उद्देश होता. जुन्या थाटाचीं ओबडधोबड साहित्यें उपयोगांत आणून पूर्वीच्या शेतकऱ्याला आपल्या शेतींत अगदीं गुलामाप्रमाणें मरेमरेतों राबावें लागे. त्याच्या लाकडी नांगरानें जमिनीवर जेमतेम ओरखडा पडल्यास मोठी शिकस्त वाटे. तो पेरणी हातांनींच करी. कापणीच्या हंगामांत सारा दिवस ओणव्या स्थितींत कोयत्यानें पीकाची कापणी करावी व एखाद्या मुद्गलासारख्या जाड दांडक्यानें तें मळून काढावें. धान्यांतील भुसकट वाऱ्यानें उडविण्याकरितां ओंजळी भरभरून धान्य वर फेंकण्याचा त्याचा प्रघात होता. तिऱ्हाइताला हा देखावा सुंदर वाटला तरी शेतकऱ्यांचीं मात्र या कामानें

हाडेन् हाडें खिळखिळीं झाल्याशिवाय रहात नसत. कापणी-मळणीचा हंगाम आला कीं शेतकरी, त्याची बायको व मुलें या सर्वांना सूर्योदयापूर्वींपासून सूर्यास्त होऊन गेल्यावरसुद्धां या कामापायीं अविश्रान्त खपावें लागे. म्हणूनच हंगामाच्या मोसमाचा उल्लेख 'क्लेशांचा हंगाम' या शब्दांनीं केला जात असे. इतके श्रम-सायास करून देखील शेतकऱ्यांचें दारिद्र्य कधींच कमी झालें नाहीं. रशियांतील शेतकऱ्यांचा कंगालपणा हृदयभेदक स्वरूपाचा होता. ई. जे. डिलान यानें एका ठिकाणीं रशियन शेतकीचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे :—"दुष्काळ ही रशियांत एक नित्याचीच बाब होऊन बसली आहे. जसा ठरल्या काळीं बर्फ पडायचा, किंवा सैबेरियांतील साथीचा रोग ठरल्या मुदतीला हटकून पसरायचा तसाच रशियामध्यें दुष्काळाचा प्रकार आहे. कोणत्या ना कोणत्या प्रांतामध्यें पुरेशा पिकाच्या अभावानें दुष्काळाचें रूप धारण केलें नाहीं असें एकही वर्ष जात नाहीं." मानवी जीवाला शेतीसाठीं जो भयानक ताण सोसावा लागे त्यांतून त्यांची सुटका करण्यासाठीं व पिकें वाढविण्यासाठीं सोव्हियट सरकारानें यांत्रिक साधनांचा उपयोग आरंभला. यंत्रांमुळें खेड्यांत जें मनुष्यबळ रिकामें राहील तें कारखान्याकडे वळविण्याची सोय या नवीन योजनेमुळें झाली.

समाजसत्तावादी राज्यांत शेतजमिनीच्या खाजगी मालकीची गय केली जाणें शक्यच नाहीं. कारखाने वाढवावयाचे झाल्यास शेतकीची नवी प्रथा अंमलांत आणण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. कारखान्याच्या योगानें जीं नवीं शहरें अस्तित्वांत येत होतीं तेथील वस्तीला अन्न पुरविण्याचा प्रश्न सोव्हियटपुढें होता. बारीक शकलें पडलेल्या व खाजगी मालकीच्या शेतजमिनीवर स्वस्त अन्नधान्यासाठीं विसंबून रहाणें धोक्याचें होतें. याचा विचार करतांना शक्तीसाठीं यांत्रिक साधनें उपयोगांत आणण्याची अपरिहार्य आवश्यकता सोव्हियट सरकारास पटली. ट्रॅक्टर (यांत्रिक नांगर) कापणीचीं व मळणीचीं यंत्रें शेतीच्या धंद्यांत दाखल करण्या-खेरीज दुसरा इलाज नव्हता. हीं यंत्रें नव्या कारखान्यांतून तयार होऊं लागलीं, पण भक्कम विस्ताराच्या जमिनीशिवाय तीं व्यर्थ ठरलीं जाण्याचें भय होतें. "समाज-सत्तावादाच्या तंत्राप्रमाणें मोठमोठे उद्योगधंदे चालवावयाचे आणि शेतकी मात्र खाजगी वैयक्तिक मालकीची बाब समजावयाची हा प्रकार म्हणजे शुद्ध थोतांड म्हणावें लागतें. जर खराखुरा समाजसत्तावाद निर्माण करावयाचा असेल, तर विचारांचा असला भाबडेपणा सोडला पाहिजे. तो चालू ठेवल्यास समाजसत्तावाद

निष्फळ झाल्याशिवाय रहाणार नाहीं" असा या संबंधांत स्टालीन यानें एकदम खणखणीत सडेतोड इशारा दिला होता.

शेतकीचें समुदायीकरण १९२९ सालीं पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या वर्षीच सुरू झालें. १९२७ अखेरपर्यंतचा काळ नव्या राज्यव्यवस्थेची घडी नीट बसविण्यांत गेला. पण नव्या राज्यकर्त्यांनीं शेतकीच्या समुदायीकरणाचें काम या काळांतही चालविलें होतें. १९२७ अखेरपर्यंत समुदायीकरणानुसार वरींच शेतें नमुन्यादाखल निर्माण करण्यांत आलीं. सहकारी पतपेढ्यांच्या द्वारें या दिशेनें बरीच कामगिरी झालेली होती. तथापि अजून जुन्या धर्तीचे पन्नास लाख लाकडी नांगर चालूच होते. सर्वांच्या हितासाठीं अर्वाचीन कृषितंत्र उपयोगांत आणणेंच श्रेयस्कर आहे, अशी पंचवार्षिक योजनेची फलश्रुति सोव्हियट सरकारनें शेतकरी समाजापुढें मांडलेली होती. १९२९–३० मध्यें या कार्याला भरती चढून त्यानें सोव्हियट संघाचा कितीतरी अफाट प्रदेश व्यापून टाकला व लक्षावधी शेतकरी त्या भरतीनें आपल्याबरोबर वाहून नेले.

केवळ कागदावर पहातां ही योजना फारच साधीसुधी दिसते. शेतजमिनी एकत्र करून त्यांचें क्षेत्रफळ वाढविणें व त्यांस सामाजिक स्वरूप देणें हे या कार्याच्या सिद्धीचे दोन मार्ग होते. शेतकऱ्याची जमिनीवरील खाजगी मालकी रद्द करून, राज्यकारभाराचें एक अंग म्हणून कारखान्यांप्रमाणें शेतीची व्यवस्था सरकारमार्फत लावणें हा एक मार्ग होता. मोठाल्या सामुदायिक शेतीवर सहकारितेच्या तत्त्वानें शेतकऱ्यांनीं काम करावें, असा दुसरा मार्ग होता. दोन्ही मार्गांची परीक्षा करून सोव्हियट सरकारानें कलखोझ ऊर्फ 'सामुदायिक शेतें' हा मार्ग अखेरीस पसंत केला.

खेड्यांतील मोठाल्या जमीनदारांनीं या नव्या पद्धतीशीं अतिशय निकरानें झगडा केला. हे जमीनदार नुसतेच आपापल्या पुरते शेतकरी नव्हते तर आपल्या हाताखालीं पुष्कळ मजुरांना कामास लावणारे लोक होते. आरंभीं गरीब शेतकरी समुदायीकरणाच्या प्रयोगास अनुकूल झाले. सर्वांनीं आपल्या शेतकामाचीं जनावरें समुदायीकरणाकडे सोपवावीं, असा नियम होता. हे समुदायीकरणाचे विरोधी जमीनदार आपल्या जनावरांचा उपयोग समुदायीकरणाला होऊं नये म्हणून तीं जनावरें बेलाशक मारून टाकीत. यावरून त्यांच्या विरोधाची प्रखरता

ध्यानांत येईल. जनावरांच्या अशा नाहक कत्तलीमुळें रशियांत पुष्कळ वर्षें जनावरांचा तुटवडा जाणवला. १९१३ मध्यें जनावरांची जी संख्या होती तिच्यापेक्षां सध्यांच कुठें ही संख्या थोडी पुढें गेली आहे.

समाजांतील पुराणमतवादी लोकांना कांहींही नवें म्हटलें किंवा दिसलें कीं अंगांत कांपरें भरतें हें प्रसिद्धच आहे. त्याप्रमाणें असल्या लोकांनीं यंत्रांचा तिरस्कार चालविला होता. 'सैतानाचें कपटजाळ' असें नांव त्यांनीं यांत्रिक नांगराला ठेवलें होतें. ट्रॅक्टरच्या आसपास हिंडून "त्याला सैतानाची घाण येते!" असें पुटपुटत या लोकांनीं कांहीं काळ घालविला. तरी हा वेताळ खणखणत व गुरगुरत खेड्यांतून शिरलाच. फिरतांना त्याच्या पोटांतून वाफेचे व धुराचे लोटच्यालोट बाहेर पडत. त्या यंत्राचा हा अक्राळविक्राळ खाक्या पाहून हे पुराणमतवादी जांबुवंत भयचकित होऊन "आला रे आला; ख्रिस्ताचा दुस्मान् आला" अशा किंकाळ्या मारीत आपापल्या झोपड्यांतून पळाले व तोंडें लपवून बसले. "जशी स्थिति मागें होती, तशीच ती पुढेंही राहिली पाहिजे. आमचे वाडवडील ज्या पद्धतीनें शेत नांगरीत होते, त्याच पद्धतीनें आम्हीही नांगर चालविणार." या म्हणींत जो पुराणमताभिमान सांठविलेला आहे तो हास्यास्पद दिसला तरी त्याच्यावर विजय मिळविण्याचें काम वाटतें तितकें सोपें नव्हतें.

थोडक्याच अवधींत ट्रॅक्टरला मळणीच्या हत्यारांची जोड मिळाली व तो शंभर वेताळांच्या शक्तीनें आपलें काम बजावूं लागला. सध्यां रशियन शेतकऱ्यांना आपल्या हाडांतील ठणका घालविण्यासाठीं मालिश करून घेण्याची गरज राहिलेली नाहीं; किंवा शरीराचे सांधे रगडून घेण्याचीहि जरूरी उरलेली नाहीं. नेत्रांत कौतुकाची व अंतःकरणांत कृतज्ञतेची भावना सांठवलेला असा एका वेळचा पुराणमताभिमानी रशियन शेतकरी आतां ताठ उभा राहून ट्रॅक्टरचे गुण गाऊं लागला आहे. ट्रॅक्टर म्हणजे ख्रिस्तशत्रूचा अवतार असें तो आतां मानीत नाहीं. उलट ईश्वरानें, ट्रॅक्टर हा कोणी आपल्या उद्धारासाठीं पाठविलेला पैगंबरच आहे अशी रशियन शेतकऱ्यांची त्याबद्दलची श्रद्धा आहे. तार्तर कवींनीं 'समाजसत्तावादाचा लोखंडी घोडा" असें ट्रॅक्टरचें वर्णन गाऊन त्याला अजरामर केलें आहे.

समाजसत्तावादाची आघाडी उघडून चढाईचें धोरण स्वीकारतांना सामुदायिक शेतांविषयीं बहुजनसमाजांत अनुकूलता उत्पन्न व्हावी म्हणून सोव्हियट सरकारनें

१९२८ सालीं जोराचा प्रयत्न केला. दारिद्र्याच्या हालअपेष्टांतून सुटण्याचा समुदायीकरण हा एकच एक उपाय आहे अशी बहुजनसमाजाची खात्री पटविण्यासाठीं जें जें सुचेल त्याचा उपयोग करून सोव्हियट सरकार झटत होतें. एकेका व्यक्तीचा शेतीचा मोह सुटावा यासाठीं त्या शेतीच्या व्यवहारांत शक्य तेवढे अडथळे उत्पन्न करण्यांत आले; हळूहळू या मोहाचा पगडा खालावून रशियन शेतकरी आपली जुनी पद्धत सोडण्याला तयार झाला. समुदायीकरणाला जो हातभार लावील, त्याला सवलती व हक्क देण्याचा क्रम सोव्हियट सरकारनें आरंभला. ट्रॅक्टर व इतर हत्यारें, बीं, शिक्षक, खतपाणी, मुलांसाठीं संगोपनगृहें, त्याचप्रमाणें कपडलत्ते व पादत्राणें यावर पहिला हक्क, इत्यादि सवलती देण्याची व कामें करण्याची जबाबदारी समुदायीकरणाच्या उत्तेजनार्थ सोव्हियट सरकारनें पत्करली. सवलतीच्या व हक्कांच्या आश्वासनांत सोव्हियट सरकारनें आणखी एक महत्त्वाचें कलम घातलें होते. तें म्हणजे कुलाकच्या तावडींतून सुटण्याचें. कुलाकचा अर्थ "घट्ट मूठ". हा शब्द श्रीमंत स्थानिक जमीनदाराला लावला जात असे. मोठ्या जमीनदारीबरोबरीच हा सावकारीचा धंदा करून आपलें उखळ पांढरें करून घेणारा असे. व्याजबट्टा, सट्टे यांच्या योगानें आपला खिसा गरम राखणाऱ्या सदर प्राण्याच्या मगरमिठींतून सुटण्याची खात्री हें तर लहान लहान रशियन शेतकऱ्यांना हुरळून सोडणारें आमिषच होतें. कुलाकचा सगळे मत्सर करीत, त्याच्याबद्दल तिरस्कार बाळगीत, तरीसुद्धां त्याचा शेतकऱ्यांमध्यें दरारा असे. शेतकरी आंतून जळफळले तरी त्याच्यासमोर त्यांना नमूनच वागावें लागे. 'कलखोझ' मध्यें त्याला कधींच सामील न करून घेण्याचा सोव्हियट सरकारनें नियम केला. कुलाक हा दुसऱ्याचें रक्तशोषण करणारा उपद्रवी प्राणी आहे; असा त्यावर सरकारी अभिप्राय पडतांच त्याचा निःपात होण्याला उशीर लागला नाहीं. त्याच्यावर सरकारनें डोईजड कर लादले व रोजची रहाणी देखील कठिण करून सोडली. 'कुलाक' या नांवाचा कलंक झाडून होऊं घातलेल्या दुर्दशेंतून सुटण्यासाठीं शेतकऱ्यांच्या झुंडीच्या झुंडी सामुदायिक शेतीच्या कामाकडे साहजीकच धांवत निघाल्या व तें काम मनोभावानें करूं लागल्या.

योजनेप्रमाणें शेंकडा वीस एवढ्या प्रमाणांत वैयक्तिक खाजगी शेतीचें समुदायीकरणांत रूपांतर झालें. केव्हां केव्हां दडपशाहीचा अंमलही करण्याची

पाळी आली. १९३१ च्या वसंतऋतूंत तरुण उत्साही लोकांनीं एकंदर शेतीच्या एक तृतीयांशाचें समुदायीकरण झाल्याचें सरकारास कळविलें. मनधरणी व जबरदस्ती अशा दोन्ही उपायांनीं शेतकऱ्यांमध्यें परिवर्तन झालें, पण प्रत्यक्ष शेतकीचें काम मात्र थंडावल्याचा अनुभव आला. ‘ विजयानें आलेली घेरी ’ अशा अर्थाच्या मथळयाच्या एका लेखांत खुद्द स्टालिनलाच आतां हें समुदायीकरण थांबलें पाहिजे, असें बजावण्याची जरूरी वाटली. शेतकऱ्यांनीं वासंतिक पेरणी करावी, असा अधिकार त्यानें शेतकऱ्यांना या लेखाच्याद्वारें बहाल केला, नाहींतर पीक मुळींच हातीं लागणार नाहीं, हा धोकाहि त्यानें दाखविला होता. उत्साहाच्या पहिल्या भरांत बाहेरच्या प्रेरणेनें सामुदायिक शेतें उभारलीं गेलीं, परंतु या प्रेरणेचा दाब मंदावतांच तीं शेतें उध्वस्त झालीं; पण स्टालीन या निरुत्साहकारक दृश्यानें बिचकून माघार घेण्याला तयार नव्हता. सामुदायिक शेतासाठीं लागणारी पूर्वतयारी करून उत्साहाचा अतिरेक न होऊं देतां सामुदायिक शेताच्या कामगिरीचें आगेकदम त्यानें सुरू केलें. थोडक्यांत शेतकरी व सरकार यांच्यांतील झगड्याचें तात्पर्य सांगावयाचें झाल्यास समुदायीकरणाचा शेवटीं जय झाला, एवढें सांगणें पुरें आहे. आज सोव्हियट राज्यसंघांत जिकडे तिकडे या पद्धतीचें प्राबल्य आढळतें; एवढेंच नव्हे तर प्रारंभीं पिकांच्या बाबतींत जी निराशा वाटत होती, तिचें निर्मूलन होऊन सध्यां पिकांची जशी भरभराट दिसत आहे तशीच जनावरांच्या संख्येंतही वाढ झालेली आहे. समुदायीकरणासाठीं सरकारला उग्र स्वरूपाची दडपशाही करावी लागली हें खरें असलें तरी समुदायीकरणाला केवळ दडपशाहीमुळें यश लाभलें असा तर्क करणें ठरेल. यांत्रिक साधनें, त्यांच्या मागील भौतिक शास्त्रांचें ज्ञान, कामाचें नवीन तंत्र व कौशल्य या अनेकविध सामर्थ्यांचा निसर्गाच्या बरोबरीनें दिसणारा चमत्कार पाहूनच लोक समुदायीकरणाकडे आपखुषीनें वळले, असा निष्कर्ष काढणें अधिक योग्य ठरतें. नव्या सामर्थ्याची मोहिनी नसती तर केवळ दडपशाहीनें—मग ती कितीही कडक असो—लोकांची साहजिक अनुकूलता या कार्याला लाभणें शक्य नव्हतें.

‘ सोव्हखोझ ’ या नांवानें ओळखलीं जाणारीं अवाढव्य शेतें सर्वस्वीं सरकारी असून त्यांचें काम सरकारच चालवितें. यांतील १०००० शेतांतून प्रामुख्यानें धान्य, कापूस, अंबाडी व जवस यांचें पीक काढलें जातें. याशिवाय घोडे, शेळ्या, हरिण

यांच्या पैदासीचें काम या शेतांवर होत असतें. या शेतांचा कांहीं भाग सोयाबीन, वैद्यकी उपयोगाच्या वनस्पति, रबराचीं झाडें व सुगंधोपयोगी फुलझाडें यांच्या लागवडीसाठीं राखून ठेवलेला आहे. प्रत्येक शेतावर एक व्यवस्थापक नेमलेला आहे. शेतावरील डॉक्टर असो वा ट्रॅक्टर चालविणारा असो, रखवालदार असो वा धनगर असो, त्यांना मजुरी घेऊन काम करावें लागतें. या सर्वांचे संघ आहेत.

कलखोज म्हणून शेतीचा जो प्रकार सांगितला त्याचें महत्त्व विशेष आहे. शेतकऱ्यांची हीं स्वयंशासित सहकारी मंडळें आहेत. यांच्या कामाचा विस्तार प्रचंड असून रशियाच्या राष्ट्रीय जीवनांचा हा एक महत्त्वाचा घटक गणला जातो. लागवडीच्या व चराईच्या जमिनीपैकीं चारपंचमांशाइतका करोडों एकरांचा भाग या मंडळांच्या कारभाराखालीं आहे. या मंडळांचीं केंद्रवार संघटना केलेली आहे. (मूळचा शब्द Artel किंवा Cell हा आहे.) अशीं केंद्रें २५०००० आहेत. कांहीं केंद्रांत दहाबारा घरें आहेत तर कांहींत हजारापर्यंतही घरें आहेत. 'लेनिनचा निश्चय', 'शरणगति नाहीं', 'मे महिन्याची सकाळ', अशीं नांवें या केंद्रांना दिलेलीं आहेत. यांचा व औद्योगिक केंद्रांचा दर्जा सारखाच ठरलेला आहे. या केंद्रांवर सर्वांची सारखीच सत्ता असून सरकारी कर व इतर बोजा वगळून जें उत्पन्न हातीं येईल, तें त्याच्या श्रमाचें फळ या नात्यानें त्याच्याजवळ रहातें.

मॉस्को व खारखॉफ या शहरांत असतांना नजीकच्या सामुदायिक शेतांकडे मी फेरफटक्याला जात असें, त्यावेळीं या शेतांची तपशीलवार माहिती मला समजावून घेतां आली. सुमारें २७०० हेक्टर जमिनीवर ७५० धष्टपुष्ट स्त्रीपुरुष समाइकीनें काम करीत आहेत असें एक केंद्र माझ्या पहाण्यांत आलें. यांतील पांचशें हेक्टर जमीन रहाण्याच्या घरांनीं व शेतकामाच्या इमारतींनीं व्यापली होती. बाकीची जमीन लागवडीखालीं होती. रानांत व पडीक जागांतूनहि लागवड केली जाते हें येथें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे.

या ठिकाणीं भाजीपाला व धान्य या दोन्हींची लागवड केलेली होती. जनावरांसाठीं कुरणांची सोय होती. चार चांगले प्रशस्त विभाग घोडे, गाई, डुकरें व शेळ्या यांच्या पैदाशीकरितां राखलेले होते. येथें शेतकऱ्यांनीं पाण्याच्या पुरवठ्यासाठीं नळ टाकलेले होते. शिवाय त्यांच्याच श्रमाचें एक

बिजलीघरही माझ्या पहाण्यांत आलें. लहान मुलांसाठीं किंडरगार्टन, संगोपन-गृह आणि एक क्लब अशा संस्था त्यांनीं चालविल्या होत्या. या संस्था कार्यकुशल जाणत्या लोकांशिवाय पार पडणें शक्य नसल्यानें कुशल व जाणतीं माणसें त्यांत कायमचीं नेमलेलीं होतीं.

या केंद्रांतील लोकांचे १४ विभाग करून एका विभागाकडे शेतकाम, दुसऱ्याकडे जनावरांची निगा, तिसऱ्याकडे बागेचें काम, चवथ्याकडे रस्तेबांधणी, पांचव्याकडे घरबांधणी, सहाव्याकडे घरदुरुस्ती वगैरे कामें वांटून दिलेलीं आहेत. या विभागांचे १० किंवा १४ माणसें याप्रमाणें पोटविभाग आहेत. या विभागांतील दूध काढणाऱ्या मुली, धनगर, रखवालदार, सुतार अशी वर्गवारी सांपडली. मला येथें पुष्कळ माणसें भेटलीं. त्यांपैकीं कित्येकांनीं ७।८ वर्षें सतत एकच काम करून त्यांत प्रावीण्य संपादन केल्याचें मला आढळलें. आपापल्या कामांत नैपुण्य यावें म्हणून या केंद्रांतून स्वतंत्र शिक्षणाचा अभ्यासक्रम ठरविलेला असतो. तसा अभ्यास केल्याशिवाय आपापल्या कामांतील नैपुण्य संपादन करतां येत नाहीं. मला भेटलेल्या लोकांचें नैपुण्य अशा थाटाचें होतें. अशा रीतीनें समुदायीकरणाचीं केंद्रें आपल्या कामकऱ्यांना आपापल्या कामांत तरबेज करून सोडण्याची काळजी घेतात. हे तरबेज लोकच या संस्थांचा मुख्य आधारस्तंभ होत. लोकांच्या टोळ्या उभारतांना व्यक्तिशः कोणाची काय आवडनिवड आहे इकडे बारीक लक्ष पुरवून ज्याला ज्यांत उत्साह वाटेल त्याला त्याच कामाकडे लावण्याची योजकता दाखविली जाते.

" तंटा–भांडणें कोणत्या मार्गानें तोडतात ? " मी या केंद्राच्या अध्यक्षाला प्रश्न केला.

" सामुदायिक शेतकऱ्यांची सभा भरवून तिच्या निर्णयानुसार तंटेबखेड्यांची विल्हेवाट केली जाते " त्यानें उत्तर दिलें. " या सभेचे निर्णय आम्हां सर्वांना पूर्णपणें बंधनकारक असतात. व्यवस्थापक अधिकाऱ्यांना या सभा संभाळूनच आपापलीं कामें उरकावीं लागतात. "

" पण प्रत्यक्ष व्यवहार कसा चालतो ? व्यवस्थापकांनीं दिलेला निकाल या सभेकडून कधीं फिरविला जातो काय ? "

" पुष्कळदां, " अध्यक्षानें जबाब दिला–" व्यवस्थापक अधिकारी व दुसरे सभासद एकत्र बसून बरोबरीच्या नात्यानें सामुदायिक शेताच्या सगळ्या कामांची

दिशा मुक्रर करतात. आमच्या शेताचें सगळें वळ यांतच आहे. जे शेतकरी अनुभवी असतील त्यांना आम्ही व्यवस्थापक मंडळांत घेतों व त्यांचा सल्ला ऐकतों. यामुळें आमच्या कामांतील चुका टळतात."

व्यवस्थापक आणि सामुदायिक शेतकरी एकत्र वसून शेतीच्या सर्व कामाचा एक वर्षापुरता एक आराखडा तयार करतात. प्रत्येक कामाला माणसें किती लागतील, त्यांना किती तास काम करावें लागेल, त्याचप्रमाणें तें काम संपायला किती दिवस लागतील, यंत्रें कोणतीं व किती लागतील हा सर्व बारीकसारीक तपशील त्या आराखड्याच्या वेळीं विचारांत घेतलेला असतो. प्रत्येक सभासदाची ताकत व कुशलता लक्षांत घेऊन त्याचें दिवसाचें काम निश्चित केलेलें असतें.

सभासदानें आपलें रोजचें काम चोख बजावलें कीं, त्याला ठराविक मुशाहिरा मिळावयाचा असतो. ज्या कामासाठीं श्रम व कौशल्य हीं जास्त खर्चीं पडतात, त्या कामाचा मोबदलाही चांगलाच भक्कम असतो. पीक निघाल्यावर सामुदायिक शेतकऱ्यांच्या हातीं एकंदर मुशाहिऱ्याची तोंडमिळवणी करणारी रक्कम पडते.

सामुदायिक शेतांतील पिकाचा कांहीं हिस्सा बियाण्यासाठीं सरकारच्या हवालीं करावा लागतो. मग ट्रॅक्टर वापरले म्हणून त्या खात्याचा हिशोब चुकता केला जातो. नंतर दुसऱ्या वर्षासाठीं बियाण्याचा वेगळा सांठा करून ठेवतात. गुरांच्या चाऱ्याबाबतहि सबंध वर्षास पुरेल अशी सांठवणी करून ठेवतात. शिवाय कधीं पीक न आल्यास अडचण पडूं नये म्हणून शिलकी सांठा करून ठेवण्याची पद्धत आहेच. लाल फौजेंत नोकरी करणारांचीं बायकामुलें, म्हातारे व अशक्त, थोड्या मुदतीकरितां कामाला अयोग्य झालेलीं माणसें, बालसंगोपनगृहें यांच्यासाठीं एकूण उत्पन्नापैकीं शेंकडा दोन टक्के इतका भाग वेगळा काढून ठेवतात. कांहीं माल बाजारांत विकला जातो. उरलेला भाग सभासदांमध्यें त्यांच्या कामाच्या दराप्रमाणें वांटला जातो. जनावरांचीहि अशीच वांटणी करतात. बाजारांत विकलेल्या मालाची किंमत म्हणून जी रोकड जमा होईल, तिचाही विनियोग असाच करण्यांत येतो.

सामुदायिक शेतकऱ्याच्या सुखाकडे व मनोरंजनाकडे लक्ष देऊन पुष्कळच सोयी केलेल्या आहेत. क्लब व कँटीन (उपाहारगृहें) स्त्रीपुरुषांसाठीं असलीं तर लहान मुलांसाठीं क्रेश व संगोपनगृहें आहेत. कामावर असतांना या ठिकाणीं

मुलांचा संभाळ होतो. बहुतेक सर्व सामुदायिक शेतांवर एक लहानसें नाटकगृह व ग्रंथालय, अशी सोय दृष्टीस पडते. शेतकऱ्यांच्या मुलांसाठीं शाळेची योजना असते. प्रत्येक शेतावर स्वसंरक्षक मंडळ असतें. शारीरिक बलसंवर्धन, विमानांतून उड्या घेणें, निशाण मारणें, यांचें शिक्षण या मंडळामार्फत दिलें जातें. हत्यारांचें शिक्षण नुसतें बंदूक उडविण्यावरच थांबत नाहीं. गुंतागुंतीच्या हत्यारांचा उपयोग कसा करावा, याचें शिक्षण स्वसंरक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमांतून सुटलेलें नाहीं. सामुदायिक शेताच्या मालकीचे ट्रॅक्टर्स, शेतीचीं आयुधें, स्वयंगति गाड्या वगैरे वस्तु असतात. पण बहुधा या वस्तूंची व्यवस्था जवळचय ट्रॅक्टर केंद्रांकडे असते. अशीं केंद्रें सात हजार आहेत व त्यांच्याकडून २, ४०, ००० कल-खोझना वरील गोष्टींचा पुरवठा होतो.

प्रत्येक शेतकरी कुटुंबाच्या ताव्यांत लहानसें घर व भोंवतीं बागेसाठीं जागा दिली जाते. मोठ्या जनावरांपैकीं एकावेळीं जास्तींत जास्त तीन गाई त्यांच्या मालकीच्या असूं शकतात. परंतु डुकरें, कोंबडीचीं पिलें वगैरे कितीही ठेवलीं तरी प्रत्यवाय नसतो.

शेतकऱ्यानें सामुदायिक शेताच्या कामांत दाखल झालेंच पाहिजे अशी शेतकऱ्यावर सक्ती नाहीं. पण समुदायीकरणाबाहेरच्या शेतकऱ्याला फार मोठा कर भरावा लागतो व त्याच्या खाजगी उपयोगासाठीं उत्तम जमीन केव्हांच मिळत नाहीं.

१९२८ सालीं सरकार व सामुदायिक केंद्रें या दोघांकडे मिळून एकंदर शेतकीच्या क्षेत्रफळापैकीं शेंकडा तीन टक्के इतकीच जमीन होती. शेंकडा सुमारें ९७ टक्के शेतकी खाजगी रीतीनें शेतकऱ्यांमार्फत केली जात होती. पुढील चार वर्षांत इतकें परिवर्तन झालें कीं, जुन्या शेतकीचें प्रमाण एकंदर शेतकीच्या चतुर्थांशावर झालें. त्यानंतरच्या पांच वर्षांत ( १९३७ मध्यें ) जुनी शेतकी शेंकडा एक इतक्या सूक्ष्म स्थितीस पोंचली.

गव्हाच्या पिकाच्या बाबतींत उक्रेन हा एक मुख्य मुलूख होता. पण हल्लीं गहूं आणखी उत्तरेकडे पिकविला जातो. त्याप्रमाणें रेल्वेच्या बाजूबाजूनें पूर्वेकडील गव्हाचें पीक काढण्यांत येऊं लागलें आहे. या दोन्ही भागांत पूर्वी 'राय' नांवाच्या धान्याचें पीक होत असे. राय हें धान्य गव्हाच्या मानानें निकस

म्हणून त्याच्या जागीं गव्हाचें पीक लावलें जातें. चालू युद्धानें धान्यसंपन्न देशांची नव्यानें वांटणी करण्याचा प्रश्न धसास लावला आहे. पण ठोकळमानानें पहातां दक्षिणेकडील टापूशिवाय इतरत्र हवामान शेतकीला अनुकूल नाहीं, असेंच आढळतें. विशेषतः अंबाडी, जवस, बटाटे, बार्ली, ओट, राय, साखरेचे बीट इत्यादि जलद पिकणाऱ्या धान्य–फळांना उत्तरेकडची हवा बिलकूल मानवत नाहीं. पाण्याचा खूप पुरवठा करून मध्यआशियाच्या कांहीं भागांत कापूस पिकविण्याची सोय झाली आहे. कांहीं अंशीं ट्रान्सकाकेशियांतही कापूस निघूं लागला आहे.

आज जुन्या पद्धतीच्या शेतकीचे अवशेष बहुतेक नामशेषच झाले आहेत. सोव्हियट शेतकीचा प्राण म्हणजे सामुदायिक शेतें–ज्या देशाचें क्षेत्रफळ जगाच्या सहाव्या हिश्शाइतकें प्रचंड आहे, त्या अवाढव्य विस्ताराच्या देशांत शेतीची मध्ययुगीन पद्धति व पुराणमताभिमानाची बळकट परंपरा ही अवघ्या दहा वर्षांच्या कालावधींत नेस्तनाबूद व्हावी व सामुदायिकतेच्या पायावर चालणाऱ्या यांत्रिक शेतकीचा तेथें झपाट्यानें उत्कर्ष व्हावा, हा अर्वाचीन युगाच्या आर्थिक घडामोडीचा एक विलक्षण चमत्कारच नव्हे का?

# १३

## हिंदुस्थानच्या उंबरठ्याशीं

दुसरीं साम्राज्यशाही राज्यें आपल्या पादाक्रान्त प्रजेच्या हिताचा राष्ट्रीय स्वार्थाच्या लोभानें होम करीत असतां सोव्हियट राज्यसंघांत मला निराळाच प्रकार पाहायला सांपडला. या राज्यसंघाच्या विस्तारांत दूरवर अनेक राष्ट्रें पसरलीं आहेत. या विविध राष्ट्रांच्या हितसंबंधांचा समन्वय कसा करतां येईल याबद्दल सोव्हियट संघाचे राज्यकर्ते मनःपूर्वक प्रयत्न करीत असल्याचें माझ्या अनुभवास आलें. काल परवां ज्या जाती व जमाती इकडेतिकडे भटकून गुजारा करणाऱ्या रानटी वर्गांत मोडत होत्या, त्यांनीं संस्कृतीचा लाभ घ्यावा म्हणून केवळ उत्तेजन दिलें जातें असें नसून तसें प्रत्यक्ष शिक्षणही दिलें जात आहे. त्यांच्यांत संस्कृतीचे गुण झपाट्यानें वाढीस लागण्याकरितां जें शिक्षण दिलें जातें, त्यासाठीं प्रचंड रकमांचा खर्च होत असतो. कांहीं वर्षांपूर्वी ज्यांच्या संस्कृतिविकासाच्या दर्जांत कितीतरी तारतम्य दिसत होतें अशीं सुमारें दोनशें राष्ट्रें शांततेनें व सलोख्यानें प्रगतीचा मार्ग आक्रमण करीत आहेत, असें पाहून मी जेव्हां माझ्या देशाकडे दृष्टि वळवितों व येथील संस्कृतिसंपन्न आणि बुद्धिमान् समाज दिवसेंदिवस रानटीपणाच्या अंदाधुंदीकडे जास्तजास्त झुकत असल्याचा अनुभव मला येतो, तेव्हां या दोन ठिकाणच्या राज्यकारभाराची तुलना करावीशी वाटते. एका राज्यकारभाराचा पाया सहकारिता हा असून दुसऱ्याचा आधार नागवणूक हा आहे व यामुळें वरच्याप्रमाणें परस्परविरोधी घटना उद्भवल्या आहेत असें ध्यानांत आल्याशिवाय रहात नाहीं.

—रवींद्रनाथ टागोर

मध्य-आशियांत वेगानें बातमी पसरते. डोंगर, ओसाडी, नद्या आणि राष्ट्रांच्या सीमा यांचा आतां कांहींच अडथळा उरलेला नाहीं. उदाहरणार्थ, दूरच्या खोकन्यीर

खेड्यांतील सारे लोक केंद्रांतून जहाजांनीं रवाना झालेल्या पहिल्या ट्रॅक्टरचें दर्शन घेण्यासाठीं खेड्याबाहेर लोटले होते. ट्रॅक्टर चालविणारा मनुष्य कांहीं आठवडेपर्यंत त्या खेड्यांतील लोकांना एक पूज्य व्यक्ति होऊन बसली होती. सरहद्दीच्या दुसऱ्या बाजूला बसून अफगाणी लोक रात्रंदिवस ट्रॅक्टरचें काम पहात होते.

एके दिवशीं पियांजहून सरहद्द ओलांडून अफगाणी मंडळी सोव्हियट अधिकाऱ्यांच्या भेटीस आली. त्या ठिकाणच्या सोव्हियट अधिकाऱ्यांकडून सामुदायिक शेताची स्थापना करण्याच्या कामीं आपणांस मदत व्हावी, असें बोलणें करण्यासाठीं ही मंडळी आलेली होती.

"पण तुम्हीं सोव्हियट प्रजाजन कुठें आहांत ?" असें ताजीक अधिकारी त्यांना झाडून लावण्यासाठीं बोलला. निराशेनें ते अफगाणी परतले. परंतु अफगाणिस्तानांतून आलेल्या लोकांनीं ताजीकीस्तानांत जाऊन कांहीं सामुदायिक शेतें निर्माण केलीं आहेत.

मध्य-आशियांत नवजीवनाचें चैतन्य सळसळत आहे. आशियाच्या अगदीं गाभ्यांतलें प्राचीन बुखारा हें शहर होतें. त्या शहराच्या अधिकारविनाशांतून उझबेकिस्तान व ताजिकीस्तान हीं दोन ताजीं सोव्हियट प्रजासत्ताक राज्यें उदयास आलीं आहेत.

सोव्हियट मध्य-आशियाचा विस्तार कास्पियन समुद्रापासून पामीरपर्यंत आहे. यांत तुर्कमन, उझबेक, ताजीक, किरघीज, आणि कझाक या लोकराज्यांचा समावेश होतो. हा प्रदेश समुद्रापासून फार लांब असल्यानें येथें पाऊस फार थोडा पडतो. बर्फ आणि बर्फाच्या पाण्यानें वाहणारे ओढेनाले यांवरच तेथील जनतेला विसंबून रहावें लागतें. हे प्रवाह दक्षिणेकडील डोंगरांतून निघालेले आहेत.

झारशाहींत मध्य-आशियाला मुळींच महत्त्व नव्हतें. येथील पैदास कुचकामाची म्हणजे प्राथमिक गरजा भागविण्याच्या योग्यतेची गणली जात होती. भटक्या जातीच्या लोकांनीं डोंगर-पठारांच्या ओसाडींत आपलीं गुरेंढोरें चारून काळ कंठावा, असा हा मुलुख तेव्हां होता. येथें नाहीं म्हणायला कापूस पिके व तो तेथून २००० मैलांवरच्या मॉस्को व इव्हानोव्हो या शहरच्या गिरण्यांकरितां पाठविला जाई. हीच काय ती या मुलुखाची एक सांगण्याजोगी गोष्ट होती. झारशाहीमध्यें हिंदुस्थान, चीन, ईराण या देशांकडे जाणाऱ्या रस्त्यांतला हा मुलूख होता व

एवढ्यापुरतीच त्याची ओळख ठेवली जात होती. येथें कापूस पिकविण्यासाठीं जाऊन राहिलेल्या लोकांना भरपूर पैसा मिळे म्हणून पैशाचीं लोभी माणसें येथें नशीब काढायला जात असत. मात्र स्थानिक जनतेची कोणीच कधीं विचारपूस करीत नसे. १४ व्या शतकांत तैमूरलंगानें समरकंद येथें आपलें ठाण मांडलें, तेव्हां या जनतेची जी स्थिति होती तीच पुढेंही तशीच चालू राहिली. या ओसाडींतून सांडणीस्वार तुर्कमनांच्या टोळ्या लढाई व लूट करण्यासाठीं मोठ्या उत्सुकतेनें बाहेर पडत. गवताळ मैदानें व उंचवटे यांवर किरघीझ व कझाक जमाती रहातात. या जमातीचे लोक उंचींत ठेंगणें पण आडव्या मजबूत बांध्याचे व घोड्यावर बसण्यांत वाकब आहेत. कापसाच्या लागवड केल्या जाणाऱ्या भागांत उझबेकांचीं चिखलानें उभारलेलीं घरें असून यांच्या बायका पडदपोषी पाळणाऱ्या होत्या. अफगाण सरहद्दीनजीक दाढीवाल्या ताजीकांची वस्ती आहे. ताजीक लोक अत्यंत निष्ठाशील मुसलमान आहेत. मध्य-आशियाच्या वस्तीमधील मोठी संख्या मुसलमानांची आहे. १९३९ सालीं शिरगणती केली तेव्हां याची संख्या १ कोट ३० लाखाइतकी भरली.

•

झारशाहीच्या रशियाला ‘ राष्ट्रांचा कैदखाना ’ असें नांव लेनिननें दिलें होतें. राजकीय व्यवहारांत फक्त रशियन भाषेलाच मान होता. रशियन नसलेल्या जाती-जमातींची संस्कृति व भाषा नष्ट करण्याच्या दिशेनें तेव्हां प्रयत्न केला जात होता. अल्पसंख्य लोकांसाठीं जीं पुस्तकें त्यांच्या भाषेंत छापलीं जात व शाळा चालविल्या जात त्यांचें स्वरूप निर्भेळ धार्मिक थाटाचें असे; सर्वांना जुलूम-जबरदस्तीनें रशियन करून सोडावयाचें असा झारशाहीचा कडवा बाणा होता. “ एक झार, एक भाषा ” हें तेव्हांचें ब्रीदवाक्य होतें.

आर्थिक बाजूनें पहाणाराला हें चित्र वरील नमुन्याचेंच दिसलें असतें. छोट्या लोकसंख्येच्या राष्ट्रांचा मुलूख नेहमीं मागासलेला रहावा, त्याशिवाय हीं राष्ट्रें रशियाच्या आर्थिक व राजकीय ताबेदारींत रहाणार नाहींत, असा झारशाहीचा समज होता. या निरनिराळ्या जाती-जमातीमध्यें कुरापती निघून भांडणें माजावीं म्हणून झारशाही त्यांच्या आपसांतील कुरापतींना फूस देण्याला कचरत नव्हती, परंतु फूट पाडून हुकूमत गाजविण्याचा झारशाहीचा हा खटाटोप साहजीकच लोकांना कमालीचा अप्रिय झालेला होता.

झारशाहीनें चिकाटीनें चालविलेल्या रूसीकरणाच्या ( Russification ) उद्योगामुळें लोकांत माजलेला उद्वेग किती चिवट व जोरदार होता, याकडे लेनिन व त्याचे सहकारी यांनीं डोळेझांक केली नाहीं. बोल्शेव्हिकांनीं आपल्या राज्य-संघांत अंतर्भूत झालेल्या छोट्या छोट्या राष्ट्रांना संस्कृतिविषयक स्वातंत्र्य बहाल करावें, त्याचप्रमाणें कोणचें राष्ट्र किती लहान आहे याचा विचार न बाळगतां लहानांत लहान राष्ट्रालाहि स्वयंनिर्णयाचा हक्क द्यावा, असा लेनिनचा अट्टाहास होता. रशियांत क्रान्ति सुरू झाली तेव्हां अशा छोट्या राष्ट्रांनीं खुल्या दिलानें क्रान्तीला मदत केली, हा लेनिनच्या अट्टाहासाचा परिणाम ध्यानांत बाळगण्या-जोगा आहे.

छोट्या राष्ट्रांचा प्रश्न सोडविण्याची कामगिरी स्टालीनकडे दिली होती; कारण तो जॉर्जिया नामक अशाच छोट्या राष्ट्राचा रहिवासी होता. तार्तर बश्कीर लोकराज्य स्थापण्याच्या फर्मानावर स्टालीननें १९१८ च्या मार्चमध्यें सही केली यावरून हा प्रश्न निकालांत काढण्याचें काम क्रांतीच्या पुढाऱ्यांनीं किती लवकर हातीं घेतलें होतें याचा बोध होईल. हें मुसलमानांचें पहिलें सोव्हियट राज्य. बुखाऱ्याची अमीरशाही १९२० मध्यें उलथून पडली. बुखाऱ्याचा अमीर आपला शंभर बायकांचा जंगी जनाना टाकून पळाला. सोन्याच्या रूबल्सचीं साडेपांच कोटीइतकी रकम ब्रिटिश बँकेंतून मिळवून देणारें एक हुंडीचें पत्र घेण्याला मात्र तो राज-धानींतून पळून जातांना विसरला नाहीं. त्याच्यामागून त्याचे अंमलदार, मुल्ला, व्यापारी, आणि त्याचे बरेचसे तरुण मुलगे यांनींही पळ काढला.

समरकंद, दुशांबे, बुखारा–या नांवाशीं अद्भुतरम्य ऐतिहासिक घटनांचा संबंध आहे. शिकंदर, चंगीझखान, तैमूरलंग यांसारखे पुरुष या शहराचे दिलखुष घुमट, रोषनाई व बागबगीचे यांच्या कीर्तीनें तिकडे ओढले गेले होते.

एकंदरीनें बोलायचें तर हा प्रदेश उन्नतीच्या अगदीं प्रथमावस्थेंत होते असेंच म्हणावें लागेल. पूर्वी कुठेंतरी चुकून संस्कृतीचीं कांहीं चिन्हें दिसत असत. माणसाच्या कल्पकतेची व चिकाटीची ओळख पटविणारा शेतीचा पट्टा डोंगरांच्या अवघड उतरणीवर दिसला म्हणजे संस्कृतीची झुळूक तेथें लागल्याचें भान येत असे. पण ही प्राथमिक अवस्था तेथें शतकानुशतकें कायम राहिली. बाकीच्या जगापासून दूर पडलेल्या, झारशाहीनें गांजलेल्या व स्थानिक राज्यकर्त्यांनीं नागविलेल्या अशा लोकांना पूर्ण अज्ञानांत इतके दिवस रहावें लागलें यांत आश्चर्य कसलें ?

पण आज मध्य-आशियांत परिवर्तनाचा आवेश संचरला आहे. पूर्वेकडील आळसाची एकसुरी अनादि गुणगुण सध्यां बंद पडली असून त्याऐवजीं गिरण्यांच्या शिट्यांचा आवाज व मालाच्या वाहतुकीचा गोंगाट तेथें ऐकूं येतो. पडदा पाळणाऱ्या स्त्रियांच्या 'परंजा' ऐवजीं आतां त्यांच्यामध्यें केस कापण्याची तऱ्हा हळूहळू शिरत असल्याचें दिसतें. इतके दिवस या मुलखांत खंदकामध्यें रुतून पडलेली जुनाट सरंजामशाही चालू होती. तिचा आतां अर्वाचीन सुधारलेल्या रहाणीच्या स्वीकारानें धुव्वा उडत आहे. या मुलखांत जिकडे तिकडे लहान मोठे कारखाने गजबजलेले दिसतात. विजेच्या शक्तीचा व्यवहार सुरू झाला आहे. सामुदायिक शेतें, शास्त्रीय संशोधन व प्रयोग, ग्रंथालयें, चित्रपट, कामगारांचे क्लब, आणि लोकांचीं नाटकगृहें, वगैरेंचा सुळसुळाट झालेला सध्यां तेथें दृष्टीस पडतो.

पंचवीस वर्षांचा सोव्हियट राजवटीनें या मुलखांतील लोकराज्यामध्यें विलक्षण फेरफार घडवून आणले आहेत. मागील झारशाहीच्या मागासलेल्या या वसाहतीमध्यें आतां मोठालीं औद्योगिक केंद्रें स्थापन झालीं असून शेतीची प्रगतीहि सुरू झाली आहे. भाषा, कला, लोकसाहित्य यांचें संगोपन केलें जात आहे. क्रान्तीच्या आधीं या प्रदेशांत भटक्या लोकांच्या टोळ्या रहात होत्या. त्यांची संपत्ति पाहिली असती तर जनावरांशिवाय दुसरी कांहींच नव्हती. उंट, घोडे, शेळ्या व मेंढ्या अशीं जनावरें हेंच काय तें त्यांचें सर्व धन होतें. त्यांच्यांतला कोणी एखादा क्वचित् शहरांतल्या रहाणीमुळें सभ्यपणाचे व शिक्षणाचे थोडे संस्कार झालेला चुकून दिसला तर दिसला; बाकीचे सगळे पूर्णपणें अक्षरशत्रु होते. आज तेथें निराळाच देखावा उत्पन्न झालेला आहे. हल्लीं तेथें साक्षरता व शाळांची संख्या वाढली आहे. सामाजिक संस्था निघाल्या आहेत. संस्कृतीच्या दिशेनें तेथील प्रजेनें बरीच प्रगति गांठली आहे. जुन्या रहाणीचीं पाळेंमुळें सोव्हियट ध्येयांच्या पुरस्कारामुळें खणून निघत आहेत व पुराणमताभिमानाचा झपाट्यानें ऱ्हास होत आहे. या लोकांना आपलें वाङ्मय १९४० च्या कायद्याप्रमाणें रशियन लिपीमध्यें लिहावें लागतें. तेथील स्त्री-जीवनांतही स्थित्यंतर घडलें आहे. स्त्रियांनीं पडद्याचा प्रघात सोडून द्यावा म्हणून त्यांस उत्तेजन मिळतें. देशांत चाललेल्या कोणत्याही कामांत त्यांचा प्रवेश निर्विघ्नपणें होऊं शकतो. सार्वजनिक मताच्या कोणत्याही पक्षांत सामील होण्याला त्यांना

परवानगी आहे. पुरुषांच्या बरोबरीनें त्या म्युनिसिपालिट्या व इतर सार्वजनिक कामांत भाग घेतात. "एखाद्या मुसलमानाला कधीं कांहीं अडचण उपस्थित होऊन कोणाचा सल्ला घ्यावा असा प्रश्न पडला तर प्रथम त्यानें आपल्या बापाशीं विचारविनिमय करावा; तो नसेल तर वडील भाऊ, चुलता किंवा शेजारी यापैकीं कोणाचाही सल्ला घ्यावा; असा जर कोणीच न मिळाला तर बायकोशीं वाटाघाट करावी आणि तिचा जो अभिप्राय असेल त्याच्या नेमकें उलट वागावें" अशी एक उझबेक जातींतील म्हण होती. तिच्यावरून स्त्रियांबद्दलची त्या जातीची समजूत कळण्याला उशीर लागत नाहीं. स्त्रिया म्हणजे केवळ पायपोसाच्या योग्यतेच्या असें एक मध्य-आशियांतील लोकव्यवहाराचें महत्त्वाचें पवित्र असें कलमच होतें.

जुन्या झारशाहीच्या टोकाकडील सरहद्द प्रांतांमधील जनतेमध्यें किती जागृति झाली आहे याची कल्पना तिकडील राष्ट्रीय लोकराज्याचें एखादें उदाहरण सांगितल्यानेंच येईल. उझबेकीस्तानांत स्थापन झालेल्या प्रचंड गिरण्या हें तेथील औद्योगिक उन्नतीचें एक गमक म्हणतां येईल. कझाकस्तानांतील लोखंडाखेरीज इतर धातूंचे उद्योगधंदे हा त्या उन्नतीचा दुसरा दाखला आहे. डब्यांतून मांस भरणें, तसेंच मासे, फळें यांचीहि व्यापारासाठीं व्यवस्था करणें, तंबाखू, साखर व इतर अन्नांचे कारखाने, अशा तऱ्हेचे उद्योगधंदे उझबेकीस्तान, तुर्कमानीस्तान, ताजिकीस्तान, या लोकराज्यांतून भरभराटले आहेत. मध्यआशियांत पूर्वी तेलाच्या खाणी होत्या, त्यांच्या जोडीला फरघाना व बुखारा येथें तेलाच्या नवीन खाणी सुरू केल्या आहेत. ह्या नव्या व पूर्वीच्या मिळून एकंदर खाणींतून सध्यां दरवर्षी १२ लाख टन अशुद्ध तेल काढले जातें. कारागांडा या नांवाचें शहर १९२६ सालापूर्वी मुळींच अस्तित्वांत नव्हतें. पुढें तें शहर वसलें व १९३९ सालीं त्या शहराची वस्ती १ लाख ६६ हेजार इतकी वाढली. कोळशाच्या खाणीनिमित्त हें शहर उदयास आलें असून दरसाल तेथील खाणींतून ७० लाख टनाइतका कोळसा निघतो.

या सगळ्या लोकराज्यांत विजेचे कारखाने आहेत. पूर्वीच्या शेतकीऐवजीं सामुदायिक शेतांचा व्यवहार सुरू झाला आहे. ज्या जमाती जनावरें पाळण्याचा धंदा करून इकडे तिकडे भटकत असत, त्यांची संघटना करून व त्यांचा भटकेपणा घालवून उत्तम प्रकारचीं जनावरें मोठ्या प्रमाणांत पैदा करण्याचा व्यवसाय

त्यांच्यामागें लावून दिला गेला आहे. पण एवढ्यावरच त्यांची प्रगति थांबलेली नाहीं. या जमाती आतां शेतीकडेहि वळल्या आहेत. गहूं व इतर धान्यें पिकविण्याचा उद्योग त्यांनीं चालविला आहे. १९३४–४० या कालांत पाणीपुरवठ्याची योजना मूर्तस्वरूपांत आल्यामुळें लागवडीखालीं पूर्वीच्या मानानें तिप्पट जमीन आली आहे. वक्शा नदीच्या खोऱ्यांत किती तरी हजार हेक्टार जमिनीला इजिप्तमधील कापूस पिकविण्यासाठीं पाणी पुरविलें जातें. सोव्हियट मध्य-आशिया हा प्रदेश सोव्हियट राज्याचा कापसाच्या बाबतींत मुख्य आधारच होऊन बसला आहे.

आगगाड्यांचे रस्ते बांधल्यामुळें हीं सगळीं राष्ट्रीय भिन्न लोकराज्यें एकमेकांला जवळचीं झालीं असून सोव्हियट राज्यसंघाच्या मध्यवर्ती केंद्राला जोडलीं गेलीं आहेत. किरघिझिया व ताजीकीस्तान या मुलखांत आगगाड्या नाहींत, पण त्यांची उणीव नवे रस्ते बांधून आणि विमानांची वहातूक सुरू करून भरून काढली गेली आहे. पंचवार्षिक योजनेचें अंग म्हणून हे रस्ते जेव्हां बांधले जाऊं लागले तेव्हां इंजिनियर लोकांनीं अनेक आश्चर्य वाटण्यासारखीं कार्यें केलीं. रस्ते बांधण्याचें काम सामुदायिक शेतकऱ्यांनीं पार पाडलें. त्यांच्यांत त्यावेळीं जो अपार उत्साह संचारला होता, ह्याचा फायदा इंजिनियर लोकांना मिळाला व तोंडांत बोट घालावयास लावणारी कामगिरी त्यांनीं बजावली. पामीरच्या डोंगराळ टापूंतला रस्ता ही अशांतलीच एक कामगिरी आहे. एका ठिकाणीं हा रस्ता ११००० फूट उंचीच्या खिंडींतून नेला आहे. या रस्त्याची एकंदर लांबी ६०० मैल आहे.

लोकांच्या संस्कृतीचा दर्जा चांगलाच वाढल्याशिवाय शेतकीचें व कारखानदारीचें उच्च शास्त्रीय तंत्र उपयोगास येत नाहीं. ज्या अर्थी या लहान संख्येच्या जमातींनीं हें तंत्र आत्मसात् केल्याचें दिसतें त्या अर्थी त्यांनीं शिक्षणांत किती प्रगति केली आहे याविषयीं निराळें विवेचन करण्याची जरूरी नाहीं. शेंकडा ८० माणसें आज तेथें साक्षर आहेत. किरघिजच्या राज्यांत उच्च शिक्षणाच्या तीन संस्था निघालेल्या असून त्यांबद्दल त्या राज्याला मोठी धन्यता वाटते. तुर्कमनीस्तान व ताजीकीस्तान या प्रत्येकांत अशा चार संस्था आहेत. कझाकस्तान व उझबेकीस्तान यांमध्यें अनुक्रमें १२ व २६ इतक्या उच्च शिक्षणाच्या संस्था आहेत. नाट्यगृहें, चित्रपटगृहें ग्रंथालयें, व क्लब यांच्या संबंधांतही असाच प्रकार आढळतो.

सोव्हियट मध्य-आशियांतील क्रान्तीचें चित्र पुढील लोकगीताच्या मजकुरांत उत्कृष्ट रीतीनें रेखाटलें गेलें आहे :—

"खलीमा नांवाची स्त्री होती. निळ्या व जांभळ्या आकाशांत वादळ उठून विजा कडकडूं लागल्या कीं ती निवाऱ्याच्या जागेकडे पळून जाई, ती रडूं लागे, डोळे घट्ट मिटून धरी, झाडावरील पालवीप्रमाणें तिचें शरीर थरथरूं लागे.

"आजची खलीमा त्या वेळेसारखी उरलेली नाहीं! ती सज्ञान झाली आहे. निसर्ग तिचा आज्ञाधारक गुलाम बनला आहे. ती रेडियोच्या दांड्यांशीं कांहीं तरी करीत असते–आपल्या चपळ हातांनीं तिनें एक रेडिओ बसविला आहे– आणि एक तुरसुन होता—

"ज्या दिवशीं ट्रॅक्टर खणखणाट करीत आला, त्याच दिवशीं जुन्या लांकडी नांगराचें भाग्य संपलें व तुरसुनच्या डोक्यांत पूर्वी कधींही माहीत नसलेलें संगीत सुरू झालें. पूर्वी अर्धवट झोपेमध्यें ठरलेल्या पायवाटांनीं हिंडणारा उंट व गाढव हाच काय तो त्याच्या ज्ञानाचा विषय होता.

"पण आज कार्यक्षमतेच्या तुफानांत मोटारी, ट्रॅक्टर, विमानें यांच्या गर्दीनें होत असलेल्या येरझारा त्याला दिसत आहेत."

सोव्हियट राज्यघटनेप्रमाणें मध्य-आशियाचा प्रदेश पांच पूर्ण स्वायत्त लोक-राज्यामध्यें विभागला गेला आहे. परंतु या स्वायत्ततेचा अर्थ असा नव्हे कीं एखाद्या स्वतंत्र राज्यानुसार या लोकराज्यांना सर्व बाबतींत स्वच्छंदपणें वागण्याची मुभा आहे. परराष्ट्रीय संबंध आणि परदेशाचा व्यापार हीं दोन प्रकरणें मध्यवर्ती सरकारनें आपल्याकडे राखून ठेवलेलीं आहेत. सोव्हियट राज्यसंघाच्या घटकांना या दोन बाबतींत कसलाच अधिकार ठेवलेला नाहीं.

जवाहरलाल नेहरूंच्या शब्दांत बोलायचें म्हणजे :—"प्रत्येक ठिकाणीं जी स्वायत्तता दिली आहे ती प्रत्येक राष्ट्रानें आपली भाषा व संस्कृति यांची भरपूर जोपासना करावी म्हणून दिलेली आहे. या कार्याप्रीत्यर्थ शक्य तेवढी जास्तींत जास्त स्वतंत्रता तेथील जनतेला आहे. कोणत्याही एका राष्ट्राला किंवा मनुष्य-वंशाला दुसऱ्यावर शिरजोरी गाजवायला सांपडूं नये अशी व्यवस्था साधण्याचा हा प्रयत्न आहे. छोट्या संख्येच्या राष्ट्रांचा हा प्रश्न आपल्या दृष्टीनेंहि महत्त्वाचा आहे. कारण आपल्यावरहि हा अवघड प्रश्न सोडविण्याची जबाबदारी आहेच. या प्रश्ना-वर रशियानें काढलेली तोड चांगलीच यशस्वी झाली आहे."

या ट्रोलेजंग संघाचा घटक होण्यापासून पदरांत पडणारे फायदे अगदीं उघड आहेत. सगळ्या घटकांच्या साधनसंपत्ति व शक्ती एकत्र आणून तिचा उपयोग संघाकडून केला जातो. घटकांच्या द्वारें मध्यवर्ती खजिन्यांत मोठाल्या रकमांची भर पडते व प्रचंड खर्चाच्या योजना अंमलांत आल्या तरी पैशाची वाण पडत नाहीं. ऐन संकटाच्या वेळींसुद्धां हें द्रव्य कारणीं लागून पैसा कोठून आणावा ही विवंचना भासत नाहीं. आणखी एक फायदा म्हणजे जगाच्या एकषष्ठांश प्रदेशांत जकातीच्या अडथळ्याशिवाय मालाची नेआण सहज करतां येते हा होय.

आर्थिक दृष्ट्या हीं सर्व लोकराज्यें एकमेकांवर अवलंबून रहातात. ज्या प्रदेशांत जी साधनसंपत्ति असेल तिचाचा शक्य तेवढा विकास करावयाचा व त्या साधन-संपत्तीबाहेरच्या उद्योगधंद्यांच्या भानगडींत पडायचें नाहीं, या धोरणामुळें सर्व राज्यांना एकमेकांचा आधार घ्यावा लागतो. या धोरणामुळें आपापल्या साधनसंपत्तीचा कितीहि उत्कर्ष झाला तरी कुणालाच स्वयंपूर्ण होतां येत नाहीं. परस्परावलंबनाचे लागेबांधे उत्पन्न होऊन हीं सर्व राज्यें एकमेकांशीं घट्ट बांधलीं गेलीं आहेत.

'पूर्वी वरिष्ठ, कनिष्ठ, आपला, परका, अग्रज, अंत्यज, आपल्या धर्मातला व आपल्या धर्माबाहेरचा, अशी जनतेमध्यें सर्वत्र जी वर्गवारी रूढ होती, तिचा आतां नायनाट झाला आहे. दोन समाजांचें दळणवळण, दोन समाजांचा विवाह-व्यवहार असल्या गोष्टी सरसहा चालू असून भिन्न जातींच्या रक्ताचें मिश्रण बेधडक सपाट्यानें होत आहे. धर्माच्या व जातीच्या भिंती धडाधड कोसळून पडत आहेत; एकमेकांबद्दलचा आदर वाढत आहे. शिक्षणाच्या प्रसारानें समतेच्या तत्त्वाचा फैलाव होत आहे. रेडियो व छापखानें यांच्या सामर्थ्यानें जातीजातींच्या विषमतेचे खंदक भरून जात असून उचनीचतेचा तट जमीनदोस्त होत आहे. आगगाड्या आणि विमानें यांच्या योगानें एकमेकांबद्दलची सद्भावना व समंजसता यांचे पाश बळकट केले जात असून ते पाश या सर्वांना जखडून टाकीत आहेत. एकमेकांचा सलोखा व मिलाफ घडवून आणण्याची क्रिया मोठ्या वेगानें सुरू आहे.

रशियांत एकूण १९० निरनिराळ्या जाती आहेत. परंतु वरच्यासारख्या कारणांमुळें त्यांची एकजूट जास्त बळावत आहे. त्यांच्यांत एकाच स्फूर्तीची जाणीव आढळते—समाजसत्तावादाची उभारणी ही एकच भावना त्यांच्या स्फूर्तीचा व उत्साहाचा झरा आहे.

आपल्याकडे मानवजातीचें श्रेष्ठत्व घेऊन व आपल्या राष्ट्राच्या रक्षणाचें महत्त्व डोळ्यांपुढें ठेवून जगाचा नकाशा नव्यानें तयार करणाऱ्या कावेबाज देशभक्तांच्या व नकली मुत्सद्द्यांच्या नीच आणि खोडसाळ नादानपणाची हजेरी घेऊन छोट्या लोकसंख्येच्या राष्ट्रांबद्दल लिहितांना एच्. जी. वेल्स यांनीं पुढील अभिप्राय व्यक्त केला आहे :–" छोट्या लोकसंख्येच्या राष्ट्रांचा बिकट प्रश्न रशियामध्यें समाधान-कारक रीतीनें कायमचा सोडविला ही स्टालीनची फार मोठी कामगिरी आहे, असें अंतिम निर्णयाच्या वेळीं इतिहासाला निस्संशय कबूल करावें लागेल. मुसलमान, काफर, ईश्वरवादी व पक्का नास्तिक असे सर्वजण एकमेकांबद्दल कसलाच किंतु मनांत न बाळगतां खांद्याशीं खांदा भिडवून आज एकजुटीनें लढत आहेत. " ही खरोखरीच फार मोठी कामगिरी आहे.

# १४

# लाल फौज

" शेतकरी व कामकरी वर्गाच्या फौजेचा जनतेशीं निकट संबंध पाहिजे. छावणीमध्यें मिळणाऱ्या अल्पकाळांतील युद्धकलेच्या शिक्षणाबरोबर राजकीय शिक्षणही मिळालें पाहिजे. "

—लेनिन

सोव्हियट जनतेला लढाईचा प्रसंग क्रांतीच्या सुरवातीपासूनचा आहे. सुरवातीला त्यांना जर्मन व झारच्या सैन्याविरुद्ध लढावें लागलें. अमेरिकन, इंग्रज पोलीश, आणि जपानी सैन्याच्या लाल फौजेशीं झालेल्या चकमकी बहुश्रुतच आहेत. पाश्चिमात्य राष्ट्रें आपल्यावर केव्हांतरी अचानक हल्ला करणार ही अपेक्षा सोव्हियटला कायमचीच आहे. म्हणूनच शांतीच्या काळांतसुद्धां सोव्हियट जनतेनें बरेच हाल सोसून युद्धाची तयारी झपाट्यानें चालविली होती.

Soviet Home Guard—किंवा आत्मरक्षणाची संस्था सोव्हियट सरकाराइतकीच जुनी आहे. १९२१ ते १९४० पर्यंत दररोज संध्याकाळीं प्रत्येक सोव्हियट कारखान्यांतून बंदुक खांद्यावर टाकून चाललेले कामगार नेहमीं दिसत. ह्या कामगारांना शहराच्या आसपास लष्करी शिक्षण देण्यांत येत असे. कामगार व शेतकरी ह्यांनींच सोव्हियटची स्थापना केली. म्हणून त्यांचें संरक्षण करणें हा त्यांच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग होता. प्रत्येक कारखान्यासमोर कामगार आळीपाळीनें सतत संगिनीचा पहारा करतात, ही नमूद करण्यासारखी गोष्ट आहे.

२२ जून १९४१ सालीं जेव्हां जर्मनीनें सोव्हियटवर हल्ला केला, तेव्हां काळोख (Blackout) आणि (A. R. P.) विमानधाडींतून वांचण्याचे धडे जनतेला देण्याची जरूरी नव्हती. " ओसोव्हिआशिम " नांवाच्या सोव्हियट संस्थेनें एकंदर

जनतेला हवाई हल्ल्यांपासून आपलें रक्षण कसें करावें ह्याचे धडे बरींच वर्षे दिलेले होते. १९३५ सालीं मी लेनिनग्राडमध्यें असतांना माझ्या खोलीच्या कांचेच्या खिडक्यांवर उभे-आडवे कागदाचे तुकडे लावलेले होते. माझ्या घरांतील मुलें शाळेंत जातांना ( gas mask ) गॅस मास्क आपल्याबरोबर सतत नेत व त्यांना हवाई हल्ल्यांपासून आपलें संरक्षण कसें करावें ह्याचे धडे शाळेंत मिळत. क्रायमिया प्रदेशाच्या किनाऱ्यावरील भागांत १९२९ सालांपासून ( practice blackouts ) काळोखाचे प्रयोग करण्यांत येत. इतकेंच नव्हे तर सोव्हियट जनतेला युद्धाचा अनुभव एक ना दुसऱ्या स्वरूपांत दररोज मिळे. अन्न व कपड्यांचें रेशन सोव्हियट रशियांत बरेंच होतें. " सदा सिद्ध असा " हें सोव्हियट बालकांचें सुभाषित आहे. लाल फौजेकडे बंधुत्वानें पहाण्याचें शिक्षण लहानपणापासूनच मुलांस देण्यांत येतें. " एक कामगाराचें दुसऱ्या कामगारांशीं नातें काय ?—बंधुत्वाचें. कामगार बंधु कोणाचा ?—लाल फौजेचा. " अशा तऱ्हेचे धडे लहान मुलांच्या पुस्तकांत असतात.

लाल फौजेची संख्या फार मोठी आहे. परंतु केवळ संख्या ही कांहीं आधुनिक युद्धांत महत्त्वाची बाब ठरत नाहीं. मागील युद्धांत एक कोट चाळीस लक्ष रशियन सैन्य लढत होतें व रशियन म्हणीप्रमाणें "सैनिकांनीं नुसत्या आपल्या टोप्या फेकून शत्रूचा पराभव केला असता " परंतु तसें झालें नाहीं. उलट लेनिनच्या शब्दांत म्हणावयाचें म्हणजे " जणूं काय लढाईंत पळ काढून लाखों शिपायांनीं आपल्या लाथांनीं युद्धविरोधी मत दिलें. " रशियन शिपायांचा ह्यांत कांहीं दोष नव्हता. कारण त्यांचे पुढारी, शस्त्रास्त्रें, दारूगोळा व वहातुकीचीं साधनें अपुरीं असून पुनः तीं सर्वच खालच्या दर्जाचीं होतीं.

सोव्हियट सरकारनें आपल्या फौजेची संख्या बरीच वाढविली आहे. पण त्याबरोबर इतरही गोष्टींकडे कसून लक्ष दिलें आहे. सोव्हियटमध्यें जसें प्रत्येकास काम करावें लागतें तसेंच राष्ट्राच्या संरक्षणांत दरेक इसमाला भाग घ्यावा लागतो. एकोणीस वर्षांवरील प्रत्येक सुदृढ पुरुषास लढाईचें शिक्षण सक्तीनें घ्यावें लागतें. सोव्हियट जनसमूहाची बहुसंख्या जी खेड्यांतून रहाते तीस दोन वर्षें पायदळाचें शिक्षण दिलें जातें. कोसॅक व कॉकेशसच्या पहाडी लोकांना घोडदळाचें युद्धशिक्षण तीन वर्षें देण्यांत येतें. यांत्रिक कामें करणारांस तीन वर्षें गोलंदाजी व वैमानिक शिक्षण घ्यावें लागतें. समुद्रावरील लढाईचें काम पांच वर्षें

शिकावें लागतें व तें मुख्यत्वें कोळ्यांस दिलें जातें. साधारणपणें सहा लक्ष सोव्हियट तरुणांना दरवर्षी युद्धाचें शिक्षण सक्तीनें मिळतें.

ह्या सक्तीच्या शिक्षणाखेरीज निरनिराळ्या स्वरूपाचें लष्करी शिक्षण प्रत्येक सोव्हियट संस्थेंतून सदासर्वदा चालूच असतें. प्रत्येक शेतकऱ्यांस व कामगारास बंदुकीचा उपयोग कसा करावा हें नियमानें शिकविण्यांत येतें. ह्या शिक्षणांत कौशल्य व हुरूप दाखविणाऱ्या माणसांस "कामास व युद्धास सिद्ध" ह्या नांवाचीं पदकें मिळतात. हें पदक मिळविण्यासाठीं पोहणें, धावणें, नकाशा वाचणें, अचूक नेम मारणें वगैरे गोष्टी चांगल्याच याव्या लागतात. हीं पदकें धारण करणारे साधे कामगार व शेतकरी दहा लक्षांवर आहेत. बंदुकीचें शिक्षण स्त्रियांनासुद्धां देण्यांत येतें व त्या पुरुषांइतकेंच प्रावीण्य अचूक नेम मारण्यांत दाखवितात. रणांगणावरील सुश्रूषेचें काम, पूल बांधणें, रक्षण करणें, तोफा चालविणें, टेलिफोनचा उपयोग वगैरे कामें बऱ्याच सोव्हियट स्त्रिया आपल्या देशाच्या संरक्षणासाठीं तत्परतेनें शिकतात. ह्यावरून सोव्हियट पुढारी "आमची फौज म्हणजे सोव्हियट जनता" असें कां म्हणतात, तें ध्यानांत येईल. मनुष्य-प्राणीच नव्हे तर जनावरेंसुद्धां सोव्हियट सरकारच्या संरक्षणाच्या कार्यांत ओढलेलीं आहेत. प्रत्येक घोडा, कुत्रा इतकेंच नाहींतर कबुतर युद्धाच्या उपयोगासाठीं तयार केलें जातें.

सामान्य सोव्हियट इसमास लष्करी शिक्षणाचें ज्ञान व्हावें म्हणून सुलभ भाषेंत पुस्तकें, मासिकें व वर्तमानपत्रें केवळ युद्धशास्त्रावर प्रसिद्ध होतात. स्त्रियांनीं रणांगणावरील लढाईच्या कामाचें शिक्षण घेण्याची सक्ती अशी नाहीं; परंतु बऱ्याच स्त्रिया युद्धाचें शिक्षण घेतात व त्यांत चांगलेंच प्रावीण्य मिळवितात, ह्याबद्दल जर कोणास शंका असेल तर १२ जानेवारी १९४३ सालीं मॉस्कोंतील वर्तमानपत्रांत आलेला मजकूर ती दूर करील. "आज मेजर मरीना राष्कोवा, नांवाच्या वैमा-निक स्त्रीची राख लाल चौकांतील लेनिनच्या समाधीजवळ लष्करी थाटानें पुरण्यांत आली. लढाई सुरू झाल्यानंतरची सरकारी रीत्या झालेली ही पहिलीच स्मशानयात्रा होय. मेजर राष्कोवा लाल वैमानिकांना उच्च प्रकारचें उड्डाणाचें शिक्षण देत असे. रणांगणावर हवेंत जर्मनांशीं लढा करीत असतां ती ठार झाली व तिच्या शवाचें सन्मानपूर्वक दफन होण्यासाठीं तें मॉस्कोस आणलें."

बऱ्याच युवकांना व युवतींना युद्धाचें प्राथमिक शिक्षण शाळेंतच दिलें जात असतें. हल्लींची लढाई सुरू होईपर्यंत हें शिक्षण मुख्यत्वें करून पुस्तकी असे व तें दुय्यम वर्गाच्या शाळांतून सक्तीनें दिलें जात असे. लहान मुलांना लष्करी खेळ, व्यायाम व शिस्त शिकविली जाते. पांचव्या, सहाव्या व सातव्या वर्गांतील मुलांस प्राथमिक लष्करी शिक्षण मिळतें. वरील वर्गांतील मुलांस युद्धशास्त्राचा व आधुनिक शस्त्रांस्त्रांचा अभ्यास करावा लागतो; त्याचप्रमाणें बंदुकीचे व संगिनीचे प्रयोग करावे लागतात. इतर विषयांप्रमाणें लष्करी विषयांची परीक्षा होते व त्यांत चांगले मार्क मिळाले नाहींत तर वरच्या वर्गांत जातां येत नाहीं. मुलींनाही नर्सिंग, वायरलेस वगैरे कामाचें शिक्षण घ्यावें लागतें. उन्हाळ्यांत सर्व मुलांना दोन महिने छावणीमध्यें रहावें लागतें.—कुठल्याही राष्ट्राचें सैन्य आप-आपल्या सामाजिक व राजकीय विचाराला अनुसरून उभारलेलें असतें. लाल फौजेच्या घटनेकडे पाहिलें तर हा मुद्दा चटकन् लक्षांत येईल.

लाल फौजेचे बहुतेक मुख्याधिकारी १९१७ च्या रशियन क्रांतीच्या बाजूनें लढले होते. सुरवातीपासूनच लाल फौजेचा भरणा श्रमवर्गी लोकांचा होता. सोव्हियटचा आजचा मुख्य सेनापति म्हणजे स्टालीन हा चांभाराचा मुलगा असून त्यानें क्रांतीच्या काळीं एका शहराचें संरक्षण केलें. आजकालचें प्रख्यात स्टालिनग्राड हेंच तें शहर होय. मार्शल तिमोशेंको हा शेतकरी वर्गाचा असून त्यानें क्रांतींत भाग घेतला होता. दुसऱ्या सोव्हियट लष्करी पुढाऱ्यांचाही असाच वृत्तांत आहे.

लष्करी पदव्या लेनिननें काढून टाकल्या होत्या. परंतु थोड्याच वर्षांपूर्वी स्टालीननें लष्करी पदव्या पुन्हां सुरू केल्या. परंतु त्यामुळें साधा शिपाई व अधि-कारी ह्यांच्यामधील बंधुत्वाचा संबंध संपला असें मात्र समजूं नये. ते एकमेकांना तवारीश अथवा भाई असें म्हणतात व एकत्र जेवतात आणि फुरसतीच्या वेळीं एकत्र खेळतात. "लष्करी अधिकारी हा वडील भावाप्रमाणें समजावा. तो वरिष्ठ आहे, पण केवळ हुकूम गाजविणारा नव्हे तर मार्गदर्शक व शिक्षक या नात्यानें वरिष्ठ आहे."

"शिस्तीचा अंमल शिपायाच्या समजूतदारपणानें झाला पाहिजे. शिपाई झाला तरी तो मनुष्य आहे, हें विसरून शिस्तीची व मनुष्यत्वाच्या थोरवीची फारखत होतां कामा नये. शिस्त कितीही कडक—नव्हे वाटेल तितकी भयंकर कडक—

असूं द्या, पण तिच्या योगानें कुणाचाहि पाणउतारा होऊं देऊं नये." रशियन लष्कराच्या नीतिग्रंथांतील हे उतारे आहेत.

लाल फौजच्या शिपायाला आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याचा हुकूम प्रत्येक बाबतींत पाळावा लागतो. परंतु ह्याचा उद्देश असा नाहीं कीं, प्रत्येक हुकूम अंधश्रद्धेनें पाळावा. हुकूम पाळण्याचा व्यवहार जाणतेपणानें व्हावा. हुकुमाच्या हेतूंचें ज्ञान, त्यासंबंधांत घ्यावा लागणारा पुढाकार आणि करावा लागणारा संयम इतक्या सर्वांचा समावेश हुकूम पाळण्याच्या शिस्तींत झाला पाहिजे असें लाल सैन्याच्या शिस्तीचें धोरण आहे.

"प्रत्येक लाल फौजेचा शिपाई सुशिक्षित पाहिजे" असा हट्ट सुरवातीपासूनच सोव्हियट सरकारनें धरला होता. लाल फौजेंत शिरल्याबरोबर प्रत्येक शिपायास निरनिराळ्या विषयांचें शिक्षण दिलें जातें. गोलंदाजीच्या शिक्षणाबरोबर त्यांना शेतकीचीं यंत्रें कशीं चालवावीं हें शिकविलें जातें; युद्धाचीं स्फोटक व संहारक द्रव्यें तयार करण्याच्या शिक्षणाबरोबर धातूपासून शेताचें खत बनविण्याचेही धडे मिळतात; पूल कसे तोडावे व तसेच ते कसे बांधावे हें एकाच वेळीं शिकविण्यांत येतें. प्रत्येक शिपायास लष्करी शिक्षणाबरोबर एखादा धंदा निश्चयानें शिकविला जातो. दरवर्षी हजारों इसम लाल फौजेच्या धंदेशिक्षणाच्या शाळांतून मोटरी चालविण्याचें, लोहाराचें, सुताराचें, विजेचें, चित्रकलेचें किंवा अशा अनेक इतर हुन्नर कलांचें शिक्षण संपादन करतात. "डोळ्याच्या बाहुलीप्रमाणें लाल फौजेची काळजी घ्या" असें लेनिन सतत म्हणत असे.

लाल फौजेस संस्कृतीचें माहेरघर असें सोव्हियट रशियांत म्हणतात तें उगीच नाहीं. लाल फौजेच्या बौद्धिक व मानसिक उन्नतीसाठीं ३५० भव्य इमारती देशभर पसरलेल्या आहेत. ह्या इमारतींत बरींच पुस्तकें, चित्रें, मासिकें, तसेंच चित्रपट दाखविण्याची सोय, संगीत व नृत्यासाठीं निराळी जागा वगैरे गोष्टी आढळून येतात. तसेंच आराम घेण्याच्याही जागा व अभ्यासाची सोय मनसोक्त असते.

लाल फौजेसाठीं २००० पुस्तकालयें असून त्यांत दीड कोट ग्रंथ आहेत. लाल फौजेचें दैनिक "लाल तारा" (Red Star) असून त्याला १ लक्ष ५० हजार लष्करांत काम करणारे शिपाई माहिती पुरवितात. लाल फौजेसाठीं ४० नियत-

कालिकें प्रसिद्ध होतात व फौजेंतील शिपाई स्वतःच्यासाठीं निरनिराळ्या छावण्यांतून आपल्यासाठीं भिंतीवरचीं हस्तलिखित वर्तमान पत्रें ( Wall News papers ) काढतात. ह्या वर्तमानपत्रांत छोट्या गोष्टी, कविता, चित्रें, टीका वगैरे प्रसिद्ध होतात. लाल फौजेसाठीं मुद्दाम बांधलेल्या मॉस्कोंतील नाटकगृहांत नाट्यकलेंत विशेष मन घालणारे शिपाई आपण लिहिलेलीं नाटकें स्वतः करून दाखवितात. संगीताचा लाल फौजेस विशेष नाद आहे असें दिसून येतें. लाल फौजेचे शिपाई छावण्यांतून गीतें म्हणतात व रस्त्यांतून कूच करतांना आवेशयुक्त गाणीं गात जातात.

धंदेशिक्षणाबाहेर लाल फौजेस दुसऱ्या कलांत निपुण करण्यासाठीं निरनिराळ्या विषयांवरील छोटेखानी वर्गांत भाग घेतां येतो. ह्या वर्गांतून त्यांना संगीत, वाङ्मय, परकीय भाषा, चित्रकला, भौतिक शास्त्रें वगैरे विषयांचा अभ्यास करतां येतो. म्हणून लाल फौजेच्या शिपायांत चांगले लेखक, चित्रकार, इत्यादि बरेच आढळून येतात. त्यांच्या चित्रांचीं व इतर कलांचीं प्रदर्शनें शहराशहरांतून भरतात.

लाल फौजेंतील इसमांचे सामाजिक हक्क हिरावून घेतले जात नाहींत. त्यांना मताचा अधिकार असून ते सोव्हियटमध्यें निवडूनहि येतात. लाल फौजेला युद्धाचें शिक्षण तर मिळतेंच पण त्याबरोबर त्यांना इतिहास व समाजशास्त्राचा अभ्यास करावा लागतो. लाल फौजेंत १९० जातीचे व निरनिराळ्या वर्णांचे लोक असल्यामुळें त्यांचा दृष्टिकोन इतर फौजांसारखा कोता रहात नाहीं. व त्यांच्यांत जातिभेदाचा किंवा वर्णभेदाचा रोग नसतो.

लाल फौजेचा सैनिक नेहमीं कांहीं ना कांहीं उद्योग करीत असतो. रस्त्यांतून भटकत असलेला किंवा दारू पिऊन फाजील वर्तन करतांना तो तुम्हास कधींही दृष्टीस पडणार नाहीं. शांतीच्या काळांत पांच लक्ष इसम युद्धाचें व त्याबरोबर इतर शिक्षण घेऊन दरवर्षीं आपआपल्या घरीं आपलीं नेहमींचीं कामें करण्यास जातात. ह्यावरून तुमच्या ध्यानांत येईल कीं, अशा लोकांचा फायदा त्यांच्या गांवांतील लोकांस किती मिळत असेल. बाल्टिकपासून ते पॅसिफिकपर्यंतच्या प्रत्येक खेडेगांवांतून तीन ते चार अद्यावत सुसंस्कृत इसम आढळून येतील. सोव्हियटमध्यें सहा लक्ष छोटेखानी गांवें आहेत, हें तुमच्या ध्यानांत असूं द्या.

लाल फौजेचें काम शिकत असतां युवकांना सामान्य ज्ञान, चांगली शिस्त, स्वच्छपणाचे धडे जे मिळतात, त्यांमुळें ते आपआपल्या खेड्यांतून साहजिक पुढारीपण मिळवितात आणि सत्तर हजार खेड्यांतील सोव्हियट संस्थेंत महत्त्वाच्या जागा पटकावतात तसेंच ते सामुदायिक सहकारी पतपेढ्या वगैरेंचे चिटणीस व अध्यक्ष बनतात. अशा तऱ्हेनें त्यांच्या शिक्षणाची छाप खेड्याच्या जीवितावरहि पडते. रशियांतील खेडेगांवांतून अनेक वर्षे चालत आलेला अज्ञानाचा अंधकार हे तरुण लाल फौजेचे विद्यार्थी आज कसा दूर करीत आहेत हें आपणांस स्पष्ट होईल. राष्ट्रीय ऐक्य आणि सामुदायिकतेच्या ध्येयाचें संवर्धन या दोन्ही दृष्टीनें लाल सैनिकांचें खेड्यांतील वास्तव्य अत्यंत उपकारक आहे.

जनता, फौज, कामगार व शेतकरी ह्यांचा संबंध सोव्हियट यूनियनमध्यें अत्यंत निकट असून शांतीच्या काळांत ते एकमेकांस राष्ट्राची संपत्ति व सामर्थ्य वाढविण्यास मदत करतात. तिमोशेंकोसारख्या सेनापतीपासून तों साध्या लाल सैनिकापर्यंत प्रत्येकजण आपणांस जनतेचा एक घटक असेंच समजतो. म्हणूनच आज युद्धाच्या प्रसंगीं जो शेतकरी पूर्वी ट्रॅक्टर चालवीत होता, तो आज रणांगणावर टँक नेतो व शूरपणें लढतो. त्याला त्यांत कांहीं आश्चर्यहि वाटत नाहीं. ट्रॅक्टर व टँक या दोन यंत्रांत फारसा फरक नसल्यामुळें जेथें पूर्वी ट्रॅक्टर बनत होते तेथें आज टँक बनत आहेत.

सध्याचें महायुद्ध सुरू होऊन रशियावर जर्मनीनें कडेकोट तयारीनिशीं चढाई केल्यावर लाल फौजेचा अजिंक्यपणा पाहून सारें जग आश्चर्यांत बुडालें व याबद्दल कौतुक करूं लागलें. ह्या फौजेनें सोव्हियट नागरिकांशीं दाखविलेली शिस्त, कार्यक्षमता, राष्ट्रभक्ति व इतर गुण यांचेंच सर्वांना आश्चर्य व कौतुक वाटलें. कारण सदर गुणांचा सोव्हियट सैन्यांत व नागरिकांत अभाव असला पाहिजे अशीच पूर्वी सर्वांची अडाणी कल्पना होती.

जर्मन सैन्य जून १९४१ सालीं जेव्हां रशियांत घुसलें तेव्हां सोव्हियट सरकारनें जर्मनांच्या हातीं लागण्यासारखें जें पीक किंवा कारखाने होते ते जाळून नष्ट करण्याचा हुकूम दिला. आणि लढाईच्या कक्षेंतील बरीच युद्धसामुग्री व कुशल कारागीर ह्यांना उरल प्रदेशांत नव्या कारखान्यांचें काम सुरू करण्यासाठीं नेलें. कारखानदारीचा उक्रेन प्रदेश जर्मनांनीं जेव्हां काबीज केला तेव्हां बऱ्याच लोकांना

विचार पडला कीं, आतां सोव्हियटला युद्धसामुग्री कुठून पैदा करतां येणार ?– तर सोव्हियटनें जे अनेक नवे उपाय योजले त्यांतील एका उपायाचें मेजर बाल्झर नांवाच्या जर्मन टँक-विरोधी ( anti-tank ) अधिकाऱ्यानें जें वर्णन केलें आहे त्यामध्यें वरील प्रश्नाचें उत्तर सांपडेल. तें वर्णन असें :–" रशिया ज्या टँकचा उपयोग करतो तीं सर्वसाधारणपणें स्वदेशीच असतात. जे टँक आम्ही मोडून टाकतों ते रशियन कामगार जलदीनें पुन्हा दुरुस्त करून रणांगणावर परत पाठवितात." ह्याच्यावरून सोव्हियट कर्तबगारीची कल्पना होईल. सोव्हियट जनता आज किती धिटाईनें व चिकटपणानें काम करीत आहे याचें दुसरें उदाहरण म्हणजे स्टालिनग्राडची पुनर्घटना हें होय. जर्मन सैन्याला स्टालिनग्राडमधून हुसकावून काढतांक्षणींच त्या शहराचा झालेला नाश भरून काढण्यासाठीं लाखों नगरवासी दुरुस्तीच्या कार्यास लागले. तिकडील रेल्वेचे रस्ते व पूल इतक्या लवकर दुरुस्त करण्यांत आले कीं, मॉस्कोंतून व उरलमधून आगगाड्यांनीं मोठ्या प्रमाणांत युद्धाची सामुग्री स्टालिनग्राडमध्यें येऊं शकली. अशा तऱ्हेचा चमत्कार शक्य होण्याचें कारण म्हणजे सामुदायिक कामाची पद्धत व पंचवार्षिक योजना हें होय.

सामुदायिक शेतांच्या संस्था राष्ट्राच्या संरक्षणाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाच्या ठरल्या आहेत. शत्रूपासून शेत दूर असेपर्यंत शेतकीचें काम नेहमींप्रमाणें चालतें. त्याशिवाय शेतकीचे कामगार फुरसत काढून फौजेला लागणाऱ्या रस्त्यांची निगा ठेवतात. तसेंच लढाई बंद असतांना लाल फौजेचे शिपाई शेतावर काम करतात. जेव्हां लढाई शेतांजवळ येते तेव्हां शेतकरी सैन्याच्या शिपायांबरोबर चर खणण्याचें काम करतात व त्यांच्या बायका शत्रु सैन्याची दिशाभूल होईल ( camouflage ) अशीं कामें हातीं घेतात.

जेव्हां लाल फौजेला माघार घ्यावी लागते तेव्हां त्याच्याबरोबर सोव्हियट जनताही शिस्तीनें मागें जाते. ज्या रेलगाड्यांतून सैन्यासाठीं सामुग्री आणली जाते त्याच गाड्यांतून लहान मुलें व वृद्ध इसम ह्यांना रणांगणापासून बऱ्याच अंतरावरील प्रदेशांत पोहोंचविलें जातें. सामुदायिक शेतावर वापरण्यांत येणारे ट्रॅक्टर व लॉऱ्या शेतांतून उत्पन्न झालेलें धान्य लाल फौजेला पुरविण्यासाठीं उपयोगांत आणल्या जातात. शेतानजीक आसपास लढाई चालू असेपर्यंत शेतकरी फौजेला जी हरतऱ्हेची मदत करतात तिचें वर्णन मागें आलें आहेच. फौजेला जर माघार घ्यावी लागली तर शेतकरी

केलेला नाहीं, तसेंच बऱ्याचशा जुन्या बोल्शेव्हिकांना अपराधी ठरवून ठार मारण्यांत आलें त्याचेंही वर्णन दिलेलें नाहीं. असल्या गोष्टी वगळण्याचें कारण मी गॉर्कीच्या मननीय शब्दांत आपणांपुढें ठेवतों.–" वस्तुस्थितीचें पूर्ण व सविस्तर ज्ञान याबद्दलच्या लोकांच्या कल्पना विचारांत घेण्यासारख्या नसतात, असें माझें मत झालेलें आहे. जिच्यापासून कसलाच बोध घडत नाहीं, उलट जिच्या ज्ञानानें अंतः-करणाला घरें पडतात, इतकेंच नव्हे तर जिच्यायोगानें मनुष्याच्या वृत्तीचा नैतिक ऱ्हास होण्याचा संभव असतो असें मला वाटेल तेव्हां तसल्या वस्तुस्थितीचा निर्देश-सुद्धां टाळावा हें मला श्रेयस्कर वाटतें." माझ्यामतें सोव्हियट रशियांत अजून बऱ्याच गोष्टी चांगल्या म्हणतां येण्याजोग्या नाहींत; त्यांत सुधारणा होणें अवश्य आहे. मी सोव्हियट यूनियनला स्वर्ग म्हणणारा इसम नाहीं कीं, स्टालिनची देव म्हणून पूजा करणारा नाहीं; परंतु त्याबरोबरच सोव्हियटला शिव्या देणारांतलाहि मी नाहीं. आज रशियांत जर दोष असतील तर त्याबद्दल लेनिनचें म्हणणें ध्यानांत ठेविलें पाहिजे.—

"भरींव स्वरूपाची लोकांची चळवळ म्हटली कीं तिच्यांत दोष रहायाचेच. जिच्यावर कसलाच डाग नाहीं, जिच्यांत अत्याचारी व साहसी ठग नाहींत, जिच्यांत उथळ पाण्याच्या खळखळाटाप्रमाणें कर्तबगारीशिवाय स्वतःची टिमकी वाजविणारीं माणसें निघालीं नाहींत, अशी जगाच्या इतिहासांत एकहि चळवळ दाखविणें शक्य नाहीं."

रशियांत दोष आहेत हें खरें; परंतु त्याबरोबर सोव्हियटची २५ वर्षांतील कामगिरीसुद्धां अत्यंत प्रचंड स्वरूपाची आहे ह्यांत संशय नाहीं. "आपल्या या शतकाचा विशेष सांगतांना इतिहासदेवतेला कंठरवानें लेनिन व आईन्स्टाईन ह्यांचींच नांवें घ्यावीं लागतील. कारण या दोघांनींच विधायक स्वरूपाची अचाट कामगिरी केलेली आहे." बर्ट्रांड रसेल याचा हा अभिप्राय मननीय आहे. भावी शतकांतून राजकारणांमध्यें लेनिन व गांधीजी यांच्या ध्येयवादाचा कोडों लोकांवर परिणाम होत राहील, याबद्दल संदेह नको.

सोव्हियट यूनियन हा शेजाऱ्यासारखा अगदीं नजीकचा देश आहे. त्या देशांत इतर राष्ट्रांमधून दिसून येणारा वंशभेद किंवा वर्णभेद यांचा मागमूसही सांपडा-वयाचा नाहीं. दुसऱ्याचा देश पादाक्रांत करण्याची वृत्ति सोव्हियट जनतेमध्यें नाहीं,

हें आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे. तसेंच सोव्हियट सरकारच्या राष्ट्रीय उन्नतीचा व योजनांचा अभ्यास करून आपलें त्या राष्ट्रांशीं दळणवळण वाढविणें ह्यांत आपला फायदा आहे.

रशिया सोडण्यापूर्वीच्या अल्पकालांत पुष्किन नांवाच्या प्रसिद्ध लेखकाबद्दलचा चित्रपट लेनिनग्राडच्या स्टूडिओंत तयार होत होता. पुष्किन हा रशियाचा कालिदास किंवा शेक्स्पीअर गणला जातो. तो थोडासा काळ्या रंगाचा असून त्याचे डोळे मोठे व केस कुरळे होते. त्याची मुद्रा विचारमग्न असे. तेव्हां ह्या चित्रपटाच्या कर्त्यास वाटलें कीं, मी पुष्किनचे काम करावें, कारण मी त्याच्यासारखा दिसतों. विचार करा कीं, अशा तऱ्हेची कल्पना इंग्रज, अमेरिकन किंवा जर्मन चित्रपटकर्त्यास सुचणें शक्य आहे काय ? रशियांत परकेपणाचा भाव मुळींच नाहीं, हें ह्यावरून दिसून येईल.

ज्या देशांत मला इतक्या ममतेनें वागविण्यांत आलें, तो देश सोडतांना माझें चित्त व्याकुळ व्हावें यांत नवल कसलें ? परंतु हिंदुस्थान सोडून मला बरींच वर्षें झालीं असल्यामुळें त्याचें दर्शन व्हावें अशी उत्कट इच्छा मला झाली. आणि जेव्हां मी रशिया सोडतांना मारी नांवाच्या युवतीस शेवटचें चुंबन दिलें, तेव्हां जणूं काय मी सोव्हियट जनतेलाच प्रेमाचा रामराम करीत आहे असें मला वाटलें.


दस्विदानिया—पुनः आपण भेटूं—असें म्हणून मी सोव्हियट रशिया सोडला.

REFBK-0006457

REFBK-0006457

मराठी ग्रंथ संग्रहालय

ग्रं. क्र.




हिंदुस्थानचा एक शेजारी

Palekar's

# पालेकरी

भाजीपाल्याचें
फुलझाडांचें
बीं

पालेकर कंपनी सीताराम बिल्डिंग क्राफर्ड मार्केटनजीक मुंबई १



आत्तांच प्रसिद्ध झालेला

रशियन लेखकाचा प्रख्यात ग्रंथ

# कला म्हणजे काय ?

लेखक : टॉलस्टॉय

अनुवादक : साने गुरुजी

कर्नाटक पब्लिशिंग हाउस, मुंबई २